
माणूस : ८ सप्टेंबर ७३ : पन्नास पैसे



श्री. ग. माजगावकर

८ सप्टेंबर १९७३

# माणूस

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी · पंचवीस रुपये
परदेशची वर्गणी पासष्ट रुपये

वर्ष : तेरावे । अंक : पंधरावा

## सप्रेम नमस्कार....

२७ ऑगस्ट, १९७३

◘ दिनांक २५ ऑगस्टच्या अंकातील 'तापलेल्या मुंबईतील विधानसभा' या लेखात डॉ. अनिल अवचट यांनी जनसंघाबद्दल चुकीची आणि खोडसाळ विधाने केली आहेत.

सचिवालयात जनसंघाने निदर्शने केली त्यावेळी डॉ. अवचट तेथे जणू उपस्थित होते अशा थाटात त्यांनी सारे वर्णन केले आहे. आमचे काही कार्यकर्ते डॉ. अवचट यांना ओळखतात. त्यांनी डॉ. अवचट यांना सचिवालयात काय पण त्याच्या परिसरात कोठेही पाहिले नाही.

दुपारी 'जनसंघातर्फे' किरकोळ दुकानदारांचा मोर्चा सचिवालयावर आला हे डॉ. अवचट यांचे विधान सर्वस्वी चुकीचे आहे. मुंबई जनसंघाने असा मोर्चा मुळीच काढला नव्हता. सचिवालयावर जनसंघाने निदर्शने केली, त्यावेळी योगायोगाने किरकोळ दुकानदारांचाही मोर्चा तेथे आला होता.

याहून धादांत खोटे विधान म्हणजे 'निदर्शकांनी नाईकांच्या गाडीवरचा तिरंगी झेंडा उपसून काढला.' डॉ. अवचट जर तेथे उपस्थित असते तर एका अपरिचित तरुणाने जेव्हा नाईकांच्या गाडीवरील ध्वजाच्या टोपीला हात घातला तेव्हा जनसंघ आमदार डॉ. वसंतकुमार पंडीत यांनी तेथल्यातेथे त्या तरुणाच्या कानशिलात भडकावली हे देखील त्यांनी पाहिले असते. परंतु मुळात उपस्थित नसल्याने व केवळ वर्तमानपत्री वृतान्तावर विसंबून राहिल्याने डॉ. अवचटांनी लेखात कपोलकल्पित विधाने केली आहेत. राष्ट्रध्वजाच्या संहितेबद्दल जागरूकपणाने नेहमी चौकशी करणारे स्वातंत्र्यसैनिक श्री. धारद यांनीही दुसऱ्या दिवशी मुख्यमंत्र्यांच्या ड्रायव्हरची प्रत्यक्ष भेट घेऊन राष्ट्रध्वजाचा अपमान झाला नसल्याचे जाहीर केले होते. परंतु डॉ. अवचटांनी त्या बातमीकडे राजकीय कारणामुळे कानाडोळा केलेला दिसतो.

निदर्शने दि. १ ऑगस्टला झाली. तब्बल तीन आठवड्यानंतर लेख लिहिताना डॉ. अवचटना अचूक माहिती गोळा करता येऊ नये याचे आश्चर्य वाटते. 'माणूस'मध्ये असे वृत्त आल्यामुळे विशेष खेद वाटला.

**राम नाईक**, संघटन मंत्री, मुंबई

माणूस साप्ताहिक, १०२५ सदाशिव पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

# सेलर ते रामलीला

दिल्ली. भारताची राजधानी. मशिदी व प्रचंड लॉन्स असलेलं शहर. स्वत्व नसलेले. सिमल्याला बर्फ पडले की दिल्ली गार. राजस्थानात वादळ झालं की दिल्ली गरम. आंध्रात दंगे झाले की दिल्ली चिंताग्रस्त. पंजाबमध्ये हरितक्रांती झाली, की दिल्ली खूष. अशा या दिल्लीत बाबूलोक थंडीत टेबलावर बसून काम करत नाहीत. बहुतेक 'कामे' उरकली जातात कार्यालयाच्या कॅन्टीनमध्ये अथवा आसपासच्या अलिशान हॉटेलात. हे बाबूलोक खरे गुलजार. अनेक वाटांनी त्यांच्याकडे पैसा चालत येतो व तो अनेक वाटांनी पसार होतो. सूर्य मावळला म्हणजे दिल्लीतील जीवन फुलू लागते. उघडया कॉफिहाऊसमध्ये गर्दीला उधाण येते. वातानुकुलीत मोठ्या हॉटेलचे बार्स् आणि डायनिंग-हॉलस् जीवंत होतात. आधी दबत्या आणि नंतर मोकळया आवाजात गप्पा, हास्यविनोद रंगू लागतात.

विज्ञानभवनातील काम संपवून कॅनॉटप्लेसवर आलो. काही बारीकसारीक खरेदी, मित्राला आल्याची वर्दी व नंतर रामलीला मैदानासमोरील हॉटेलमध्ये परत.

नेहेमीचा शिरस्ता. थंडीची लाट उलटून आली होती. सिमला व काश्मीरमध्ये बर्फ पडले होते म्हणे. मित्राच्या खोलीत शिरल्याशिरल्या चहा सांगितला. नेहमीप्रमाणे पुण्याचा अहवाल सादर केला. बोलबोलता साडेसहा वाजून गेले. ट्यूबलाईट्स् व निऑन साईन्सच्या प्रकाशांत कॅनॉट प्लेस झगमगू लागली. मित्राची पत्नी कोठल्या तरी महिलामंडळाच्या गॅदरिंगला गेली होती. तेव्हा बाहेर जेवणाचा प्रस्ताव मंजूर झाला. सर्कसमध्ये शॉपिंगचा उत्साह ओसंडत होता. गरम शालीत, स्वेटरमध्ये व सुटात लपेटलेले अनेक सतेज स्त्रीपुरुष मोठ्या डौलाने हिंडत होते. दारिद्र्याचे कोठे नाव नव्हते. दिल्लीत आधीच भिकारी जवळजवळ नाहीत. परंतु भिकारडेसुद्धा दिसत नव्हते.

कपड्याच्या बाबतीत दिल्लीकर अतिशौकिन. कॅनॉटप्लेसवर जणू फॅशन्स उसळत होत्या. जो तो एक प्रकारच्या मस्तीत तरंगत होता. धुंद धुंद वातावरण होते. लग्नाच्या रिसेप्शनला असते तसे.

फिरता फिरता सेलर रेस्टॉरेंट-समोर आलो. दिल्लीच्या मुक्कामात सेलरची कीर्ती ऐकून होतो. नव-तरुण-तरुणींचा स्वर्ग असे त्याचे वर्णन करतात. अंधारात सेलरची निऑनसाईन भडकून उठली होती, दारांवरचा छोकरा येणाऱ्या-जाणाऱ्या गिऱ्हाईकांच्या समोर मोगली अदबीने सलाम उलगडत होता. त्याचा सलाम परतवून आम्हीही आत शिरलो. एका मोठ्या इमारतीच्या तळघरात हॉटेल. जास्तीतजास्त गावंढळ व जुनाट पद्धतीने सजवलेले. अवती-भवती चट्टेरी-पट्टेरी शर्ट, वाढलेल्या दाढ्या, मानेखाली आलेले केस, गळ्यात रुंडमाळा, भडक गुरु शर्टस्, बेलबॉट्स्, लुंग्या, मिनि-स्कर्टस् यांचीच दाटी. आणि या सर्व दाटीत मी व मित्र गबाळे, मागासलेले, सनातनी अशा पांढऱ्या सदऱ्यात अंग चोरून बसलो होतो. काळाच्या मागे आम्ही असूही. परंतु एव्हढे मागे असू असे मात्र वाटले नव्हते. गव्हातील मिलो ओळखायला वेळ लागेल पण अम्ही मात्र निवडक दिसत होतो. पहाता-पहाता कानठाळी संगीत सुरू झाले. या सर्व कोलाहलात संगीताच्या तालावर चिलिमी नाचू लागल्या. चिलिमीतील लय डोक्यात भिनू

लागली. त्या लयीवर हातपाय हलू लागले. धुंद, बेभान, बेताल, बेजबाबदार, खुजट, रोगट, लंपट. व्याभिचारी, अविचारी, लांचखोर, लाचार, समाजाची जबाबदारी होती ती. सहजप्राप्त व काळ्या पैशाची धुंदी होती ती. किळस व शिसारी आली हे सर्व पाहाताना. तिरीमिरीत दोघेही उठलो. बाहेर आलो. आतल्या उग्र दर्पाने डोके भणाणले होते नुसते. छातीच्या भात्यात बाहेरील शुद्ध हवा भरून घेतली. ढाब्यावर जावून छोटे पराठे खाल्ले. मुक्त संध्याकाळचा आनंद केव्हाच संपला होता. मनाच्या विषण्ण अवस्थेत हॉटेलवर परत आलो. नको म्हटले तरी तरुण पिढीचा नंगा नाच डोक्यात ठणठणत होता.

सकाळी साडेपाचला जमुनानगरला जायला निघालो. यमुनेकडून सूर्यनारायण आस्तेकदम येत होते. थंडगार वारे अंगाला झोंबत होते. पोर्चमध्ये आलो आणि मन मोठे प्रसन्न झाले. दिल्ली अजून सुस्तीत होती. रात्रीची मस्ती अजून उडायची होती. सहज रामलीला मैदानावर दृष्टि टाकली. आश्चर्याचा धक्काच बसला. शे-सव्वाशे तरुण एका कोपऱ्यात भगव्या झेंड्याच्या साक्षीने मैदानात कवायत करीत होते. त्यांच्यापासून थोडे दूर काही तरुण बुलवर्करच्या साहाय्याने स्नायू ताणत होते. एका बाजूला जोर बैठका चालू होत्या. athletes kit घालून काही तरुण पळण्याची प्रॅक्टीस करीत होते. पलिकडेच कुस्तींचा आखाडा सजला होता.

कालच्या ओंगळ वातावरणाशी सर्वस्वी विसंगत असे चित्र पाहून मीही चकित झालो. मनात कोठेतरी मोरपीस फिरले. वाटले. सेलरमधल्या रोगट प्रवृत्तींशी सामना देण्यासाठी हे हजारो तरुण समर्थ आहेत. यांच्या निरोगी, बलदंड हातात आमचे भवितव्य सुरक्षित आहे. कालची विषणता कोठल्याकोठे पळून गेली. मोठ्या उत्साहाने मी पुढील प्रवासाला निघालो.

● ● ●

# विनोबा चिंतन

## ११ सप्टेंबर हा विनोबांचा जन्मदिवस आहे

आज जगात दोन मजबूत संस्था आहेत. एक धर्मसंस्था व दुसरी शासनसंस्था. दोन्ही लोकांची सेवा करण्यासाठी आहेत. समाजाला दोन्ही संस्थांची आवश्यकता पटली व त्यांचा उपयोग समाज करून घेत आहे. पण आज अशी स्थिती निर्माण झाली आहे की, दोन्ही संस्थांपासून समाजाला सुटका करून घ्यायची आहे. धर्मापासून सुटका व्हावी असे मला म्हणायचे नाही, तर धर्मसंस्थेपासून सुटका होण्याची जरूरी आहे. लोकसेवेच्या नावावर जे शासन चालते, त्यापासून सुटका होण्याची जरूरी आहे. या दोन्ही संस्था चांगल्या उद्देशाने सूरू झाल्या यावर माझा दृढ विश्वास बसतो. पण या उद्देशांची पूर्ती झाल्यावर, त्यांच्यापासून लाभाऐवजी नुकसानच होईल.

पतंजली परमात्म्याला गुरुरूपात पहातात. 'स एष पूर्वेषामपि गुरुः' हा परमात्मा कोण? प्राचीन काळी जे ज्ञानी पुरुष होऊन गेले, त्यांचा हा गुरु. मला पुष्कळ भाषा शिकण्याची संधी मिळाली. परंतु कोणत्याही धर्मग्रंथात अगर मानसशास्त्रीय ग्रंथात परमात्म्याला गुरुरूपात पाहिलेले वाचले नाही. पित्याच्या रूपात परमात्म्याला तर सर्वत्रच पहातात. 'पितासी लोकस्य' आदी म्हटले जाते. मातेच्या रूपातही पहातात. पण योगशास्त्रात गुरुच्या रूपात पाहिले आहे. परमात्मा परमगुरु आहे. तो आपल्या सर्वांना शिकवतो. त्याचे अनुकरण करून आपल्याला शिकले पाहिजे. गुरु अत्यंत तटस्थ राहून शिकवतो. कोणतीही गोष्ट तो लादत नाही.

### लोकशाहीत विचारस्वातंत्र्य आवश्यक

आजकाल आपल्याकडे किंवा दुसऱ्या देशात सरकारी प्रयत्न काय चालले आहेत? ज्या पक्षाचे सरकार असेल, ते आपल्या विचारांचा पगडा विद्यार्थ्यांवर बसवू पहातात. जर कम्युनिझम असेल तर त्यांची विचारसरणी शिकवली जाईल. इतिहास पण नव्या तऱ्हेने शिकवला जातो. स्टालीनच्या जमान्यात शिकवण्यात येणारा इतिहास, स्टालीन पदच्युत झाल्यावर शिकविण्याचे बंद झाले. पुन्हा नवीन इतिहास लिहिला गेला—त्यात स्टालीन देव नव्हता, अधि-

ष्ठान दुसरे होते. असा नवीन नवीन इतिहास तयार होतो का? जे काही झाले तो इतिहास. पण आता असे नाही. आपल्याला पाहिजे असेल तो इतिहास. फॅसिझममध्ये फॅसिझम शिकवला जाईल. जे जे राजकीय पक्ष येतील ते ते आपले विचार विद्यार्थ्यांच्या बुद्धीवर लादतील. खरे तर लोकशाहीवर हे फार मोठे संकट आहे. लोकशाहीत प्रत्येकाला एका मताचा अधिकार असतो. पण मताचा अधिकार दिल्यावर विचारस्वातंत्र्यपण असले पाहिजे. जर विचारस्वातंत्र्य नसले तर एका हाताने मताचा अधिकार दिला व दुसऱ्या हाताने काढून घेतला, एवढेच होईल. सर्व देशात हा धोका निर्माण होत आहे, आपल्या देशातही आहे.

### फूट पाडून ऐक्य ?

मला उत्तम प्रचारक मिळाले होते— पं. जवाहरलाल नेहरू. भिन्न भिन्न धर्माऐवजी अध्यात्म व राजकारणाऐवजी विज्ञान आले पाहिजे तरच काम होईल. हा माझा विचार पंडीतजींनी रशिया, अमेरिकेत, जेथे जेथे ते गेले तेथे तेथे त्यांनी सांगितला. ते म्हणत बाबांचे विचार मला स्वीकारायचे आहेत. राजकारण, धर्म सोडून व्यापक विज्ञान व व्यापक अध्यात्माचा स्वीकार केला तर मूळ प्रश्न सुटतील. नाही तर काय होईल? राजकारणी लोक ऐक्यासाठी जे काम करतील ते फूट पाडणारेच होईल. बंगाली, उर्दू, पंजाबी भाषेचे दोन दोन तुकडे केले. जॉर्डन, कोरिया, बर्लिनचे दोन तुकडे केले. असे तुकडे करून ऐक्य होईल असे यांना वाटते. अशाने जगाचे प्रश्न कधीच सुटणार नाहीत. सर्वांचा सामूहिक रूपाने विचार केला पाहिजे तरच काही मार्ग निघेल. व छोटीछोटी राजकारणे व धर्मग्रंथ यापासून मुक्ती मिळेल. धर्मग्रंथांपासून सुटका म्हटले म्हणजे येथले लोक घाबरतात. यात घाबरण्यासारखे काही नाही असे मी सांगतो.

### आमचे खरे काम कोणते ?

केव्हा केव्हा लोक मला विचारतात की आपण बाजूला का रहाता? देशाची जिम्मेदारी का नाही उचलत? दोन बैल जर गाडीला लागलेले असतील आणि मी तिसरा बैल लागलो तर त्याने गाडीला काही मदत होईल का? गाडी योग्य दिशेने जावी म्हणून मी जर रस्ता ठीक केला तर ती गाडीला जास्त मदत होईल. 'स्वतंत्र लोकशक्तीच्या' निर्माण कार्यात आपण गढून गेले पाहिजे. तेव्हाच आम्ही आजच्या सरकारला खरीखुरी मदत व देशाची योग्य सेवा करू शकू.

### दंडशक्ती व लोकशक्तीचे स्वरूप

आम्हाला 'स्वतंत्र लोकशक्ती' निर्माण करावयाची आहे, या माझ्या म्हणण्याचा अर्थ हिंसाशक्तीच्या विरोधी व दंडशक्तीच्या भिन्न अशी लोकशक्ती प्रकट करावयाची आहे. आपण आज आपल्या सरकारच्या हाती दंडशक्ती सोपवली आहे. त्यात हिंसेचा एक अंश आहे, तरीही तिला आपण हिंसा म्हणत नाही. तो एक अलग वर्ग आहे. कारण समुदायाने ही शक्ती त्यांच्या हाती

सोपवली आहे, म्हणून ती दंड-शक्ती हिंसाशक्ती नव्हे. या दंडशक्तीचा उपयोग करण्याची संधी कधी येऊ नये अशी परिस्थिती देशात निर्माण करणे आपले कार्य आहे. हे आपण केले म्हणजे आपल्याला स्वधर्म समजला असे मानता येईल. आणि जर दंडशक्तीच्या आधारे जनसेवा करण्याचा लोभ असला तर कोणतेही विशेष कार्य आपल्याकडून होणार नाही. आपण भाररूप होण्याचा संभव आहे.

दंडशक्तीच्या आधारे सेवाकार्य होऊ शकते व त्यासाठीच आपल्याला राज्य-शासन पाहिजे आहे. यामुळे सेवा नक्की होईल पण दंडशक्तीचा उपयोग न करता होणार नाही. लढाईतील जखमी शिपायांची सेवा करायला जे लोक जातात ते भूतदयेने प्रेरित होऊन. माता आपल्या मुलाची सेवा करते त्याप्रमाणे ते सेवा करतात. परंतु युद्ध रोखण्याचे काम ते करू शकणार नाही. शिपायांची कत्तल व जखमींची सेवा दोन्ही परस्पर-विरोधी गोष्टी आहेत. एक क्रूर तर दुसरे दयेचे काम आहे. दयाळू हृदयाची क्रूरता दोन्ही मिळून युद्ध होते. कठोर वैज्ञानिक भाषेत सांगायचे तर, जोपर्यंत आपण युद्धाला मान्यता दिली आहे, तोपर्यंत जरी आपण शिपाई पेशा पत्करला किंवा जखमींची सेवा केली, तरी आपण युद्ध अपराधीच आहोत. या सेवेमुळे हिंसेमध्ये लज्जत, युद्धात रूची उत्पन्न होते. पण या दयेने युद्ध समाप्त होत नाही.

मला कित्येकजण विचारतात की, तुम्ही सरकारवर आपले वजन खर्चून भूमी वितरणाचा काही मार्ग का नाही शोधत ? माझा तो मार्ग नाही. कायद्याच्या मदतीशिवाय जनतेच्या मनातच भूमीवितरणाबद्दल आस्था निर्माण होईल असा प्रयत्न करणे, हा माझा धर्म आहे. कोणत्या कायद्यान्वये माता आपल्या मुलांना दूध पाजतात ? मनुष्याच्या हृदयात अशी एक शक्ती आहे की त्यामुळे त्याचे जीवन समृद्ध होते. प्रेमावर मनुष्याचा विश्वास असतो. प्रेमाने निर्माण झालेल्या गोष्टीचे पालन प्रेमानेच होते. प्रेमाच्या या शक्तीचे अधिक सामाजिक रूपात विकसन करण्याचे सोडून आपण जर 'कायदा-कायदा' याचाच घोष लावला तर जनशक्ती निर्मिण्यास सरकारला मी काहीच मदत करू शकणार नाही. म्हणून दंडशक्तीहून भिन्न जनशक्ती आम्हाला निर्माण करायची आहे. जन-शक्ती ही दंडशक्तीच्या विरोधी आहे, असे मी म्हणणार नाही. ती हिंसाविरोधी आहे, परंतु दंडशक्तीहून भिन्न आहे.

## कार्य-पद्धती

आमच्या कार्यपद्धतीचे दोन भाग असतील – एक विचार शासन व दुसरा कर्तृत्व विभाजन.

विचार शासनाचा अर्थ आहे विचार समजणे व समजाविणे. विचार समजल्या-शिवाय कोणतीही गोष्ट कबूल करू नये. समजल्याशिवाय जर कोणी आपली गोष्ट कबूल केली तर नाराज व्हावे व आपली इच्छा दुसऱ्यावर न लादता केवळ विचार समजावण्यावर संतुष्ट

व्हावे. काही लोक म्हणतात की सर्वोदय समाजाची रचना शिथिल आहे. परंतु सर्वोदय समाजाची 'शिथिल रचना' नसून 'अरचना' आहे. आम्ही फक्त विचारांच्या आधारावर उभे राहू इच्छितो. आमचा विचार एखाद्याला न पटल्यामुळे त्याने तो मानला नाही तर आम्हाला आनंद होईल. परंतु एखाद्याने न समजता जर विचार अमलात आणला तर आम्हाला दुःख होईल. या रचनेत जेवढी ताकद आहे तेवढी कोणतीही कुशल, अनुशासनबद्ध रचनेत असणार नाही. शिव-शक्ती पैदा करण्यासाठी विचार शासनाची जरूरी आहे.

कर्तृत्व-विभाजन म्हणजे सर्व कर्मक्ती, कर्मसत्ता एके ठिकाणी केंद्रीत न होता गावागावात निर्माण झाली पाहिजे. आपल्या गावात कोणती वस्तू आणायची किंवा नाही याचा निर्णय घेण्याचा हक्क प्रत्येक गावाला मिळाला पाहिजे. यावर सरकारचे म्हणणे असे की एका मोठ्या राज्यांतर्गत छोटे राज्य चालू शकणार नाही. मला वाटते जर याप्रकारचे सत्ता, विभाजन, कर्तृत्व विभाजन झाले नाही तर सैन्यशक्ती अनिवार्य आहे. तर मग सेना सुसज्ज ठेवलीच पाहिजे, केव्हा ना केव्हा आम्ही सेनेपासून सुटका मिळवणार असे बोलू नका.

सेनेपासून सुटका मिळवायची असेल तर जसे परमेश्वराने केले तसे आपल्याला केले पाहिजे. परमेश्वराने सर्वांना अक्कल वाटली व स्वतःच्या अकलेप्रमाणे काम करण्यास सांगितले. दुनिया उत्तमरितीने चालू लागली व त्यामुळे परमेश्वराला सुखाने विश्रांती घेता आली. यामुळे असे झाले की लोकांना शंका येऊ लागली की जगात परमेश्वर आहे की नाही. एखादी राज्य सत्ता आहे की नाही अशी शंका यावी असे राज्य आपल्याला चालवले पाहिजे. हिंदुस्थानात बहुतेक राज्यसत्ता नाही,' असे जेव्हा लोक म्हणतील तेव्हा अहिंसक राज्यशासन होईल.

म्हणून आम्ही ग्रामस्वराज्याचा उद्घोष करतो व गावकऱ्यांनी गावाचे नियंत्रण करावे असे इच्छितो. हे पण एक जनशक्तीचे उदाहरण आहे. गावकऱ्यांनी आपल्या पायावर उभे रहावे व निर्णय घ्यावा की, एखादी वस्तू गावात पैदा करायची आहे, एखादी वस्तू गावात येऊ नये म्हणून सरकारकडे मागणी करावी. जर सरकारने मानले नाही तर विरोध करण्याची हिम्मत गावकऱ्यात असावी. अशी जनशक्ती निर्माण झाल्यास सरकारला फार मदत होईल. सैन्यबळाचा उच्छेद होईल.

## राष्ट्रीय नव्हे ग्रामीण योजना

यासाठी 'राष्ट्रीय नियोजना' ऐवजी 'ग्रामीण नियोजन' झाले पाहिजे. मी 'ऐवजी' म्हटले आहे. पण राष्ट्रीय नियोजनाचाच अर्थ ग्रामीण नियोजण असला पाहिजे. या ग्रामीण नियोजनासाठी जे काही करावे लागेल ते दिल्लीने करावे. हा आमच्या कार्यक्रमाचा दुसरा अंश आहे. आम्ही जे काही करतो ते कर्तृत्वविभाजनाच्या दिशेनेच करतो. म्हणून गावात जमिनीचे वाटप झाले पाहिजे.

पृष्ठ ६४ वर

# भोगलवाडीच्या भन्नाट पोरांनी केलेली

# ग्रामीण क्रांती

आमच्या कॉलेजमधील भोगलवाडीच्या तिडके कंपनीचा बरेच दिवस आग्रह होता की, 'सर आमच्या गावाकडे एकदा या. आम्ही काय काय सुधारणा गावात केल्या आहेत त्या बघा. म्हणून आमच्या येथील विद्यार्थीप्रिय प्रा. श्री. सबनीस, प्रा. जोगदंड व मी असे शनिवारी भोगलवाडीला निघालो. परळीमार्गे तेलगाव येथे उतरलो. तेथून गाव ४-५ मैल होते. आम्ही चालत निघालो. श्रावणाचा महिना. पाऊस भरपूर झालेला. त्यामुळे आजुबाजूची वनश्री आणि बहरलेली शिवारे पाहून फार दिवसांनी मन प्रसन्न झाले होते. भोगलवाडीचे विद्यार्थी सांगू लागले.

'सर, आमचा गाव तीन हजार वस्तीचा. गावात वंजारा समाज मोठ्या प्रमाणात. महारा-मांगाचे ३००–३५० लोक असतील. ब्राह्मणाचे घर एकच. तोही मिलिटरीतच असतो. गाव रस्त्यापासून तीन मैल आत. डोंगराच्या पायथ्याशी. त्यामुळे गावात जायला धड रस्ता नाही की गावात वीज नाही. गाव तसा गुंड. जुगारीचा धंदा जोरात तर हातभट्टीची दारू मुबलक. गावातील रस्ते फारच अरूंद होते. त्यातून धड बैलगाडी जाऊ शकत नसे. रस्त्यात डोकावणारे मोठमोठे खडक. त्यामुळे रात्री अपरात्री जाताना हमखास ठेचा लागायच्या.'

जबर व्याजाने लोक पैसे देत. एकाने एकदा २० रुपये उसने दिले, तर त्याचे काही दिवसात ३०० रुपये वाकवून घेतले. अजिबात अतिशयोक्ती नाही बघा. अस्पृश्यांची अवस्था तर जास्तच बिकट. गावाच्या एका टोकाला मांगवाडा तर दुसरीकडे महारवाडा. महारांना कोणालाच जमिनी नाहीत. त्यामुळे मजुरीवर उपजीविका करावी लागते. वरचेवर उसने पैसे घेण्याची वेळ येते. कारण रेशनिंगवर पुरेसे धान्य मिळत नाही. जे येते त्यातील बरेचसे काळ्या बाजारात जाते. गावातल्या गावातच. महार खडी फोडायला गेले की दुकान उघडायचे. ते गावात आले

की बद करायचे. असे करून धान्य शिल्लक ठेवायचे. ते दीड रुपया चिपटे या भावाने विकायचे. मग उसने घेतलेले पैसे दम देऊन, कधी मार देऊन बळजोरीने वसूल करायचे. कित्येक महारांच्या घरातील भांडी एका वंजाऱ्याच्या घरी गेली आहेत. एवढयानेही भागत नाही म्हणून घरावरील पत्रे काढून नेतात. महार बिचारे असहाय्यपणे, विवशतेने पहात बसतात. घरात स्त्रिया असल्या तरी भांडी उचलून नेणे, पत्रे काढणे हे प्रकार चालतात.

मग आम्हाला चीड आली. आम्ही तरुण विद्यार्थ्यांचा एक संघ स्थापन केला. प्रथम गुडघाभर घाण साठलेली हगंदरी स्वच्छ केली. तेथून जाताना आता नाक मुठीत धरून जावे लागत नाही. वडिलधाऱ्या मंडळींना फार बरे वाटले. त्यांना आनंद झाला. मग आम्ही ठरविले रस्तारुंदी करावयाची. त्यासाठी आड येणारे ओटे पाडावे लागणार होते. लोक विरोध दर्शवू लागले. वर्षानुवर्षे चालत आलेले ओटे कसे पाडायचे? न का जाईना बैलगाडी. पण पोरांनी निर्धार केला. विरोध करू नका म्हणून सांगितले. ओटे निघाले. आता बैलगाडी जाऊ शकते. मग आम्ही रेशनिगचे दुकान चालवायला घेतले. काळाबाजार बंद केला. योग्य भावात व योग्य ते धान्य लोकांना मिळू लागले. संघटना वाढू लागली. लोकांनाही हळूहळू ते आवडू लागले. मात्र हितसंबंधी वर्ग दुखावला गेला. असंतोष धुमसू लागला आणि कहर झाला, आंबेडकर जयंतीच्या दिवशी.

कधी नव्हे तो आंबेडकर जयंती साजरी करण्याचा निर्णय संघटनेने घेतला. दुपारी सर्वजण जाऊन महारवाडयात जेवले. सायंकाळी मिरवणूक निघाली. आता मात्र लोकांना सहन होईना. महारवाडयात जाऊन पोरे जेवतात- म्हणजे काय? मिरवणुकीत धरला एका पोराचा हात. झाली झटापट सुरू. पोरांनी एकजुटीने विरोध केला. मारामारी झाली. सध्या कोर्टात केस चालू आहे.

एवढयात गाव दिसू लागला. विद्यार्थी व गावकरी असा शे-दीडशेचा समुदाय स्वागताला आला होता. ज्ञानोबा तिडकेची चळवळ चालू होती. सगळी पोरे अगदी खूष होती. आम्हाला हार घालण्यात आले, समोर भरली घागर उपडी झाली. 'तरुण विद्यार्थी संघटनेचा' जयजयकार चालू झाला. ढोल, हलगी व पिपाणी यांचा जल्लोष सुरू झाला. आणि आमची मिरवणूक निघाली. गावात शिरतानाच शाळा दिसली. निकाल शून्य टक्के लागतो. जागा पुरत नाही म्हणून काही खोल्या काढल्या तर त्यातील बरेचसे पैसे खाण्यावारीच गेले. शाळेत मॅट्रिकला पोरे आहेत सात. तर नववीत दोन. शाळा बंद पडण्याच्या मार्गावर आहे. एवढयात समोर पाडलेले ओटे दिसू लागले. खरोखरीच रस्ता अगदी अरुंद झाला होता. कित्येक ओटे अजून अर्धवट पाडलेलेच होते. रेशनिंगचे दुकानही पाहिले.

मिरवणूक संपल्यावर मी व प्रा. जोगदंड महारवाड्यात गेलो. पोरांनी सांगितलेली परिस्थिती अगदी खरी होती. गावात हे विद्यार्थी असले की महारांना बरे वाटते. एकदा का ते अंबाजोगाईला कॉलेजमध्ये गेले की महारांना त्रास सुरू होतो. एकदा तर एका महाराला ६ तास डांबून ठेवले. त्याच्यापासून १०० रुपये हवे होते. मग त्याला खडसावण्यात आले ' तुझा पोरगा आमच्या पोरांच्या संघटनेत का जातो ? ते बंद कर. नाही तर तुला त्रास होईल.' खायला अन्न नाही, घरात भांडी नाहीत की घरावर पत्रे नाहीत अशा अवस्थेत त्या म्हाताऱ्या स्त्रिया गहिवरून येऊन सांगत होत्या.

मग आम्ही जेवायला उठलो. विद्यार्थ्यांचा पुढारी बाबू तिडके. त्याचे चुलते सरपंच आहेत. त्यांच्याच घरी जेवण झाले. त्यांचा या पोरांना मूक पाठिंबा असतो. नाही तरी काय करणार ? हा पुतण्या असा 'बंडखोर,' शिवाय प्रामाणिक व सर्व संघटना याच्याच शब्दावर चालते. एवढे पैशाचे व्यवहार होतात पण कोठे हात बरबटलेले नाहीत.

रात्री ९ ला सभा सुरू झाली. ग्रामपंचायतीच्या ओटयावर पोरांनी गर्दी केली होती. प्रा. सबनीसांचे भाषण ऐकायला ती फारच उत्सुक होती. समोर तीन-चारशे पागोटे जमले होते. सभा सुरू झाली. वर आभाळही भरून आले होते. शितोडे पडू लागले होते. सभेच्या सुरुवातीला विद्यार्थ्यांना गाणी म्हणायची होती. गावातील सरपंच, सेक्रेटरी, चेअरमन यांच्यावर मोठी खुशखुशीत गाणी रचली होती. पण पावसामुळे ते रहित केले. प्रा. जोगदंड बो राहिले. त्यांनी बदलत्या काळाची पावले ओळखून समता प्रस्थापित करण्याचे आवाहन केले. आता पाऊस पडू लागला. पावसातच प्रा. सबनीस बोलण्यासाठी उठले. इकडे पाऊस सुरू झाला तर इकडे ठिणग्या पडू लागल्या. ओटयावरची पोरं मनापासून टाळया वाजवू लागली. प्रा. सबनीस बोलू लागले—

'तुमच्या या पोरांनी फार चांगले काम केले आहे. हे आम्हाला तिकडे


## शनवारवाड्यातील शमादान

### ब. मो. पुरंदरे

किंमत : साडेतीन रुपये

राजहंस प्रकाशन

लांब अंबाजोगाईला समजले म्हणून आम्ही आज त्यांना आशीर्वाद द्यावयास आलो आहोत. त्यांनी गावातील रस्ते रुंद केले. हगंदरी साफ केली ते तुम्हाला आवडले ते आता कूपनचे दुकान चांगले चालवीत आहेत. आंबेडकर जयंती त्यांनी धुमधडाक्याने साजरी केली. ही वंजाऱ्याची पोरे पण ती महाराबरोबर जेवली. तर मग तुम्हाला का वाईट वाटावे ? तुम्ही वडीलधाऱ्यांनी त्यांना आशीर्वाद दिले पाहिजेत. तुम्ही महारा-मांगावर अन्याय करू नका. महारांना २० रुपये उसने दिले तर त्यांचे ३०० रु. परत घेता. हा कोणता कायदा ? त्यांना धमक्या का देता ? लक्षात ठेवा ही पोरे आमच्या कॉलेजमधील आहेत. त्यांना तुम्ही कमी समजू नका. त्यांच्यामागे आमच्या कॉलेजचे दोन हजार विद्यार्थी आहेत. आम्ही सर्व प्राध्यापक त्यांच्यामागे आहोत. सरकार त्यांच्यामागे आहे. सारा देश त्यांच्यामागे आहे. अस्पृश्यता पाळू नका. देशाला स्वातंत्र्य मिळून आज पंचवीस वर्षे होऊन गेली तरी अस्पृश्यांना असे खाली मान घालून का जगायला लागावे ? याचे उत्तर तुम्ही तुमच्या मनाला विचारा. आम्ही इतक्या लांबून येऊन या पोरांचे कौतुक करतो आणि तुम्ही विरोध करता ? ती पोरे आता शिकली आहेत. आम्ही त्यांना कॉलेजमध्ये विद्या शिकविली आहे. ती पोरे आता तुमचे ऐकणार नाहीत. म्हणून तुम्ही त्यांना चांगले म्हणा.'

पोरे भलतीच खूष झाली होती. टाळ्यावर टाळ्या पडत होत्या. पावसाचा तर थांबायचा रंग दिसत नव्हता. शेवटी सबनीसच थांबले. सभा संपली. पागोटी पांगली.

आम्ही शाळेकडे गेलो. आमची झोपण्याची व्यवस्था तिकडे केली होती. सर्व विद्यार्थी तिकडे जमा झाले. चर्चा सुरू झाली. पोरांनी गावात दंतमंजन तयार करायला सुरुवात केली होती. आणखी काय करता येईल हे त्यांना हवे होते. त्यांना खडूचा कारखाना काढायचा होता, शाळा काढायची होती. प्रा. सबनीस म्हणाले, 'तुमच्या गावाला लाईट नाही. त्यासाठी प्रयत्न करा. ते काम लवकर होईल. गावात लोकसंख्या बरीच असून घरे फारच लहान लहान आहेत. अव्यवस्थित आहेत. ती व्यवस्थित करा. शक्य असेल तर सोसायटी स्थापून घरे बांधा. गाव स्वच्छ ठेवा. सर्वजण बंधूभावाने रहा. प्रामाणिक रहा. जग फार पुढे चालले आहे. सत्ता हाती येताच तिचा गैरवापर करण्याचा मोह होतो, तो टाळा (पोरे लवकरच ग्रामपंचायतीच्या निवडणूका लढविणार आहेत. विजयाची खूपच शक्यता आहे.) तरच आम्ही पाठिंबा देऊ. अशाच संघटना गावोगाव काढा.'

दुसऱ्या दिवशी सकाळी लवकरच परतीला लागलो. येताना मन म्हणत होतं, आहेत खरी भोगलवाडीची भन्नाट पोरे. एकेकाळचा गुंड गाव. पण सर्व गावात या पोरांच्या शक्तीची दहशत बसली आहे. विरोध हळूहळू कमी होऊ लागला आहे, मात्र ही पोरे कॉलेजला

गेली की हरिजनांचा त्रास वाढतो. भांडीकुंडी जातात. दम दिला जातो. मनात आले की अस्पृश्यता निवारण्याचे कार्य सरकार किंवा वृद्धमंडळी यांच्याकडून होणे शक्य नाही. या सुशिक्षीत तरुण पिढीने जर मनावर घेतले तर बरच काही शक्य आहे. या पोरांचे आई-बाप तरी किती दिवस विरोध करणार ? आज ना उद्या आदळून-आपटून तेही गप्प बसतील. कुठल्या कुठे डोंगराच्या कपारीत हे गाव, पण पोरांच्या कर्तबगारीचा डंका आजूबाजूला ऐकू येतो. त्यांची स्फूर्ती घेऊन गावोगावच्या विद्यार्थ्यांनी जोमाने कामाला लागले पाहिजे.

येताना तिडकेकडे असलेली गाण्याची वही पाहिली. त्यातील नमुन्या दाखल काही भाग खाली देत आहे. ही गाणी घरोघरी फारच प्रिय झाली आहेत.

('अरे दाजिबा' या चालीवर)
अरे चेअरमना, साखर चोरणं गुन्हा
हे वागणं बरं नव्हं.
दर कोटयाची साखर,
केजमध्येच खपणार
उरली लपवी घरात
काळ्या बाजारी विक्रीत,
अरे चोरट्या,
थापा माराव्या खोटया
हे वागणं बरं नव्हं....

(शाळेवर कविता)
शून्य निकाल लागला
या वर्षाला शाळेचा ।
गावकरी, मुलं, शिक्षक,
मेळ कुणाला कोणाचा ।
खाली तंबाखू, बिड्या ओढिती
मुलें वर्गात बसून ।
शिक्षकच करी मागणी
काडी चुन्याची त्याकडून ॥
सुटयांना तर ऊत आला
गुणवान या शाळेत
कुणी कधीही खिडक्यामधूनी
उड्या मारूनी जातात.

पोरांच्या या कर्तबगारीबद्दलची गाणी भोगलवाडीतील स्त्रिया जात्यावर दळताना देखील म्हणतात.

—प्रा. सू. रा. काकडे

---


# एका पराभवाची कहाणी

**ले. : ब्रिगेडियर जे. पी. दळवी । अनुवाद : अनंत भावे**

**मूल्य : पंधरा रुपये । राजहंस प्रकाशन**


---

# सोलकढी

## म्हणे मंत्र्याने असे वागावे

देशातल्या बऱ्याच भागात यंदा दुष्काळाने कहर उडवला होता. मुंबई-पुण्यात गेले काही दिवस त्याची थोडीशी झळ लागली. एरवी व्यक्तिशः मला तरी दुष्काळाचे फारसे भान नव्हते. ही गोष्ट दिसायला वाईट दिसली तरी, एकदाची सांगून टाकली पाहिजे. म्हणजे तशी दुष्काळी फंडाला मदतबिदत दिली हो मी. पण माझ्या दोन वेळच्या जेवणात आणि दोन वेळच्या खाण्यात काही कमी झाले नव्हते; माझे दैनंदिन व्यवहार निर्वेध चाललेले होते; माझी कलात्मक भूक भागविण्यासाठी पुस्तके-नाटके-चित्रपट प्रयत्नशील होते; घरच्या अन्नाने तोंडाला चिकटा आल्यावर मधूनमधून माझे पाय देशीविदेशी उपाहारगृहांकडे वळत होते. हे मी मोठ्या फुशारकीने सांगतो आहे असे आपण मानू नका. मला स्वतःची शरम वाटते हो.

पण मला जे भान राहिले नाही ते इंदिरा गांधींनी कसे नीट राखले होते. नुकताच आपल्या मंत्रिमंडळाला काटकसरीचा सल्ला त्यांनी दिला. देशात दुष्काळ असताना मंत्र्यांनी उधळमाधळ आणि चैनबाजी करणे बरे दिसत नाही; मंत्रिगणाकडे साऱ्या जनतेचे लक्ष असते; म्हणून मंत्रिगणानेच आपल्या नमुनेदार वागण्याने जनतेपुढे विधायक उदाहरण ठेवले पाहिजे; हे एवढे इंदिरा गांधींनी सूचित केले. आपल्या मंत्र्यांना गोष्टी कळायला वेळ लागतो. पण एकदा कळल्या म्हणजे मग मात्र त्यासाठी वाटेल ते करायची त्यांची तयारी असते. आता काटकसरीचा सल्ला मिळाला; त्यामागचा हेतूही कळला; तेव्हा मंत्रिमंडळी इतकी काटकसर करतील की त्यांनी थोडी चैन-बाजी करावी अशी शिकवण इंदिरा गांधींना द्यावी लागेल.

गमतीदार योगायोग असा की इंदिरा गांधींना जे करावे लागले तेच जपानचे पंतप्रधान तनाका यांना करावे लागले. म्हणजे त्याचे असे झाले: जपानच्या किनाऱ्यालगतच्या काही भागातले पाणी औद्योगिक उत्सर्गामुळे दूषित झाले असून या पाण्यातले मासे आरोग्याला धोकादायक आहेत, असा इशारा काही शास्त्रज्ञांनी दिला.

त्यामुळे लोकांनी मासे खायचे सोडले (अर्थात एव्हाना जपानमध्ये कृत्रिम कल्चर्ड माशांचे उत्पादन सुरू झाले असण्याचा संभव आहे), त्यामुळे मासे-विक्यांची पंचाईत झाली आणि सरकारची धांदल झाली. तेव्हा पंतप्रधान तनाकांना या प्रकरणाची दखल घ्यावी लागली. शास्त्रज्ञांचे म्हणणे त्यांना मान्य नाही; पण हे लोकांना कसे पटावे? मग त्यांनी मंत्रिमंडळातल्या आपल्या सहकाऱ्यांना दररोजच्या जेवणात एकदा तरी तो तसला, आरोग्याला तथाकथित धोकादायक असलेला मासा खायची विनंती केली. मंत्र्यानेच ते मासे खाल्ले (आणि त्यांना काहीसुद्धा झाले नाही) तर सामान्य जनतेला सुद्धा ते खायचा धीर येईल, असा साधा हिशेब तनाकांनी केला असावा.

लोकनेत्याने लोकांना कित्ता घालून देण्याची, इंदिरा गांधी आणि तनाका यांची कल्पना मला मध्ययुगीन अतएव कालविसंगत वाटते. तिने लोकशाही-सारख्या आधुनिक जीवनपद्धतीचे काहीच भले होणार नाही, असा इशारा मी कर्तव्यबुद्धीने आत्ताच देऊन ठेवतो. ◻

## ब्रिटनमधील खुले विद्यापीठ

चित्रवाणीचा आणि टपाली शिकवणीचा अवलंब करणारे खुले विद्यापीठ ब्रिटनमध्ये १९७१ साली निर्माण झाले. त्या विद्यापीठाच्या पहिल्या ९०० स्नातकांना पदवी देण्याचा समारंभ नुकताच पार पडला. हे विद्यापीठ फार लोकप्रिय झाले आहे. ३०,००० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी यात नावे नोंदवली आहेत.

या विद्यापीठाचा शैक्षणिक दर्जा इतर कोणत्याही चांगल्या विद्यापीठापेक्षा कमी नाही. हे विद्यापीठ सरकारनेच स्थापले असून विद्यार्थ्यांची फी आणि शिक्षण व विज्ञान विभागांकडून मिळणारे अनुदान यांनी त्याचे अर्थकारण व्यवस्थित सांभाळले जाईल असा अंदाज आहे. ● ● ●

---

काही सावध सज्जन सोडले तर आपण सगळे टपालतिकिटे चिकटवताना थुंकीचा वापर करतो. टपाल तिकिटाच्या मागे गोंद लावून तो वाळवलेला असतो. थुंकीने तो चिकटायला लायक होतो.

पण ब्रिटनमध्ये नव्याने निघालेले तंत्र जर सर्व देशांनी स्वीकारले तर टपालतिकिट चिकटवताना थुंकीचा वापर करायची पाळी आपल्यावर येणार नाही. या नव्या तंत्राप्रमाणे तिकिटाच्या मागे अतिछोट्या कुप्यातून गोंद साठवलेला असतो. जेथे चिकटवायचे असेल तेथे ते ठेवायचे आणि वरून दाब द्यायचा; म्हणजे साठवलेला गोंद सुटा होऊन तिकीट फर्मास चिकटते. त्यामुळे थुंकीची यातायात नाही. तिकिटावरचे रोगजंतू पोटात जायची भीती नाही.

# मुक्काम यवतमाळ

जवाहरलालजी दर्डा फारच गा (मा?) जून राहिलेत.

म्हटलं त्यांच्या कर्मभूमीचं एकदा दर्शन घ्यावं.

मुक्काम यवतमाळला हलवला.

'माणूस 'ने १८ ऑगस्टच्या अंकात, दर्डाजींच्या कर्तृत्वाचे पाढे वाचणार असल्याचे जाहीर करून टाकले होते.

२४ तारखेचा अंक अजून आला नव्हता. २२-२३ लाच यवतमाळला पोचला. लोकांचा कानोसा घेतला.

महाराष्ट्रात जितकी खळबळ माजली होती तेवढीच यवतमाळलाही माजल्याचे जाणवले. लोकांच्यात खूपच उत्सुकता होती.

एका हॉटेलवाल्याला गाठले.

'कौन है यह जवाहरलाल दर्डा?' मी.

'कमाल है आपकी. आपको मालूम नही?'

हाताने गल्ला वाजवत त्याने विचारले. 'ये यहांके आमदार हैं, मिनिस्टर होते जा रहे हैं."

'आजकल कोईभी फालतू आदमी मिनिस्टर बनता है, किसका किसका नाम याद रहे गा जी'–मी.

'आप क्यूं पूछ रहे हैं?'

उत्तरादाखल मी त्याच्या पुढे १८ ऑगस्टचा माणूस टाकला. शेवटच्या मलपृष्ठावर दर्डाजींचा फोटो होता. त्याने 'माणूस' आधीच वाचला होता. यवतमाळला ३० प्रति येतात. पण यावेळी तेवढयाच प्रती एका हातातून दुसऱ्या हातात फिरत फिरत यवतमाळ शहरभर फिरल्या होत्या.

'कौन लिखनेवाला है मालूम नही.' लेकिन कुछ तो भी उसमे जरूर होगा.' त्यालाही उत्सुकता होती.

गावातल्या बाजारात, स्टँडवर, दुकानादुकानात दर्डांची लफडी निघणार अशी कुजबूज होती.

एका सलूनमध्ये शिरलो. गावातली बित्तंबातमी इथेच मिळत असते. चेहऱ्यावर साबणाचा थर बसत असताना पुनः मी दर्डांची चौकशी केली. त्याने मी कुठला असल्याची चौकशी केली. औरंगाबादहून आल्याचे कळल्यावर म्हणाला, 'बाप्पा! दर्डांला अख्ख्या महाराष्ट्रात लोक ओळखू लागले की हो!' ह्या दर्डाप्रकरणी सर्वच ठिकाणी उत्सुकता असल्याचे कळल्यावर स्वारी भलतीच खूष झाली.

लफडी चव्हाटयावर कोण आणणार? नावाबद्दल तर्कुतर्क लढवले जात होते. दर्डांच्या राजकीय विरोधकांची नावे घेतली जात होती. परंतु

झुंबरमल भरुट नावाचा यवतमाळ-मधलाच कोणी माणूस हे लिहून राहिलाय याची फार थोड्यांनाच कल्पना होती.

एक बँकेत, काम करणारा बिच्चारा कारकून भेटला. 'काय हे ? 'माणूस'ने असले काही छापायची काय जरूर होती ? भाऊसाहेबांची कुलंगडी काढली, आता जवाहरलालची, काय फायदा होणार आहे असल्या भानगडीतून ?'

पण आणखी एक जण असेही बोलून गेला. आज कोणीच या दर्डाविरुद्ध लिहायला धजत नाही. ह्याला विरोध करणारा माणूस एकतर याच्या खिशात नाही तर जेलमधे जातो माणूसने या माणसाची लक्तरे वेशीवर टांगली हे बरेच झाले. XXXX ना अशीच शिक्षा झाली पाहिजे.'

अजून तरी लेखक कोण, काय लिहिलं आहे याची कल्पना लोकांना आलेली नव्हती.

## दि. २४ ऑगस्ट !

सकाळी उठल्या उठल्या लोकप्रीय दै. लोकमत हातात पडले. (श्री. दर्डा या लोकमताचे संपादक आहेत.) पहिल्याच पानावर बातमी. 'श्री दर्डा स्वीडनला जाणार.' दर्डांचा फोटोही त्या विस्तृत बातमीमधे देण्यात आला होता. आंतरराष्ट्रीय गृहनिर्माण परिषदेत भारताचे प्रतिनिधीत्व करायला श्री. दर्डा स्वीडनला जाणार होते. त्यांनी म्हणे ६ निबंध आंतरराष्ट्रीय परिषदेला पाठवून दिले होते. त्या निबंधाचा विषय होता ग्रामीण भागातील, विकसनशील किंवा अविकसित देशातील घरबांधणीचा प्रश्न !' (साधारणपणे कर्ज कसे उचलावे, वेगवेगळ्या मार्गांनी ते कसे हाणावे, बांधकामात कमी किंवा निकृष्ट माल कसा वापरावा अशा महत्त्वाच्या प्रश्नांची चर्चा असावी). परिषद आटोपल्यावर ते इंग्लंड, जर्मनी, स्वीडन, इटली आदि देशातल्या गृह निर्माणांची पाहणी करणार आहेत. (दर्डाजी चुकले. त्यांचे ज्ञान थोऽऽऽडेसे कमी पडले. युरोपात सहकारी गृहनिर्माणात पैसे खायला मिळत माहीत याची दर्डांना माहिती नसावी. येवढ्या दूर जावून निराशा पदरी पाडून घेण्यापेक्षा 'हिमालय' गृहनिर्माण संस्थेची पाहणी करावी. त्यांना जे हवे आहे ते त्यांना तेथेच मिळेल.)

त्याच बातमीत असेही म्हटले आहे की, 'महाराष्ट्र राज्यातील गृहनिर्माण क्षेत्रात श्री. दर्डा यांनी बहुमोल कार्य केले आहे.' (त्यांच्या बहुमोल ?) कार्याचा आढावा घेण्याची वेगळी जरूर नाही. जिज्ञासूंनी गेल्या आठवड्याचा 'माणूस'चा अंक वाचावा–)

लोकमत चाळून तडक एस. टी. स्टॅंड गाठला. 'माणूस'च्या सर्व प्रती आल्या आल्या संपून गेल्या होत्या. जास्त मागवलेल्या १५० प्रतींची स्टॉलवाला वाट पहात होता. (दर्डांचे काय व्हायचे ते होवो; आपली विक्री झकास चालली आहे !)

स्टॅंडवरच एका अगदी फाटक्या

माणसाला उत्सुकतेने अंक वाचताना पाहिले.

'तुम्ही वाचताय ते खोटं आहे का हो? नाही म्हणजे मी आपला गावाबाहेरला माणूस म्हणून विचारलं' त्याला हटकले.

'खरं असल्याशिवाय कसं छापील माणूसवाला. त्याला काय 'अंदर' व्हायचंय काय? हा दर्डा भलता खतरनाक माणूस आहे, पैसेवाला आहे.'

एका दुकानदाराला हाच प्रश्न केला. तो म्हणाला, 'सर्व लोक घाबरूनच आहेत. कोणीतरी हे करायलाच हवे होते. भरुटने चांगले काम केले. पण दर्डा त्याला सहजासहजी जाऊ देणार नाही. पुरेपूर किंमत मोजावी लागेल.' या वाक्याचा अर्थ फार भयानक असतो. ग्रामीण भागातल्या लोकांना तो बरोबर समजतो, बार्शीतल्या कोणालाही विचारून पहा हवे तर.

एका पेपर विकणाऱ्याला विचारले. त्याचे मत, 'हा माणूस भ्रष्ट आहे. ना. XXX यांच्यासाठी सगळ्या भानगडी हा माणूस पार पाडीत असतो. नामदार महाराज खूष, हे महाराजही सहीसलामत. १५ वर्षांपूर्वी एक साधे भाड्याचे घर सोडता याच्याजवळ काही नव्हते हे आम्ही पाहिलंय. आता किती गाड्या आहेत, बंगले आहेत, पैसा आहे त्याची मोजदाद करणे कठीण आहे. आपण सामान्य माणसे. या सर्व गोष्टींकडे पहात बसण्यापलीकडे आपल्या हातात काय आहे?'

एव्हाना भरुटचा लेख वाचला जाऊन चर्चेलाही सुरुवात झाली होती.

मारवाडी चौकात भरुटांची गाठ घेतली. त्यांचे कल्पना मुद्रणालय अगदी लहान आहे. सामान्य धंदेवाईक माणूस कागदाच्या टंचाईमुळे हैराण झाला होता. तरी दर्डांशी टक्कर घेण्याचा निर्धार मात्र पक्का होता.

'कोणाच्या श्रीमंत होण्याला माझा विरोध नाही. दर्डांनी लाखोपती नव्हे करोडोपती व्हावे. पण इतरांवर अन्याय करून मात्र नव्हे...'

भरुट सांगत होते, 'सहकारी संस्था काढून आमच्या नावावर या माणसाने लूट केली आहे. दर्डांच्या हाताखाली मी स्वतः मॅनेजर म्हणून काम केले आहे. अस्तित्वात नसलेल्या खोट्या संस्थांशी दर्डांनी कसे व्यवहार केले आहेत ते मला बरोबर माहीत आहेत. मला तरी दर्डा फसवू शकणार नाहीत...माझ्यावर खोटी केस करून मला देशोधडीला लावायचा प्रयत्न झाला. कारण त्यांच्या चक्रातून चिरडून निघायला मी विरोध केला म्हणून.'

जवाहरलाल दर्डांच्या कारभाराची माहिती श्री. भरुट यांनी ६ महिन्यांपूर्वी इंदिरा गांधी व सेंट्रल इंटेलिजन्सला पाठवली होती. त्यांची काहीच हालचाल नाही. उलट स्वीडनला अगदी बिनधास्त निघाले होते. इंदिरा गांधींना हे सर्व मान्य आहे असा अर्थ काढायचा काय?

जिल्ह्याच्या सहकारी उपनिबंधकांची विचित्र (?) तऱ्हा. आज पहातो, उद्या पहातो करून दर्डांच्या संस्थेची चौकशी करण्याचे काम हा माणूस पुढेच ढकलतो आहे. का? जवाहरलालजींनाच माहीत.

गावात फिरत असतांना डॉ. मारू भेटले. त्यांनी दर्डांच्या सहकारी घरांतून मला फिरवून आणले. ड्रेनेजची कहाणी ऐकवली, खराब रस्ते दाखवले.

डॉ. मारू सांगत होते, '१०० घरे बांधण्यासाठी आदर्श गृहनिर्माण मंडळाने कर्ज घेतले, 'घरे बांधली फक्त ५२. पण या ५२ माणसांकडून सर्व १०० घरांचे पैसे आता वसूल केले जात आहेत. इंजिनीअर्सनी दिलेल्या अहवालानुसार सर्वच्या सर्व १०० घरांचे मटेरीयल वापरले गेले असल्याचे दिसते. ही काय बंगाली जादू आहे ?'

(कदाचित याच वसाहतीत राहणाऱ्या आमदार ममदान्यांना ही जादू माहीत असेल. त्यांचे व दर्डांचे संबंध चांगले आहेत. दोघेही काँग्रेस नामक लूटमार सहकारी सोसायटीचे सभासद आहेत.)

मारूंनी सर्व रामायण ऐकवले. ही वसाहत कायदेशीरपणे अजून नगर परिषदेच्या हातात सोपवण्यात आलेली नाही. वसाहत असलेली जागा न. प. च्या नकाशात अजून कोरीच आहे; ह्या वसाहतीला न. प. च्या लेखी अस्तित्वच नाही. म्हणूनच सोयी सवलतीही नाहीत. (जाता जाता ही न. प. सुद्धा वांध्यात आहे. प्रशासक नेमण्यात आला आहे. कारण बऱ्याच बड्या धेंडांकडून कर वसूलीच करण्यात आलेली नाही.)

गावात फिरताना 'अबे दर्डा, राजीनामा देना बे' अशा घोषणा भिंतीवर वाचायला मिळाल्या. चौकशी केल्यावर हे विद्यार्थ्यांचे कर्तृत्व असल्याचे समजले. कॉलेजच्या (अमोलकचंद महाविद्यालय) पोरांनी गेल्यावर्षी दर्डांनी राजीनामा द्यावा या मागणीसाठी आंदोलन केले होते. मोर्चे, निदर्शने झाली होती. जाळपोळीची पाळी येऊन ठेपली होती. कारण ज्या संस्थेचे हे कॉलेज, त्या संस्थेचे दर्डा अध्यक्ष. कारभारात अनेक भानगडी. प्राध्यापकांना कित्येक महिने पगार नाही. इतक्या भानगडी की दर्डांनी राजीनामा दिल्यावर कोणीही संस्थेची जबाबदारी घ्यायला तयार नाही.

'हा माणूस लावाच धक्क्याला एकदा', अशी प्रतिक्रिया कॉलेजच्या अनेक प्राध्यापकांनी व विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. त्यांच्याही असंख्य तक्रारी आणि आरोप दर्डांवर होते.

आता पुढे काय ? पुढल्या लेखांकात आणखी भ्रष्टाचारावर प्रकाश टाकण्यात येईल ! पण तरीही पुढे काय होणार ? दर्डांवर याचा कोणता परिणाम होणार?

लोकांच्या प्रतिक्रिया मिश्र स्वरूपाच्या होत्या. 'कुछ तो भी होगा जरूर' असे म्हणणारे लोक होते आणि 'काही होणार नाही, जोपर्यंत वसंतराव नाईक दर्डांच्या पाठीशी उभे आहेत तोपर्यंत काहीच होणार नाही, असे कितीही भरुट बोंबलले तरीही' असे म्हणणारेही लोक भेटत होते.

मोठ्या लोकांच्या वाटेला जाण्याचे सामर्थ्य फारसे कुणात नसते. असा इथला अनुभव. तरीही निदान धोटे गट तरी काही करील अशी आशा वाटली. पण कठीण दिसते. धोट्यांना वेगळ्या विदर्भाशिवाय दुसरे काहीच नको आहे असे दिसते. त्यांची आणि दर्डांची किंवा नाईकांची लढाई लुटुपुटूचीच असते असे दिसते.

सध्यातरी यवतमाळ शहरात धमाल उडून गेली आहे.

—निळू दामले

# सांस्कृतिक क्रांतीचे पहिले पाऊल

चंद्रशेखर मराठे

'डेमॉक्रसी अँड राईट्स ऑफ मॅनेजमेंट' या आपल्या ग्रंथाच्या उपोद्घातात अमेरिकन अभ्यासक इलीगिन्झबर्ग म्हणतात, 'डेमॉक्रसी प्रीसपोझेस रीझनेबली वेल इन्फॉर्मड पीपल विथ रीझनेबल ॲक्सेस टू ऑल फॅक्ट्स' (लोकशाही राज्यपद्धती असे गृहित धरते की जनता बऱ्यापैकी जाणकार असून सर्व घटनांची माहिती करून घेण्याचा तिला वाजवी अधिकार आहे.) दुर्दैवाची गोष्ट अशी की रूढार्थाने लोकशाही राजवटीसुद्धा या ना त्या कारणाने जनतेपासून जास्तीत जास्त घटना लपवून ठेवण्याचा प्रयत्न करतात. राष्ट्रीय सुरक्षा व सार्वजनिक हित या दोन सबबी राज्यकर्त्यांना या कामी उपयोगी पडतात. लोकसभा अधिवेशन चालू असताना मंत्र्यांनी सार्वजनिक हिताची सबब सांगून माहिती देण्यास नकार दिला अशी उदाहरणे आपण नेहमीच वाचतो.

सार्वजनिक हिताची सबब कोणत्या बाबतीत सांगावयाची याचा काही धरबंधच राहिलेला नाही. बँकांचे राष्ट्रीयीकरण होण्याच्या अगोदर पंजाब नॅशनल बँकेच्या काही वरिष्ठ अधिकाऱ्यांवर लाचलुचपतीचे आरोप होते व त्यांची चौकशी सरकारी खात्यामार्फत चालू होती. त्यावेळी खासदारांनी या प्रकरणी प्रश्न विचारले असता मंत्र्यांनी सार्वजनिक हिताची सबब सांगून उत्तरे देण्यास नकार दिला. अगदी ताजे उदाहरण म्हणजे केंद्रीय अन्नमंत्र्यांनी धान्य आयातीचा आकडा सांगण्यास याच सबबीखाली नकार दिला. आपले लोकनियुक्त सरकार जनतेला विश्वासात घेऊ इच्छित नाही, जनतेला व तिच्या निर्वाचित प्रतिनिधींना काही सांगू इच्छित नाही याची अनेक उदाहरणे आहेत.

अशा परिस्थितीत वृत्तपत्रांवर फार मोठी जबाबदारी पडते. जनतेला कोणत्या गोष्टी समजणे आवश्यक आहे याचे भान ठेवून त्या निग्रहाने, वस्तुनिष्ठपणे, पुरेशा प्रमाणात जनतेसमोर मांडणे हे वृत्तपत्रकारांचे खरे काम आहे.

या दृष्टीने आपल्या मराठी पत्रसृष्टीकडे पाहता चित्र फारसे आशादायक नाही. वृत्तपत्रीय कागदाची प्रचंड टंचाई असताना, पाने कमी करणे, अंक बंद ठेवणे या व्यतिरिक्त आपल्या वृत्तपत्रीय कव्हरेजमध्ये काही पुनर्रचना करणे आवश्यक आहे याचा विचार कोणी फारसा केलेला दिसत नाही. वृत्तपत्रांच्या कामाची पद्धतही त्यांना एखाद्या घटनेचा, वृत्ताचा सातत्याने पाठपुरावा (फॉलो अप) करण्यास मदत करीत नाही. ज्या ज्या वेळी जो विषय गाजत असेल त्याची त्या त्या वेळी वृत्तपत्रे अगदी जुजबी पद्धतीने हाताळणी करीत असतात. एकादे वृत्त, एकादी घटना कोणीतरी एकदम फ्लॅश करते पण पुढे त्याबाबत काहीच दिले जात नाही. फॉलो अप न्यूज आणि इन्व्हेस्टिगेटिव्ह रिपोर्टिंग या दोन महत्त्वाच्या बाबतीत मराठी वृत्तपत्रे फार कच्ची वाटतात.

वृत्तपत्रांवर अनेक प्रकारच्या मर्यादा असतात, त्यांच्या कामाचा टेंपो फार असतो या कारणांबरोबरच वृत्तपत्राचे अर्थकारण व त्यापोटी त्यांना सांभाळावे लागणारे हितसंबंध हेही एक कारण या वस्तुस्थितीच्या पाठीमागे आहे. जनतेने आपल्या माहितीसाठी व शिक्षणासाठी साप्ताहिकांकडे वळावे तर तेथेही वेगळाच प्रकार दिसतो. खरे म्हणजे साप्ताहिकांना फॉलो अप न्यूज, इन्व्हेस्टिगेटिव्ह रिपोर्टिंग व डेप्थ रिपोर्टिंग या क्षेत्रात फार मोठा वाव आहे. टाईम, न्यूजवीक यासारखी साप्ताहिके केवळ या गोष्टींच्या सहाय्यानेच लोकमान्य बनली आहेत.

पण मराठी साप्ताहिक सृष्टी या बाबींकडे विशेष लक्ष देत नाही. सिनेमा, क्रीडा वगैरे क्षेत्राची साप्ताहिके वगळता इतर राजकीय-वैचारिक स्वरूपाची साप्ताहिके आहेत ती साधारणपणे वाचकांस काय देतात? काही समालोचनात्मक मजकूर, नाटक-सिनेमा, एखाद्या राजकीय तत्त्वज्ञानाचे घोळून घोळून केलेले विवेचन एवढीच त्यांची मजल दिसते. अगदी राजकीय स्वरूपाची साप्ताहिकेसुद्धा सिद्धांताच्या व आदर्शाच्या पातळीवर वावरून समाजवाद, खुली अर्थव्यवस्था, हिंदु संस्कृती, मार्क्सवाद, नियोजन वगैरे विषयांवर तोच तोच उहापोह करतात.

मला एक वाचक म्हणून असे वाटते की समाजवाद, मार्क्सवाद, आर्थिक धोरण, लोकशाही वगैरेविषयी काही नवीन सांगण्यासारखे आता फारसे उरलेले नाही. त्यातील तात्त्विक विश्लेषणाचा काही अभ्यासकांनाच उपयोग आहे. जनतेला नाही. या साऱ्या सिद्धांतांचा साधारण रोख काय आहे हे बहुतेकांना माहिती आहे. आदर्शांचे (मग ते कोणतेही असोत) वारंवार चर्वितचर्वण करून जनतेच्या राजकीय साक्षरतेत फारशी भर पडत नाही. सध्याच्या राजकीय वस्तुस्थितीपासून अलग पडलेली ही सारी चर्चा केवळ शब्दच्छल (सेमेंटिक्स) ठरते.

जनतेला कोणत्या गोष्टी सांगितल्याने तिची सारासार बुद्धी व राज्यकर्ते निवडण्याची क्षमता वाढेल?

१. सरकार आपले काम कसे करीत आहे याविषयी ठोस, तपशीलवार एकेक बाब घेऊन दिलेली माहिती.

२. सरकारच्या विविध योजनांचा प्रत्यक्ष परिणाम काय होत आहे याचे पृथक्करण.

३. लोकप्रतिनिधी आपले काम कसे करीत आहेत याचा आढावा.

४. सरकारी कायदे मोडणारे, सरकारच्या सवलतीचा गैरफायदा घेणारे, सत्तेचा दुरुपयोग करणारे या साऱ्यांच्या व्यवहारांची नावनिशीवार माहिती.

५. जनमानसात दृढमूल झालेल्या पण सध्याच्या स्थितीशी विसंगत ठरणाऱ्या काही संकल्पना (उदा. सहकार, पंचायती राज्य, मागास वर्गाचे कल्याण इत्यादी) तपासून त्यांचे व्यावहारिक पर्यवसान काय होत आहे याचा खुलासा.

या बाबी साप्ताहिके उत्तम प्रकारे हाताळू शकतील. त्यांनी जर त्या निर्धाराने व निस्पृहपणे हाताळल्या तर "तत्त्व योग्य पण अंमलबजावणी वाईट" या मोघम टीकेला काही अर्थ प्राप्त होईल व जनतेला राजकीय-आर्थिक भान सतत राहील.

या धोरणाचा आणखी एक फायदा असा की सारे गैरव्यवहार करून, जनतेचा द्रोह करून संबंधित मंडळी जी सामाजिक प्रतिष्ठा उपभोगू शकतात ती त्यांना उपभोगता येणार नाही, त्यांचे खरे स्वरूप जनतेपुढे राहील व जनता योग्य ते निर्णय घेऊ शकेल.

पंतप्रधान इंदिरागांधींनी नुकतेच एक आवाहन केले ते असे की साठेबाज नफेबाज यांना सामाजिक जीवन असह्य करावे. हे कसे करावे याचा खुलासा त्यांनी स्वत: सत्तेवर असल्याने अर्थातच केला नाही. पण याबाबत सिंहाचा वाटा वृत्तपत्रांनी उचलावयास हवा हे उघड आहे. प्रतिष्ठा ही आजकाल वृत्तपत्रीय माध्यमातूनच जास्त करून प्राप्त होते. विस्कळीत जनता समाजद्रोह्यांविरूद्ध सातत्याने उभी राहू शकत नाही. वृत्तपत्रे व साप्ताहिके यांनीच हे कार्य जनतेचे प्रतिनिधी म्हणून करावयास पाहिजे. पंतप्रधानांचे आवाहन त्यांना चीनमधील सांस्कृतिक क्रांतीच्या पार्श्वभूमीवरून सुचले नसेलच असे म्हणता येत नाही. चीनमधील सांस्कृतिक क्रांतीची सगळीच्या सगळी प्रत्यक्षता, दाहकता व सर्वंकषता येथे आणणे लोकशाहीच्या मर्यादांमुळे शक्य होणार नाही. पण सांस्कृतिक क्रांतीची पायलट योजना म्हणून वृत्तपत्रांना व साप्ताहिकांना समाजद्रोह्यांना उघडे पाडण्याचे कार्य करता येईल. त्यांनी केवळ व्यापारी, कारखानदार यांच्या पुरतेच मर्यादित राहण्याचे कारण नाही. सर्व पातळ्यांवरील लोक प्रतिनिधींचे व अधिकाऱ्यांचे व्यवहारही त्यांनी लोकहिताच्या कसोटीवर घासून जनतेपुढे ठेवावेत.

नावेगावे देऊन हे काम करावयाचे म्हणजे अब्रुनुकसानी वगैरेचे लचांड मागे लागले की काय असा एक विचार येतो. पण याबाबत योग्य ती काळजी घेतल्यास संबंधित मंडळी विशेष हालचाल करू शकत नाहीत असा अनुभव आहे. माणूस साप्ताहिकाने गेल्या काही

वर्षात अनेक समाजद्रोह्यांना सत्य स्वरूपात जनतेपुढे खुलासेवार उभे केले आहे. माणूसकारांवर कोणीही कोर्टदरबारांचा प्रसंग अजून तरी आणू शकलेले नाही. सध्या जनता इतकी तप्त आहे, की नाही म्हटले तरी समाजद्रोही थोडे फार डिफेन्सिव्ह झाले आहेत. या संधीचा फायदा घेऊन साऱ्या पत्रकारांनी एक सांस्कृतिक क्रांतीची मोहीम हाती घेण्यास काय हरकत आहे? वृत्तपत्र-साप्ताहिकांनी येथील निरक्षरतेचा बाऊ करू नये. अशी प्रकरणे योग्य प्रकारे उजेडात आणली तर ग्रामीण मंडळी सामुदायिकपणे त्यांचे वाचन करतात असा अनुभव आहे.

सुशिक्षित, विचारवंत राजकारणातून बाहेर फेकले गेल्याची खंत वारंवार व्यक्त होते. मला वाटते राजकारणातील खरे कार्य काय याविषयी या मंडळीची स्वच्छ कल्पना नसल्यानेच त्यांना ही खंत वाटत आहे. प्रचाराची सर्व माध्यमे सुशिक्षित, विचारवंत कुशलतेने हाताळू शकतात. या कौशल्याचा उपयोग प्रामाणिकपणे जनतेला शिक्षित व जागृत करण्यासाठी करीत राहणे हेच सुशिक्षितांचे राजकीय कार्य आहे असे मला तरी वाटते. आपण जे करू शकतो ते करावयाचे नाही व उगाच हळहळत बसायचे याला काय म्हणावे?

लोकशाही अधिक प्रगल्भ, अधिक मुक्त अधिक समंजस व्हावी असा प्रयत्न खरे तर वृत्तपत्रे-साप्ताहिके यांनी जिवाच्या कराराने करीत राहिले पाहिजे. राजकारण्यांना, सत्ताधाऱ्यांना लोकशाहीत जेवढे स्टेक आहे त्यापेक्षा कितीतरी अधिक स्टेक पत्रकारांना आहे. याचे कारण असे की राज्यकर्त्यांचा योगक्षेम लोकशाही बुडाली व हुकूमशाही वा अन्य प्रकारची राजवट आली तरी उत्तमच राहणार आहे. पत्रकारांचे तसे नाही. लोकशाही हा त्यांचा प्राणवायु आहे. काही तात्कालिक फायद्यासाठी ही मंडळी प्रस्थापितांच्या, सत्ताधीशांच्या समाजद्रोही व्यवहारावर पांघरुण घालू पाहतील, त्यांच्या भृकुटिभंगावर नाचत राहतील तर एक दिवस सत्ता आणि संपत्ती यांची युति इतकी बलिष्ठ होईल की लोकशाहीचा बुरखा वापरण्याचेही कारण तिला राहणार नाही. तेव्हा आमचे पत्रकार कोठे जातील?

पत्रकार व्यवसाय हा (भ्रष्ट) लोकशाहीचा बुरखा नसून (निरोगी) लोकशाहीचा गुरखा आहे असा दिलासा सर्व बाजूने भरडलेल्या, भयभीत झालेल्या जनतेस देण्याची आजची गरज आहे.

● ● ●


**एक जाहिरात**

आंतरराष्ट्रीय गॅस्ट्रिक ट्रबलसाठी मेहमी 'युनो'ज फ्रूटसॉल्ट वापरा!

आणि
फासाचा
दोर
सैल
झाला....



२० ऑक्टोबर १९२८ रोजी, आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यावरील अशांती प्रांतातील बेकावी शहरी मिसेस नॉव्हेल्सला पिस्तुलाची गोळी लागली व ती तीन दिवसांनी हॉस्पिटलमधे मरण पावली. तिच्या पतीवर पत्नीच्या खुनाचा आरोप आला व त्याला फाशीची शिक्षा झाली. पण........

**श्रीकृष्ण ठाकूर**

आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यावरील अशांती जिल्ह्यात बेकावी या शहरी डॉ.बेंजामीन नॉव्हेल्स रहात होते.त्यांच्या पत्नीच्या पाठीला २०-१०-१९२८ रोजी. ४५५ पिस्तुलातून सुटलेल्या गोळीने जखम झाली व त्यानंतर तीन दिवसानी ती त्या जखमेमुळे मरण पावली. त्यांच्या बंगल्यात ·४५५ पिस्तुलाच्या दोन गोळ्या मिळाल्या. त्यांच्या बेडरूमच्या जमिनीवर एक व वॉर्डरोबच्या आतल्या बाजूला दुसरी. मात्र घटनेच्या दिवशी पिस्तुलातून एकच गोळी झाडली होती. त्या दोन गोळ्यांपैकी एकीनं मिसेस नॉव्हेल्सचा प्राण घेतला. पण ती गोळी कोणती ?

त्या प्रश्नामागे या शतकातलं एक चमत्कारीक नाट्यच लपलेलं आहे. कोणत्या गोळीनं तिला मृत्यू आला ते ठरवलं गेलं.

डॉ. नॉव्हेल्सनं आपल्या पत्नीचा ब्रिटिश कॉलनीमधे खून केला असा आरोप त्याच्यावर ठेवला गेला. ही केस पुष्कळ कारणांनी गाजली. ज्या न्यायमूर्तीपुढे ही केस चालू होती तिथे ज्युरी नव्हते. न्यायमूर्ती एकच होते. अशांती कायद्याप्रमाणे डॉ. नॉव्हेल्सना वकिलाची मदत घेता आली नाही किंवा खालच्या कोर्टाच्या निकालाविरुद्ध वरच्या कोर्टात दादही मागता आली नाही. आता हा घटनात्मक पेचप्रसंग निर्माण झाला. इंग्लंडमधील प्रीव्ही कौन्सिलचे न्यायमूर्तीही या प्रश्नावर काही निर्णय घेऊ शकले नाहीत. डॉ. नॉव्हेल्सनं प्रीव्हि कौन्सिलकडे अपील केलं होतं.

ब्रिटीश नागरिक जर ब्रिटीश वसाहतीत रहात असेल व तिथे त्याच्यावर खुनासारखा आरोप असेल तर ज्युरी असलेल्या न्यायासनासमोर केस चालावी व ते ज्युरी ब्रिटीशच असावेत असा कायदा आहे. मॅग्नाचार्टामधे हे नमूद आहे. पण अतिदूरवरच्या छोट्या छोट्या ब्रिटीश कॉलनीमधे ही पद्धत स्वीकारायचीच का ? नॉव्हेल्सच्या केसमधे हा एक घटनात्मक मुद्दा निर्माण झाला.

नेहमीपेक्षा निराळी आणि प्रसिद्ध अशी ही केस आहे. या केसने असामान्य असा घटनात्मक पेचप्रसंगच निर्माण केला असं नव्हे तर बंदुका व पिस्तुलं यासंबंधीचे निरनिराळे प्रश्नही निर्माण केले. शिवाय मानवी मनाच्या एका उदात्त बाजूचं दर्शनही यात घडलं. प्रेम आणि निष्ठा, अगतिकता व चिडखोरपणा आणि साऱ्याच्या जोडीला हवेतील भयंकर ऊष्णता व मद्यसेवन.

२० ऑक्टोबर रोजी डॉक्टर व त्यांची पत्नी यानी त्यांच्या काही परिचिताना लंच–पार्टी दिली. ती व्यवस्थित झाली. डिस्ट्रिक्ट कमिशनर मि. थोट्रेफ मार्जिन, इन्स्पेटक्र ऑफ पब्लिक वर्क्स मि. अर्नेस्ट ब्रॅडफील्ड व एक व्यापारी मि. वॉल्टर ग्रोव्ह ही मंडळी लंचला आली होती. मिस्टर व मिसेस नॉव्हेल्सनं फारसं मद्य घेतलं नव्हतं किंवा ती भांडोरीही नव्हती. वास्तविक हे अनपेक्षित होतं, पण गोष्ट खरी होती. दुपारच्या सूर्याची तीव्र किरणं सभोवार पसरली होती, ऊष्णता तीव्र हीती. २ वाजून १५ मिनिटानी सर्व पाहुणे निघून गेले, तेव्हा मिस्टर व मिसेस नॉव्हेल्स दुपारची वामकुक्षी करावयास गेले. त्यांची ती दैनंदिन पद्धत होती. तिथल्या तीव्र उष्णतेमुळे ही एक आवश्यक बाब होऊन बसली होती.

दुपारचे साडेचार वाजले तेव्हाची गोष्ट. त्यावेळी त्यांचा तद्देशीय नोकर सॅम्सन हा चहाची तयारी करीत होता. त्यावेळी त्याने बेडरूममधून डॉ. नॉव्हेल्सचं ओरडणं ऐकलं. ‘दाखव मला’ डॉक्टर ओरडून म्हणाले. मग काही क्षणानी पिस्तुलाचा आवाज ऐकला व त्या पाठोपाठ मिसेस नॉव्हेल्स किंचाळली ‘आ–आ–’ सॅम्सननं मागाहून आपल्या साक्षीमधे हे असं असं, अशा अशा तऱ्हेने घडलं म्हणून सांगितलं. बेडरूममधे काय घडलं आहे ते सॅम्सननं पाहिलं असत तर फार बरं झालं असतं, पण तसं व्हायचं नव्हतं. तो धावत धावत डिस्ट्रीक्ट कमिशनर मार्जिन यांच्या बंगल्यावर गेला व काय ऐकलं ते त्यांना सांगितलं.

मार्जिन लगेच मोटारीत बसले व डॉ. नॉव्हेल्सच्या घरी आले. मोटार डॉ. नॉव्हेल्सच्या बंगल्यासमोर उभी करून त्यांनी डॉ. नॉव्हेल्सना हाक मारली. डॉ. नॉव्हेल्स लगेच बाहेर आले. त्यानी फक्त कमरेभोवती टॉवेल गुंडाळला होता. त्यांच्या अंगावर कोणताही कपडा नव्हता. ‘काही अपघात वगैरे घडला आहे का ?’ मार्जिननी चौकशी केली. ‘नाही’ डॉ. नॉव्हेल्स उद्गारले. ‘सारं काही ठीक आहे.’ मग आणखी काही न बोलता मार्जिन आपल्या मोटारीतून एका टेनीस- पार्टीला निघून गेले. त्यांना तिथे आमंत्रण होतं. सायंकाळी उशिरा जेव्हा ते घरी आले तेव्हा त्यांना कळलं की सॅम्पसन परत आला होता व मिसेस नॉव्हेल्स फार रडते असा त्याने निरोप ठेवला होता.

मार्जिनची स्थिती चमत्कारिक झाली. काहीतरी निश्चित कारण असल्याशिवाय ते डॉ. नॉवेलसच्या बंगल्यावर जाऊ शकत नव्हते आणि नॉवेल्सच्या

बंगल्यावर काहीतरी घडलं असावं हेही त्यांना पटत होतं. तेव्हा त्यांनी डॉक्टर नॉविल्सना एक चिठी लिहिली, "प्रिय डॉक्टर, तुमचा नोकर माझ्या बंगल्यावर तीन वेळा आला. त्यानं काही सांगितलं. पण तुमच्या खाजगी गोष्टीत माझा काही संबंध नाही, तेव्हा मी काही करू शकत नाही. मात्र माझा तुम्हाला काही उपयोग होण्यासारखा असेल तर त्वरित कळवा म्हणजे मी लगेच येतो." डॉ. नॉव्हेल्सना ही चिठी मिळाली पण त्यांनी उत्तर पाठवलं नाही. "मला कोणीच मदत करू शकणार नाही म्हणून मी उत्तर लिहिलं नाही." मागाहून डॉ. नॉव्हेल म्हणाले.

डॉ. नॉव्हेल्सकडून काही उत्तर आलं नाही तेव्हा डॉक्टर नॉव्हेल्सच्या नोकराचा काहीतरी घोटाळा झाला असावा अशी समजूत करून घेऊन मार्जिननी तो विषय मनातून काढून टाकला. तरीही दुसऱ्या दिवशी सकाळी उठून ते कुमासी येथे गेले व तेथील प्रॉव्हिन्शिअल कमिशनरना भेटले व मग कॉलनीचे सर्जन डॉ. गश यांना भेटले. तिघांच्या विचारविनिमयानं इथं काहीतरी घडलं असावं असं अनुमान निघालं व डॉक्टर आणि मिसेस नॉव्हेल्स यांना भेटणं आवश्यक आहे असं ठरलं. तेव्हा कुमासीहून निघून ते बेकावी येथे सायंकाळी चार वाजता पोचले. डॉक्टरांच्या बंगल्यावर स्मशानशांतता होती. डॉ. गश यांनी पुढे होऊन डॉक्टर नॉव्हेल्सच्या बंगल्यात शिरावं असं ठरलं.

डॉ. नॉव्हेल्स पायजमा घालून सिटिंगरूममध्ये बसले होते. गोंधळलेले, निराश झालेले असे ते दिसले. डॉक्टर गशनी अनुमान केलं की, या गृहस्थानं भरपूर नशापाणी केलं असावं. "तुमच्या इथं काहीतरी अपघात झाला असं कळलं ते खरं का?" डॉ. गशनी नॉव्हेल्सना विचारलं. तेव्हा डॉ. नॉव्हेल्स म्हणाले, "अपघात नव्हे पण घरगुती कुरबुरी चालू आहेत." आणि त्यांनी डॉ. गशना आपला खरचटलेला पाय दाखविला. "माझ्या पत्नीचे हे पराक्रम." ते म्हणाले, "काल सायंकाळी ती माझ्याशी सारखी भांडत होती. तेव्हा मी तिला म्हटलं की, जर तू इथून गेली नाहीस तर मी तुला गोळी घालीन."

डॉ. नॉव्हेल्सचं हे सांगणं आणि तद्देशीय नोकरानं मार्जिनला पिस्तुलाच्या आवाजाची सांगितलेली हकीगत एकत्र करता आपण मिसेस नॉव्हेल्सना पहाणं आवश्यक आहे, याची डॉ. गशना खात्री झाली व त्यांनी तशी इच्छा व्यक्त केली. "ठीक आहे." डॉ. नॉव्हेल्स म्हणाले व मग ते दोघे तिच्या शयनमंदिरात गेले. मिसेस नॉव्हेल्स बिछान्याकडे उभी होती. "मला दुखापत झाली आहे" ती म्हणाली. तेव्हा तिच्या परवानगीने डॉक्टर गशनी तिला तपासली. तिच्या डाव्या ढुंगणाला पिस्तुलाच्या गोळीने जखम केली होती. मामला गंभीर आहे याची डॉ. गशना कल्पना आली. गोळी डाव्या ढुंगणात लागून आत शिरली होती व पोटाच्या उजव्या बाजूने बाहेर पडून गेली होती. पोटाला पडलेलं भोक

गोळी देहात शिरताना पडलेल्या भोकापेक्षा मोठं होतं.

"हा अपघात कसा काय झाला?" डॉ. गशनी तिला विचारलं. तेव्हा ती म्हणाली, "डॉ. नॉव्हेल्स बिछान्यावर झोपले असता त्यांचं पिस्तूल मी पहात होते. मग ते पिस्तूल मी एका खुर्चीवर ठेवलं व काही वेळानं अनवधानानं त्या खुर्चीवर मी बसले. तिथून बसल्या बसल्याच पिस्तूल काढायचा मी प्रयत्न केला. पण माझ्या कपड्याच्या स्लीव्ह्ज्ना पिस्तुलचा चाप अडकला व पिस्तूल उडालं."

त्यावेळी डॉ. नॉव्हेल्स तिला म्हणाले, "अग, खरं खरं ते सांग." तेव्हा ती डॉ. नॉव्हेल्सना म्हणाली, "तोंड बंद कर बेंजी. तू काय बोलतो आहेस ते तुझं तुलाच कळत नाही."

मग डॉ. नॉव्हेल्स डॉ. गशना म्हणाले, "मग मी जखमेला आयोडीन लावून तिला विश्रांती घ्यायचा सल्ला दिला."

डॉ. गशनी मिसेस नॉव्हेल्सला कुमासी येथील हॉस्पिटलमधे दाखल करवलं.

तिला नेल्यानंतर डॉ. नॉव्हेल्स व डॉ. गश यांच्यामधे काहीतरी संभाषण झालं व केस चालू असताना डॉक्टर गशना त्यासंबंधी विचारण्यात आलं. पण ते बोलणं माझ्या लक्षात नाही असं डॉ. गश म्हणाले.

त्या कार्यकाळी मेजर हॅरी एडमंडस्टोन स्मीथ, अॅक्टींग पोलीस कमिशनर व त्याचा सहाय्यक हॅरॉल्ड पिल ग्रिम मॉरीस तिथे आले. त्यानी नॉव्हेल्सना सांगितलं की त्यांची पत्नी मृत्यू शय्येवरून स्टेटमेंट करू इच्छिते व त्यावेळी डॉ. नॉवेल्सनी तिथे हजर असणं आवश्यक आहे आणि आग्रह करून त्यानी डॉक्टरना आपणाबरोबर नेलं. तिला दुखापत केल्याच्या आरोपावरून त्यांना तिथे थांबविण्यात येईल असं पोलीस द्वयानी त्यांना सांगितलं. डॉ. नॉवेल्सना वाटलं की आपण आता पोलिसांच्या ताब्यात आरोपी म्हणून आहोत.

डॉ. नॉव्हेल्स बावरले होते, आजारी असल्यासारखे दिसत होते. ते एका खुर्चीवर बसले. त्यांच्या बंगल्यातून आवश्यक त्या वस्तू पोलीस गोळा करीत होते. त्यावेळी डॉ. नॉव्हेल्सनी आपल्या नेटीव्ह कंपाउंडरला सांगितले, 'मि. हॅन्सेन, जर यापुढे तुझी माझी परत भेट झाली नाही तर–' व त्यानी वर आकाशाकडे पाहून आपल्या गळ्यावरून बोट फिरविलं.

त्यानंतर कित्येकवेळा डॉ. नॉव्हेल्स म्हणाले होते, 'हा साराच प्रकार फार वाईट आहे. माझं काय होतं याची मला पर्वा नाही. मला माझ्या पत्नीच्या प्रकृतीची काळजी वाटते. जर का ती यात मरण पावली तर त्याचा अर्थ खून. मग मला मरेपर्यंत फाशी देण्यात येईल.' हॉस्पिटलमध्येसुद्धा ते वारंवार म्हणत "जर का ही मरण पावली तर ते मरण माझ्यामुळे."

डॉ. नॉव्हेल्सना हॉस्पिटलमध्ये त्यांच्या पत्नीकडे नेण्यात आलं. "मला शपथपूर्वक स्टेटमेंट करायचं आहे." मिसेस नॉव्हेल्स म्हणाली. तिच्याकडे

बायबल देण्यात आलं.

"अगदी खरं खरं काय ते सांग." डॉ. नॉव्हेल्स प्रेमळपणे तिला म्हणाले.

"सत्य आहे तेच मी सांगेन." ती म्हणाली. तिचं म्हणणं असं की मी पिस्तुलावर बसले व पिस्तूल लेसला अडकून उडालं.

तिनं प्रथम डॉ. गशना सांगितलं होतं की पिस्तूल स्लीव्हज्‌मध्ये अडकलं होतं. पुढे ती म्हणाली 'माझ्या पायावरून वहाणारं रक्त पाहीपर्यंत मला पिस्तुलाची गोळी लागली आहे याची मला कल्पनाच नव्हती...मला मृत्यूची भीती नाही."

मनुष्य मरताना जे विधान करतो ते कायदेशीर असतं व खरं असतं. कारण मनुष्य मरणाला घाबरतो. पण इथे मिसेस नॉव्हेल्स घाबरलेली नव्हती तेव्हा तिचं हे 'डाइंग स्टेटमेंट' पुरावा होऊ शकलं नाही. तिचा पति पोलिसांच्या अटकेत आहे असं जेव्हा तिला सांगितलं तेव्हा ती म्हणाली "ही जखम त्याच्यामुळे झालेली नाही. कारण जेव्हा ते पिस्तूल उडालं तेव्हा तो त्याच्या बिछान्यात झोपलेला होता."

२३ ऑक्टोबर रोजी १ वाजता मिसेस नॉव्हेल्स मरण पावली. आणि डॉ. नॉव्हेल्सवर तिच्या खुनाचा आरोप ठेवण्यात आला.

ॲक्टींग पोलीस कमिशनरची खात्री होती की मिसेस नॉव्हेल्सनं आत्महत्या केलेली नाही किंवा अपघातानेही तिला गोळी लागलेली नाही. कारण पिस्तुलाची गोळी तिला ज्या ठिकाणी लागली होती त्या ठिकाणी वरील दोन्ही गोष्टी अशक्य होत्या. ती आपल्या मृत्युशय्येवरील विधानानं पतीचं रक्षण करू पहाते आहे.

बंगल्याचा तपास करावयास जे पोलीस ऑफीसर्स पाठवले होते त्यांना तद्देशीय नोकरांच्या मदतीने ·४५५ कॅलिबरची दोन बुलेटस मिळाली. पिस्तुलाचा एकच आवाज झाला होता. सॅम्पसन आणि कोफी नावाचा दुसरा नोकर म्हणाला की त्याने एक बुलेट, ज्यादिवशी पिस्तूल झाडलं त्याचदिवशी सायंकाळी रक्ताच्या थारोळ्यात बेडरूममध्ये आढळलं. दुसरं बुलेट दुसऱ्या दिवशी सकाळी वॉर्डरोबमध्ये कपड्यांच्या खाली आढळलं, वॉर्डरोबच्या दरवाजाला पडलेलं भोक पोलिसांना दिसलं. पिस्तुलाचा आवाज झाला त्यापूर्वी त्या वॉर्डरोबला तसं भोक नव्हतं असं सॅम्पसन म्हणाला. बिछान्यावरील मच्छरदाणीला एक भोक पडलेलं पोलिसांना आढळलं. त्या भोकाच्या भोवती बुलटेमधील दारूच्या पावडरचा काळेपणा होता. तसंच बिछान्याच्या बाजूच्या टेबलाला ओझरती गोळी लागली असावी असा पोलिसांना संशय आला. बुलेट नंबर २ ने मिसेस नॉव्हेल्सना जखम झाली असावी असा पोलिसांचा तर्क होता; व त्या आधारे पोलिसानी गुन्ह्याची मांडणी आखली. जाण्यापूर्वी पोलिसानी ·४५५ वेब्ले रिव्हॉल्व्हर ताब्यात घेतलं. त्यामध्ये झाडलेल्या गोळीचं एक कव्हर होतं व न झाडलेल्या ५ गोळ्या होत्या.

१३ नोव्हेंबर रोजी कुमासी येथे डॉ. नॉव्हेल्सवर खटला सुरू झाला. खटला नऊ दिवस चालला. या केसमध्ये ज्यूरी नव्हते व आरोपीपक्षाला किंवा बचाव-पक्षाला वकिलांची मदत घेण्यास बंदी केली होती. अस्थानीचे ॲक्टींग सर्कीट जज्ज, हिज ऑनर फ्रँक जॉन जेम्स फॉस्टर मॅक्डोवेल यांच्यापुढे हा खटला चालला. पोलीस कमिशनर पिअरग्रूम यानी आरोप सादर केला व डॉ. नॉवेल्सना साक्षीदारांची उलट तपासणी घेण्यास व स्वतःचा बचाव करण्यास सांगण्यात आले.

फिर्यादी पक्षाची मदार तीन गोष्टी-वर होती. सॅम्पसननं सांगितलेली, २० ऑक्टोबर रोजी सायंकाळी पिस्तुलाचा आवाज ऐकल्याची कथा, संशय उत्पन्न करणारे डॉ. नॉव्हेल्सचे उद्गार व वागणूक व जखमेसंबंधीचा मेडिकल व पोलीस रिपोर्ट आणि त्या गोळीचा दुर्दैवी बळी. मिसेस नॉवेलसचं मरतानाच स्टेट-मेंट हे आपल्या पतीला वाचविण्याच्या उद्देशाने तिने केलेले उदात्त कृत्य असं मानून ते बाजूला सारण्यात आल. हा अपघात आहे हे तिचं म्हणणं खोटं असावं कारण एकदा ती म्हणते की पिस्तूल तिच्या स्लीव्हज्मध्ये अडकलं व दुसऱ्यांदा म्हणते की ते कपडयांच्या लेसमध्ये अडकलं. तिच्या बंगल्याचा तपास केला तेव्हा तिच्या कोणत्याही कपडयाला लेस असल्याचं आढळलं नाही.

ही अपघाताची कल्पना सॅम्सनच्या साक्षीनं आणखी बनवी ठरवी. त्याने सांगितले की, पिस्तुलाचा आवाज होण्यापूर्वी डॉ. नॉव्हेल्स आपल्या पत्नीला म्हणाले, 'दाखव मला.' जर का त्यांचे हे शब्द पिस्तुलाच्या आवाजानंतर निघाले असते तर 'मला तुझी जखम दाखव' असा अर्थ काढणं शक्य झालं असतं, व हा अपघात आहे हे पटलंही असतं. डॉ. नॉवेल्स आपल्या बचावामध्ये म्हणाले की पिस्तूल झाडलं गेल्यानंतर आपण ते शब्द उच्चारले.


# पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नानंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यात यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणांस त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतलेला आहे. आजही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागापासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

**प्रेम ट्रेडिंग कंपनी (S. N.) M. पो. कतरी सराय (गया)**

ज्यावेळी पिस्तुलाचा आवाज झाला तेव्हा आपण बिछान्यावर अर्धवट झोपेमध्ये होतो. त्यावेळी मिसेस नॉव्हेल्स ओरडली, 'अरे बापरे! मला पिस्तुलाची गोळी लागली आहे.' तेव्हा आपण तिला म्हणालो, 'दाखव मला.' सॅम्पसननं हा प्रसंग उलटया तऱ्हेनं सांगितला कारण आपण त्याला आवडत नव्हतो.

ते पुढे म्हणाले, 'माझ्या पत्नीने सांगितल्याप्रमाणे तिला अपघात झाला व जखम झाली. तसेच वॉर्डरोबमध्ये मिळालेली पिस्तुलाची गोळी ही आरोपी पक्षाच्या म्हणण्याप्रमाणे मी माझ्या पत्नीवर झाडलेली गोळी आहे, पण खरी स्थिती अशी आहे की कित्येक महिन्यापूर्वी माझ्या पत्नीने मला घाबरविण्यासाठी झाडलेली ती गोळी आहे, आणि रक्ताच्या थारोळयात सापडलेली गोळी हीच खरी गोळी की जिच्यामुळे माझ्या पत्नीला अपघात झाला."

इन्स्पेक्टर ऑफ पब्लीक वर्क्स मि. ब्रॅडफील्ड यांनी सांगितलं की वॉर्डरोबला पिस्तुलाच्या गोळीनं पडलेलं भोक आपण २० ऑक्टोबरपूर्वी पाहिलं होतं.

'तुमच्या चमत्कारीक वागण्याचा अर्थ काय?" असा प्रश्न डॉ. नॉव्हेल्सना विचारला. त्यावर ते म्हणाले, "माझ्या बायकोला अपघात झाला होता त्यामुळे माझं मन थाऱ्यावर नव्हतं, तशात मी भरपूर मद्य प्राशन केलं होतं. तसंच ही अपघाताची गोष्ट कोणाला सांगितली नव्हती. कारण लोक भलभलते प्रश्न विचारतील. माझ्या पत्नीला मीच औषधोपचार करीत होतो. तिला झालेली जखम मीच केली आहे असं मी सांगणार होतो पण माझ्या पत्नीनं त्या गोष्टीला विरोध केला. ती म्हणाली, "लोक त्याचा भलताच अर्थ करतील."

आरोपी पक्षाचं म्हणणं असं की, डॉ. नॉव्हेल्स व त्याची पत्नी या दोघांनी एकमेकाला वाचविण्यासाठी स्वतःवर आरोप घेण्याचा प्रयत्न केला. ज्यावेळी मिसेस नॉव्हेल्सनं अपघाताने गोळी उडाली असं सांगितलं तेव्हा डॉ. नॉव्हेल्सनं सत्य सांगितलं नाही. ती स्टेटमेंट करणार होती तेव्हा डॉ. नॉव्हेल्स तिला म्हणाला, "आता खरं काय ते सांग." याचा अर्थ यापूर्वी तिने जे सांगितलं ते खोटं सांगितलं होतं. व ते डॉ. नॉव्हेल्सचा बचाव करण्याच्या दृष्टीने सांगितलं होतं. कोर्टामध्ये अशी गुंतागुंतीची केस क्वचितच आली असेल. आता इथे सत्य काय?

हा पेच निर्माण झाला तेव्हा कोर्ट बुलेट थिअरीकडे वळलं. बुलेटस् व जखमा या सत्यपरिस्थितीदर्शक असतात. तेव्हा यातून जो निर्णय निघेल तो मिसेस नॉव्हेल्सच्या मृत्यूबाबतचं सत्य असेल.

मेजर एडमंडस्टोन स्मीथ व मि. विलग्रीम मॉरीस या दोन पोलीस अधिकाऱ्यांनी असं सांगितलं की वॉर्डरोबमधे जी गोळी सापडली त्याच गोळीने मिसेस नॉव्हेल्सला मृत्यू आला. व डॉ. नॉव्हेल्सनी आपल्या बिछान्यात झोपून ती गोळी झाडली होती. हे सिद्ध करण्यासाठी

त्यांनी २१ फूट लांबीची एक दोरी घेतली व डॉ. नॉव्हेल्सच्या बिछान्यातून त्या गोळीने कसकसा प्रवास केला व शेवटी वॉर्डरोब गाठला ते दर्शविलं. या थिअरीप्रमाणे डॉ. नॉव्हेल्सने गोळी झाडली, ती गोळी मच्छरदाणीतून बाहेर पडली, मच्छरदाणीला तिने एक भोक पाडलं व तिथे काळी पावडर लागली, नंतर ती गोळी बाजूच्या टेबलावर आपटली व मग ती मिसेस नॉव्हेल्सना पाठीमागे लागली. तेवढ्यात मिसेस नॉव्हेल्स वळल्या त्यामुळे गोळीचा प्रवास थोडासा बदलला. नंतर ती गोळी तिच्या देहातून बाहेर पडली. अजूनही त्या गोळीला फोर्स होता. ती गोळी वॉर्ड रोबवर आपटली व तिथे भोक पाडून आत गेली.

मच्छरदाणीला पूर्वी भोक नव्हतं व वॉर्डरोबलही नव्हतं हे घरातील नोकरानी सांगितलं त्यावर या थिअरीची मदार होती.

ही थिअरी पटण्यासारखी असली तरी यात काही उणीवा होत्या. व त्या उणीवांचं पोलीस स्पष्टीकरण करू शकले नाहीत. दुसरी बुलेट रक्ताच्या थारोळ्यात मिळाली ती तिथे कशी मिळाली? ती तिथे कुठून आली? म्हणजे मग अपघाताची कल्पना खरी असावी असे वाटू लागते. वॉर्डरोबमध्ये मिळालेल्या गोळीने जर मिसेस नॉव्हेल्स जखमी झाल्या तर दुसरी गोळी रक्ताच्या थारोळ्यात डॉ. नॉव्हेल्स व मिसेस नॉव्हेल्स यांनी टाकली का? हा अपघात आहे हे भासविण्यासाठी? पिस्तुल झाडल्याचा एकच आवाज ऐकला होता व पिस्तुलातून देखील एकच गोळी उडाली होती. आत फक्त एकच डिस्चार्ज रोल मिळालं होतं.

सत्य स्थितीवरून मिळालेला पुरावा व त्यावरून काढलेलं अनुमान याचा विचार करता सॅम्पसनच्या स्मरणशक्तीविषयी शंका येऊ लागते व इथे कोण कुणाचं रक्षण करण्याचा प्रयत्न करतो आहे असा प्रश्न निर्माण होतो.

पोलीसांच्या थिअरीमध्ये आणखी काही गुंतागुंत होती. डॉ. नॉव्हेल्सनी बिछान्यातून झाडलेल्या पिस्तुलाची गोळी शेवटी वॉर्डरोबमध्ये गेली. ते पिस्तूल उजवीकडून डावीकडे झाडलं असणार. पण मिसेस नॉव्हेल्सच्या देहातील जखम उजवीकडून डावीकडे नसून डावीकडून उजवीकडे होती. अशी जखम होण्यासाठी पिस्तुल कोणत्या परिस्थितीत झाडलं असावं? कल्पनाच करवत नाही. नव्हे ते अशक्य वाटतं. तसंच तिच्या देहातील जखमेची दिशा खालून वर होती व वॉर्डरोबमध्ये असलेलं भोक व तिच्या देहाला पाठीमागून लागलेली गोळी यांची दिशा खालून किंचित वर होती. मग ते पिस्तुल झाडलं तरी कुठून?

याचा अर्थ एकतर मिसेस नॉव्हेल्स खुर्चीवर उभ्या होत्या—पण त्या तशा उभ्या असतील याची शक्यताच नाही—अगर डॉ. नॉव्हेल्स खाली जमिनीवर झोपलेले असावेत—पण तेही तितकेच अशक्य आहे—म्हणजे मग मिसेस नॉव्हेल्स वाकलेली होती हीच एक

शक्यता उरते.

या गोष्टीविरूद्ध आरोपी पक्षानं पुष्कळ झटापट केली. मेजर एडमंडस्टोन स्मीथ म्हणाले की 'मी काही काळ बंदूक उडवावयास शिकविणारा होतो, वॉर्डरोबमधली गोळी पाठीमागच्या लाकडातून आरपार गेली नाही. कारण त्या गोळीची आरपार जाण्याची शक्ती, ती गोळी कुठूनतरी आरपार जाऊन आली असल्याकारणाने संपत् आली होती.


डॉ. गश म्हणाले की बंदुकीच्या किंवा पिस्तुलांच्या गोळ्यांनी झालेल्या जखमांचा आपणाला युद्धामध्ये भरपूर अनुभव आलेला आहे. मिसेस नॉव्हेल्सच्या शरीरात घुसलेली गोळी बाहेर आल्यावर खाली जमिनीवर पडली असावी. त्या गोळीमध्ये त्यावेळी तेवढीच शक्ती शिल्लक असते. त्यानंतर ती गोळी आणखी पंधरा फूट पुढे जाऊन तिथे असलेल्या लाकडी वॉर्डरोबला भोक पाडून आत जाऊ शकणार नाही. मिसेस नॉव्हेल्स बसलेली असेल अगर अर्धवट बसलेली असेल अशावेळी ती गोळी तिच्या अगदी जवळून उडालेली आहे.

डॉ. गशनी आरोपी पक्षाची थिअरी खोडून काढली. पण डॉ. नॉव्हेल्स म्हणाले ती अपघाताची थिअरी त्यानी उचलून धरली नाही.

डॉ. नॉव्हेल्सनी आपल्या पत्नीला स्वतःच औषधोपचार केल्यामुळे तिला झालेली जखम ही पिस्तूल जवळून झाडलं गेल्याने झालेली आहे की पिस्तूल लांबून झाडलं गेल्याने झालेली आहे हे सिद्ध करणारा पुरावा तिथे राहिला नाही. जर ती म्हणाली त्याप्रमाणे खुर्चीवर बसल्यावर पितूल उडालं हे खरं असेल तर जखमेच्या भोवतालची चामडी किंचित् भाजायला हवी व तिथे काळेपणा यायला हवा पण डॉ. नॉव्हेल्सनं त्या जखमेवर औषधोपचार केल्यामुळे हा आवश्यक पुरावा तिथे होता की नव्हता हे कळणं अशक्य झालं.


"आपण दररोज रात्री झोपताना भरलेलं पिस्तूल शेजारी ठेवून झोपतो कारण इथे चोरी–दरोडे यांची फार भीती आहे." डॉ. नॉव्हेल्स म्हणाले. त्या सायंकाळी देखील नेहमीप्रमाणे डॉ. नॉव्हेल्सनी आपलं पिस्तूल भरून ठेवलं. मिसेस नॉव्हेल्स आपल्या पतीला घाबरविण्यासाठी पिस्तूल घेई व त्यांना धाक दाखवी. त्या दिवशी तिने तसंच पिस्तूल घेतलं असेल व मग खुर्चीवर ठेवलं असेल.

मिसेस नॉव्हेल्स म्हणते त्याप्रमाणे ती खुर्चीवर बसल्यावर ते पिस्तूल उडालं असेल का ? पोलीस तज्ञाना या बाबतीत शंका वाटते. या पिस्तूलावर दोन क्रिया कराव्या लागतात् तेव्हाच ते उडतं. सुरक्षिततेसाठी ही सोय केलेली आहे. त्याचा जो 'हॅमर' आहे तो प्रथम मागे ओढावा लागतो व मग त्याचा चाप दाबावा लागतो. न्यायमूर्तींनी विचारलं जर तो चाप मिसेस नॉव्हेल्सच्या कपड्यात अडकला असेल तर रिव्हॉल्व्हरच्या वजनाने ते पिस्तूल उडू शकेल का ? तेव्हा तज्ञ म्हणाले असं



# थंड, ताज्या पाण्याची गंगा तुमच्या दारी!

तुम्ही वास्प अथवा मार्फर्स इजेक्टो पंप घरांत बसवा आणि घरापासून अगदी १०० मीटर लांब असलेल्या विहिरीतूनही, दिवसाचे २४ तास खेळते पाणी मिळवा.
आणि विहीर ६५ मीटर खोल असली तर?
काही चिंता नाही. पंप विहिरीच्या आत बसविण्याची मुळीच आवश्यकता नाही. पंप बसविण्यास आणि त्याची देखभाल करण्यासही काहीच त्रास पडत नाही. वर्षानुवर्षे अगदी दिवसाचे २४ तास प्रेशरसहित खेळते पाणी तुम्हाला मिळत राहील.
पंप बसविण्यास आणि त्याची देखभाल करण्यास आम्ही सर्व प्रकारची मदत करतो.



Wasp®

इजेक्टो जेट पंप बसवा

भेटा अथवा लिहा:
**वॉटर सप्लाय स्पेशॅलिस्टस् प्रा. लि.**

MAA

*Dattaram WS-147*

८, हमाम स्ट्रीट, मुंबई ४०० ००१

होईल असं वाटत नाही.

खुर्चीवर रक्ताचे डाग आढळले होते. त्या खुर्चीवर पिस्तूल होतं असं डॉ. नॉव्हेल्स व त्यांची पत्नी म्हणाली होती. हे रक्ताचे डाग अपघाताची शक्यता सिद्ध करतील व अशक्यताही सिद्ध करतील. बचाव पक्षाचं म्हणणं असं की हे डाग मिसेस नॉव्हेल्सचं म्हणणं खरं आहे हे सिद्ध करतात. आरोपी पक्षाचं म्हणणं असं की ज्यासेळी मिसेस नॉव्हेल्स खुर्चीवरून उठत होती तेव्हा पिस्तूल झाडलं गेलं. रक्ताचा प्रवाह सुरू होण्यापूर्वी ती खुर्चीपासून दूर झाली त्यामुळे थोडसं रक्त खुर्चीवर पडलं पण रक्ताचं थारोळं खुर्चीच्या बाजूला खाली जमिनीवर साचलं. हे रक्ताचं थारोळं, हा अपघात नव्हे हे सिद्ध करतं

पिस्तुलच्या गोळचा, जखम आणि एकूण दुर्दैवी घटना यासंबंधी समारोप करताना जज्ज मॅक्झोवेल्ट यानी रास्त म्हटलं आहे की वॉर्डरोबमधे मिळालेली गोळी हीच मिसेस नॉव्हेल्स्च्या दुर्दैवास कारणीभूत झालेली गोळी होय हे सिद्ध झालेलं नाही. खरा पुरावा, गोळीसंबंधीची परस्पर विरोधी विधानं हे सारं गोंधळ वाढविणारं आहे. मिसेस नॉव्हेल्सचा मृत्यू हा अपघाताने झाला होता की तो खून होता?

तिसऱ्या शक्यतेचा–मनुष्यवधाच्या शक्यतेचा – त्यानी निर्देष केला नाही. डॉ. नाव्हेल्सनी पत्नीचा खून करण्याचा हेतू नसताना बेदरकारपणे पिस्तूल झाडलं व त्याचा परिणाम असा झाला, असं त्यांनी म्हटलं नाही.

या केसच्या समारोपामधे हा एक मोठा दोष आहे. डॉ. नाव्हेल्सनी स्वतःच्या बचावांत सांगितलं की मी पत्नीचा खून करावा असा माझा उद्देश असण्यासंबंधी कोणताच पुरावा पुढे आलेला नाही. त्यावेळी म्हणजे १९२८ साली, कायद्यामधे स्वच्छ म्हटलं होतं की खुनाच्या आरोपामध्ये द्वेष किंवा खून करण्यास योग्य ती कारणं यांचा अभाव असला, व खून झालेला असला तरी तो खून नव्हे. हा दृष्टिकोन वस्तुस्थिती निदर्शक व योग्य असा होता. १९६१ मधे त्यांत बदल झाला. जिप्सी स्मिथ केसमुळे हाऊस ऑफ लॉर्डसनी ठरविलं की खून सिद्ध करण्यासाठी, खुनाचा हेतू सिद्ध केला पाहिजे असं नाही.

न्यायमूर्तींनी निकाल देताना म्हटलं की डॉ. नॉव्हेल्सच्या विरूद्धचा पुरावा भरपूर आहे, व डॉ. नॉव्हेल्स गुन्हेगार आहे याबद्दल माझ्या मनात संदेह नाही.

खुनाचा आरोप सिद्ध झाल्याने डॉ. नॉव्हेल्सला फाशीची शिक्षा झाली. अस्थानीच्या गव्हर्नरनी त्यावर ताबडतोब शिक्का मोर्तब केलं.

प्रत्येक ब्रिटिश नागरिकाला असलेला ज्यूरीचा हक्क नाकारला याबद्दल, तसेच वकीलाची मदत नाकारली याबद्दल डॉ. नॉव्हेल्सने तीव्र नापसंती व्यक्त केली. त्याच्या मित्रानी आवश्यक ते पैसे गोळा केले व प्रिव्ही कौन्सीलकडे अपील केलं. मार्च १९२९ मधे डॉ. नॉव्हेल्सला लंडनला नेला.

डॉ. नॉव्हेल्सनी अपील केलं ते चार मुद्यांवर. ज्यूरीशिवाय ही केस चालवा-

यला अस्थानी कोर्टाला हक्क नाही. ही केस गोल्डकोस्टला न्यायला हवी होती, कारण तिथे इंग्लीश ज्यूरी मिळू शकले असते. योग्य पुरावा असलातर ज्यूरीनी मला दोषी ठरवलं असतं पण तसं नसल्याने कायद्याचा दुबळेपणा प्रतीत झाला. न्यायमूर्तिनी आरोपी पक्षाकडून यत्किंचितही पुरावा मिळविलेला नाही आणि म्हणूनच डॉ. नॉव्हेलसना आपण निरपराध आहोत हे सिद्ध करणं भाग पडत आहे.

डॉ. नॉव्हेलसना ज्यूरी नाकारले याचाच मोठा गदारोळ उठला. बाकीचे मुद्दे हे कायद्याचा कीस काढणारे होते.

घटनात्मक प्रश्नावर मत देणं प्रीव्ही कौन्सीललाही जड जात होतं. फार दूरवरच्या ब्रिटिश कॉलनीमध्ये अशा तऱ्हेच्या गुन्ह्यासाठी आरोपीला बारा ब्रिटिश ज्यूरी द्यावेत की नाही या प्रश्नाला उत्तर दिलंच नाही. कारण तसे ज्यूरी मिळणं पुष्कळदा अशक्य असतं. प्रिव्ही कौन्सीलनं डॉ. नॉव्हेलसची शिक्षा रद्द केली. नॉव्हेलसनी अर्जात नमूद केलेल्या कारणा व्यतरिक्त इतर कारणा-साठी ती रद्द केली. ट्रायल जज्जनी स्वतःलाच चुकीच्या मार्गाने नेल्या कारणाने फार मोठा अन्याय झाला आहे. अपघाताची शक्यता बाजूला झाल्यावर ट्रायल जज्जला फक्त खूनच शिल्लक रहातो असं वाटलं. त्यांनी, हा मनुष्यवध असू शकेल या दृष्टीने एकही प्रश्न विचारला नाही किंवा तसा विचारपण केला नाही.

डॉक्टर मुक्त झाले. त्यांची ही केस इंग्लंडमध्य किंवा स्कॉटलंडमध्ये चालली असती तर बचावाच्या वकीलानी आरोपीपक्षाचे मुद्दे भराभर फाडून टाकले असते.

डॉक्टर नॉव्हेलस १९३३ मध्ये मरण पावले. त्यामुळे त्यांची पत्नी खरो-खरीच अपघाताने मरण पावली की नॉव्हेलसच्या गोळीने मरण पावली, आणि नॉव्हेलसच्या गोळीने जर ती मरण पावली असेल तर तो खून होता की मनुष्यवध होता हे सारं आता कायमचं गुलदस्तात रहाणार आहे. एक गोष्ट मात्र खरी की पिस्तुलाच्या गोळ्या व त्यांचे भ्रमणाचे मार्ग याबद्दल कधी कधी तज्ञांमधेदेखील एकमत होत नाही.

या केसमध्ये मानवी स्वभावाचं एक मनोज्ञ दर्शन घडलं. आपल्या वैवाहीक जीवनात डॉ. नॉव्हेलस व त्यांची पत्नी सदैव भांडत होती. तरी शेवटचा क्षण येताच तिनं त्याला क्षमा केली, नव्हे प्रेमाचा वर्षाव केला, व जर डॉ. नॉव्हेलस खरोखरीच गुन्हेगार होता असे असले तरी तो गुन्हेगार नाही हे मरतामरताही सांगितलं.

● ● ●

आधुनिक तंत्रविज्ञानातील

# चीनची एकलव्य विद्या

**विज्ञान क्षेत्रात स्वयंपूर्णता सिद्ध करून, आघाडीची सूत्रे आपल्याच हाती ठेवणे, आणि स्वतःच्या प्रयत्नांवरच मजल गाठणे—हे माओचे सूत्र आहे. विज्ञान क्षेत्रातील चीनच्या प्रगतीचे हे ओझरते दर्शन.**

**जिप्सी मधुकांत**

औद्योगिक प्रगतीसाठी आधुनिक तंत्र-ज्ञानाचा विकास, कुशल, उत्साही मनुष्यबळ, कच्च्या मालाचा भरपूर पुरवठा आणि राजकीय स्थिरता या गोष्टींची गरज असते. चीनमध्ये या गोष्टी उत्तम प्रमाणात जमून आल्या आहेत, असे अलीकडे चीनला भेट देणाऱ्या पाश्चात्य निरीक्षकांना आढळून आले आहे. मध्यंतरी तर एक बातमी नवलपूर्ण होती. उद्याच्या प्रगत तंत्र-वैज्ञानिक विश्वातील विज्ञान-भाषा कोणती असणार, अशी चर्चा जागतिक ख्यातीच्या गणकयंत्रज्ञात चालली होती. त्या चर्चेत रशियन शास्त्रज्ञांनी केलेले विधान अर्थपूर्ण आणि मार्मिक होते. चीनने स्वतःच गणकयंत्रे इ. अत्याधुनिक तंत्राचा स्वतःहून एवढा विकास केला आहे की, चिनी भाषेच्या माध्यमातूनच हे अत्युच्च ज्ञान उद्या प्राप्त करावे लागेल, असे म्हटले तर आश्चर्य वाटायला नको! ही बातमी अनेकांना आठवत असेल. रशियन शास्त्रज्ञांचे हे उद्‌गार आहेत, हेही विशेष. गेल्या दशकाच्या अखेरीपर्यंत चीनला तंत्र-क्षेत्रात रशियावर पुष्कळच अवलंबून रहावे लागत होते. आज गणकयंत्रे, कंट्रोल सिस्टीम्स, सेमी-कंडक्टर सिस्टीम्स इ. उच्च प्रगत शाखात चीनची प्रगती विलक्षण आहे. फार थोडे पोलाद चीनला गतवर्षी आयात करावे लागले. खनिज तेलाचा साठा तर पुरून उरेल इतका आहे. विजेचे उत्पादन १५० बिलियन किलोवॅट अवर्स होते. आदी सर्व गोष्टींचा पाश्चात्य निरीक्षकांनी घेतलेला आढावा लक्षात घेता, चीन स्वसामर्थ्यावर भरारी मारू लागला आहे, हे निश्चित जाणवते. शिवाय अण्वस्त्र चाचण्या चालू आहेतच.

चीनमध्ये कोळसा व जलेविद्युत् शक्तींची समृद्धी आहे. मांचुरियातील ता चिंग क्षेत्रात भरपूर तेल उपलब्ध होऊ शकेल. पेकिंग ऑईल केमिकल्स कॉम्प्लेक्समध्ये ८ हजार मे. टन रिफाइंड ऑईल रोज निर्माण होते. पेट्रोकेमिकल्स उद्योगातील हे संचलन संपूर्ण स्वयंचलितही आहे. तीस फूट कंट्रोल पॅनेल या उद्योग फॅक्टरीत आहे. शिवाय फॅक्टरीतील सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्याचा शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी वापर केला जातो. पेकिंगच्या या फॅक्टरीत उप प्लँटस् आहेत, ११ हजार कर्मचारी आहेत. यांच्याच जोडीला आणखी एका प्लँटची बांधणीही चालू असून ती त्वरितच पूर्ण होईल. सिंथेसिस प्लॅस्टिक्स, डेक्रानची निर्मिती त्यात होईल, असे सांगण्यात आले.

## स्वतंत्र प्रयोग

चीनमध्ये प्रगत औद्योगिक रचनेची इतरही लक्षणे निरीक्षकांना दिसून येतात. १२ हजार टनी हैड्रॉलिक प्रेस कार्यवाहीत आहे, जगात इतकी शक्तीशाली केवळ दहाच मशिन्स आहेत, असे सांगितले जाते. शांघाय येथे चीनने एक कायम औद्योगिक प्रदर्शनाची रचना केली आहे. तेथे अद्यतन औद्योगिक प्रगतीचे दर्शन घडवले जाते. तेथे ३ लक्ष किलोवॅट हाय टेंपरेचर टर्बोजनरेटर मांडला आहे. असे अनेक जनरेटर्स प्रत्यक्ष कार्यवाहीत आहेत, असे सांगण्यात आले. त्या प्रदर्शनात अत्याधुनिक अशा अनेक मशिनरी, बोटी इ. सुद्धां होत्या. नौकानयनाच्या क्षेत्रातही आघाडी मारण्याचा प्रयत्न चालू आहे. अण्वस्त्र, जेट एअरक्राफ्ट इ. आहेतच. रशियन मिग फायटरची नक्कल तेथे आढळते. कमर्शियल जेटमात्र चीन तयार करीत नाही, असे दिसते. आपल्या अण्वस्त्रांच्या चाचण्या चीनने वेळोवेळी केलेल्या आहेतच. अनेक हैड्रोजन बाँबची निर्मिती झालेली आहे. यू २३५ साठी अनेक गॅस सेंट्रिफ्यूज प्लँटस बांधले आहेत. त्यासाठी लेसर हीटिंग मेथड अंमलात आणली आहे. या प्रकारात प्लाझ्मापिंच ही पद्धत आता चीनच्या दृष्टीने जुनी झाली आहे! कंट्रोल्ड फ्यूजन या प्रक्रियेसाठी ही अत्यंत गुंतागुंतीची व आधुनिक पद्धत असूनही चीनने नवे संशोधन करून लेसरमध्ये लक्ष घातले. डिफेक्टींग फ्लक्स ऑफ न्यूट्रान पर्यंत ते पोचले आहेत. तथापी, न्यूट्रान स्पेक्ट्रमने अजून या पद्धतीचा पडताळा पहायचा आहे, असे शास्त्रज्ञांचे मत आहे. उपग्रह सोडणारे चीन हे ५ वे राष्ट्र आहे. लष्करी अण्वस्त्रांची नेहमीच चाचणी चालू असते.

## आघाडीची सूत्रे आपल्या हाती

उच्च वैज्ञानिक तंत्रज्ञानाच्या बाबतीत चीन पूर्वी रशियावर अवलंबून होता. १९६० पर्यंत हे परस्पर सहकार्याचे युग होते. ६० नंतरच्या काळात मतभेद होऊन रशियाशी फाटले आणि चीनने स्व-तंत्र ज्ञानावर भर दिला. प्रयोगशाळांमध्ये माओची वचने लावण्यात आली–Maintaining independence and keeping the initia-

tive in our hands and relying on our own efforts. या वचनातील तथ्य चिनी जनतेने पुरेपूर व्यवहारात उतरवले आहे. या महासत्तेच्या नावाने रशियाने आजकाल सर्व पातळीवरून खडे फोडणे चालवले आहे. आपल्या राष्ट्रीय दिनाच्या दिवशी अण्वस्त्रांबरोबरच सिलिकॉन सेमिकंडक्टरसारख्या इलेक्ट्रॉनिक कंडक्टर टेक्नॉलॉजीचेही प्रदर्शन केले जाते.

विद्यापीठे, तंत्रसंस्था, उद्योगसंस्था यांच्याद्वारा हे केले जाते. १९५८ पासून संशोधनावर विशेष भर देण्यात आला. वेगवेगळ्या तंत्रशाखांतून आणखी विशेषीकरणावर संशोधन होते. तसेच त्यांच्यातर्फे संशोधनपूर्ण नियतकालिकेसुद्धा उच्च दर्जाची प्रसिद्ध होतात. अर्थात चिनी भाषेत. त्याचबरोबर पाश्चात्य जगात प्रकाशित होणारी नामवंत नियतकालिके नियमितपणे मागवून त्यांची भाषांतरे केली जातात. मायक्रोवेव्ह इंटिग्रेटेड सर्किट अँड लेसर्स इ. सारख्या नियतकालिकातील भाषांतरे होतात. शाळा, विद्यापीठे यातून प्रत्यक्ष प्रयोग, निष्कर्ष तपासणे, प्रकल्पांसाठी आरेखन करणे ही कामे केली जातात. शाळांमध्ये माओची वचने लावलेली आहेत : 'The greatest enemy of learning is self satisfaction.' तसेच 'The beginning of serious learning is dissatisfaction with oneself.' प्रखर आणि अविरत प्रयत्नांबरोबरच माओच्या तत्त्वज्ञानाचे हे जहाल डोसही नित्य पाजले जातात. याबाबतीत तर असेही सांगितले जाते की, फिजिक्सच्या उच्च अभ्यासक्रमातही एखादा सिद्धांत विशद करताना, त्याचे निष्कर्ष माओच्या तत्त्वज्ञानामुळे खरे आहेत, असे सांगितले जाते ! बहुतांशी प्रयोगातील यशाची सिद्धी त्यासाठी लागणाऱ्या उपकरणातील, साधनातील स्वयंपूर्णतेत आहे. असे पाश्चात्य निरीक्षक सांगतात. एका मिनिटात अल्ट्रासोनिक बाँडरला १० वायर्स १ मिनिटात जोडल्या जातात, असे त्यांना आढळले आहे. कर्मचाऱ्यांची ही गती उत्तम आहे. अशा काही इलेक्ट्रॉनिक संस्था गृहिणींनी ट्रेनिंग घेऊन चालवल्या आहेत.

## श्रमाशी जोडलेले शिक्षण

माओच्या मते सर्वांनाच उच्च शिक्षणाची खरंच गरज नाही. अनेक गोष्टीसाठी त्या त्या तंत्रशाखेतले प्राविण्य असले म्हणजे पुरे, असे त्याचे प्रतिपादन आहे. विशेषीकरणासाठी काही थोडक्या लोकांनी अत्युच्च शिक्षण घेतले तरी पुरे आहे. फॅक्टरीतल्या कामगाराचे शिक्षण साधारणपणे शालांत परीक्षेपर्यंत असते. या शिक्षणात अर्थातच तंत्रज्ञानाचा पुरेसा अंतर्भाव असतो. त्यामुळे शालेय शिक्षणानंतर विशिष्ट अवधीचा कोर्स, ट्रेनिंग विद्यार्थ्याला देऊन त्यांना प्रत्यक्ष कार्यात लगेच पाठवण्यात येते. पुढे ते तेथेच अधिक कुशलता प्राप्त करतात. प्रत्यक्ष कृती व उपयोगावर या पद्धतीचा जोर आहे आणि या सर्व संस्थातून कसलेले, कुशल, मुरलेले राजकीय कार्यकर्तेच संचालन करीत असतात ! माओ म्हणतो : Education must

serve proletarian politics and be combined with production labour. विद्यापीठाकडूनच अनेक कारखान्यांचे संचालन होत असते.

अलीकडच्या काळात रशियाची मदत मुळीच नाही, तरीही चीनचे उत्पादन अनेक क्षेत्रात सतत वाढते आहे, असे आढळून आले आहे. मध्यंतरी 'हनुमान उडी'च्या फसलेल्या प्रयोगाने पिछेहाट झाली होती, हे सर्वश्रुत आहे. पण पुढे प्रगतीचा सोपान कोलमडला नाही. उच्च शिक्षणातही सर्व प्राध्यापक महाशयांना काहीतरी श्रमकार्य करणे, हे अत्यावश्यक मानले आहे. मग ते बागेत भाजीपाला पिकवणे असो वा कामगारांच्या औद्योगिक अडचणींची माहिती करून घेणे असो. संशोधन कार्य आणि प्रत्यक्ष समस्या यात एकसूत्रता आणली गेली. चीनच्या नवऔद्योगिक प्रगतीसाठी ह्याची गरजच होती, असे निरीक्षकांचे मत आहे. १०० मेगॅहर्त्झचे गणकयंत्र, ४४ पायकोसेकंदाचा 'त्रिलीअंथ' सेकंदांश मोजणारा ऑसिलोस्कोप चीनचे शास्त्रज्ञ वापरीत आहेत. अमेरिकेत २८ पायकोसेकंदाचा ओसिलोस्कोप उपलब्ध आहे. अशा प्रकारे अनेक क्षेत्रात नवतंत्राचा वापर केला जात आहे. शेतातील पिकांचे जंतूपासून संरक्षण करण्यासाठी अल्ट्राव्हायोलेट इनसेक्ट किलरचा वापर, चामडयाच्या तुकडयांपासून उपयोगी वस्तू आदीबाबत शासनाकडून सतत मार्गदर्शन होत असते. जपानमध्ये १२ दशलक्ष टेलिव्हिजन सेट आहेत, तर चीनमध्ये त्याचे प्रमाण निम्मे आहे, आणि त्याचाही वापर बहुतांशी जनतेला शिक्षण आणि शासनाचा प्रचार यासाठी होतो. उद्योगतंत्र आणि शेतीआघाडी या दोन्ही क्षेत्रात चीन अत्यंत वेगाने प्रगती करीत आहे. त्याचबरोबर संरक्षणसिद्धतेतही महासत्तांना भयभीत करून सोडीत आहे!

● ● ●


# फिडेल, चे आणि क्रांती

**अरुण साधू । मूल्य : सात रुपये । राजहंस प्रकाशन**

# स्वातंत्र्योत्तर भारतीय वास्तुकला

## व्यवसायाच्या वेदीवर कलागुणांची आहुती

ब्रिटनचे माजी पंतप्रधान सर विन्स्टन चर्चिल यांनी एकदा मोठं मार्मिक विधान केलं होतं. ते म्हणजे 'वुई बिल्ड अवर बिल्डींग्ज फर्स्ट ॲण्ड देन दे बिल्ड अस' एका थोर विचारवंताने केलेल्या या विधानात केवढा प्रत्ययकारी अर्थ भरलेला आहे. आपण ज्या वास्तू बांधतो त्या आपल्या समाजाचे, अभिरुचीचे, प्रगतीचे मूर्तिमंत प्रतीक असतात. त्याद्वारे तत्कालीन समाजाचे जणू प्रतिबिंब घडविले जाते. भारतीय वास्तुकलेची थोर परंपरा, सौंदर्यपूर्ण शैली आपले अस्तित्व बाराव्या शतकानंतर सातत्याने कधीच टिकवू शकली नाही. परकीयांच्या शैलीप्रभावाने, तंत्रप्रभावाने त्यात वेळोवेळी बदल होत गेले. ही स्थिती थेट विसाव्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत चालू होती. आधुनिक वास्तुकलेच्या उदयामुळे भारतीय वास्तुकलेची स्थिती अधिकच शोचनीय झाली. कारण प्राचीन रचनातत्वांचा संपूर्णपणे त्याग करून आधुनिकतेला अंगिकृत करण्यास आमचा समाज कधीच तयार नव्हता. अर्थातच ना धड प्राचीन ना धड आधुनिक अशी ओंगळवाणी नवी भारतीय शैली स्थापन होऊ लागली. इ. स. १९०० ते १९५० या काळात या अर्धवट शैलीने तत्कालीन लोकांवर एकप्रकारे फार मोठा सूड उगवला. व तो म्हणजे त्याची सौंदर्यदृष्टी साफ मारून टाकली व हे सौंदर्यदृष्टी हीनतचे संस्कार गेल्या अर्ध शतकातील पिढ्यांवर झाले. या काळात वास्तुकलेकडे कुणी 'कला' या दृष्टीकोनातून बघण्यास तयारच नव्हते. या काळातले कोणतेही जुने घर बघितल्यास अंधाऱ्या खोल्या, वायुवीजनाचा अभाव असे तांत्रिक दोष जरी वगळले तरी कलापूर्ण अशी कोणतीच गोष्ट दृष्टोत्पत्तीस येत नाही. याला कारण तत्कालीन कलापराङ्मुख समाज हेच होय.

आता या पार्श्वभूमीवर आजच्या भारतीय वास्तुकलेचा अभ्यास केल्यास तिचा दर्जा एवढ्या खालच्या पातळीवरचा का आहे याचे उत्तर सहज समजू शकते. या शतकातील पहिल्या व दुसऱ्या अर्धशतकातील भारतीय वास्तुकलेत फरक एवढाच आढळतो की आजच्या शैलीने आधुनिकतेचा पुरस्कार अधिक केलेला आहे. व यात समाधानाची गोष्ट

अशी की हा आधुनिकता अंगिकृत करण्याचा वेग गेल्या दहा-पंधरा वर्षात प्रचंड वेगाने वाढत आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी आपल्या एका निबंधात असे विधान केले होते की, 'आपला देश पाश्चिमात्य जगाच्या दोनशे वर्षे मागे आहे.' गेल्या काही वर्षांच्या प्रगतीने हा काळ पन्नास वर्षे एवढाच केला आहे. याला प्रत्यक्ष पुरावा देखील सांगता येईल. आज भारतातील प्रमुख शहरांत ज्या प्रकारे वीस पंचवीस मजली इमारती बांधल्या जात आहे, ज्यांना आपण 'गगनचुंबी' म्हणून संबोधतो, तशा पाश्चिमात्य देशात या शतकाच्या सुरुवातीला बांधल्या गेल्या आहेत. यावरून आपण पन्नास वर्षे त्यांच्या मागे आहोत हे सिद्ध होते.

भारताला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी ब्रिटिशांनी अनेक वास्तुरचना केल्या. मुंबई, दिल्ली, कलकत्ता येथील तत्कालीन वास्तू आजही प्रेक्षणीय वाटतात. उदाहरणार्थ नव्या दिल्लीची रचना, मुंबईतील व्ही. टी. स्टेशन, कॉर्पोरेशन वास्तू, जी. पी. ओ. इत्यादी. तसेच कलकत्त्यातील व्हिक्टोरिया मेमोरियल, या वास्तूंची रचना सतराव्या, अठराव्या शतकात पाश्चिमात्य देशात प्रचलीत असलेल्या शैलीवर आधारलेली आहे. स्वातंत्र्योत्तर काळात आधुनिकतेचे वारे भारतात इतक्या प्रचंड वेगाने वाहू लागले की वरील वास्तूची शैली अत्यल्प काळात इतिहासजमा झाली.

इ. स. १९५० साली पंडीत नेहरुंचे आधुनिक शहर रचनेचे स्वप्न चंदीगढच्या उभारणीने पुरे झाले. ला कर्बुझीए या जागतिक कीर्तीच्या प्रतिभाशाली वास्तुतज्ञाच्या शैलीचा प्रभाव केवळ भारतातील नव्हे तर जगातील अनेक वास्तुतज्ञावर पडला. या नगररचनेमुळे जागतिक वास्तुकलेला नवी दिशा मिळाली. स्वातंत्र्योत्तर काळात आणखी एका जगप्रसिद्ध वास्तुतज्ञाच्या प्रतिभेने भारतात आकार घेतला व तो म्हणजे अहमदाबाद येथे लुई कान्ह या अमेरिकन वास्तुतज्ञाने अगदी अलीकडे इंडियन इन्स्टीटयूट ऑफ मॅनेजमेंटच्या वास्तुसमुहाची केलेली नितांत सुंदर रचना होय. हेच काय ते भारताचे जागतिक वास्तुकलेच्या बाजारपेठेतील दर्जेदार भांडवल अनेक वर्षे होते.

स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय वास्तुतज्ञाची जी घडण होत गेली तीच मुळी कच्च्या तत्वांवर आधारलेली होती. विचारशीलतेचा अभाव हेच आजच्या निराशाजनक सद्यस्थितीचे प्रमुख कारण आहे व आजच्या भारतीय वास्तुतज्ञाची विचारप्रणाली कोणतेही धाडस करण्यास वा नवविचार, कल्पना अंमलात आणण्यास तयार नाही. परंपरागत चालत आलेले जुने संकेत आजही तो पाळतो. त्यामुळे मागील शतकांतील ओंगळवाण्या शैलीचीच आधुनिक रचना साहित्याने उजळणी होत आहे. अवकाश, आकार, रचना, साहित्य ही वास्तुकलेची मूलभूत अंगे. प्रत्येक अंग म्हणजे कलानिर्मितीचे अमर्याद क्षेत्र असते. परंतु फक्त त्यांना नवकल्पनांची, विचारांची साथ मिळाली तरच काही कलात्मक

वास्तू निर्माण होतात. पण आपण इथेच कमी पडतो.

आजच्या भारतीय वास्तुकलेच्या हलक्या दर्जास, तिचा व्यवसायही कारणीभूत मानावा लागेल. भारतीय वास्तुतज्ञ वास्तुकला निर्मिती करीत नाही तर तिचा व्यवसाय करतो. एखादी वास्तु बांधताना तिच्या खर्चाकडे, सौंदर्याहून अधिक लक्ष दिले जाते. स्वातंत्र्योत्तर काळात या व्यवसायाचे स्वरूप अधिक स्पर्धात्मक झाले. वास्तुतज्ञ कार्यालय ही वास्तु बांधण्याचा कारखाना होऊ लागली. अर्थातच एखाद्या वास्तुतज्ञास अधिक रचना कराव्या लागल्या तर वास्तूच्या कलागुणांपेक्षा खर्चाकडे अधिक अवधान दिले जाई व प्रत्येक वास्तुरचनेसाठी सर्वस्वी नवकल्पना शोधणे, ती कार्यान्वित करणे इत्यादीसाठी लागणारा वेळ घालविण्यास वास्तुतज्ञ तयार नसतात. परिणामतः नवरचना निर्मिती होणे अत्यंत दुर्मिळ होत गेले. ही झाली आघाडीच्या वास्तुतज्ञाची स्थिती, यांना कमी वेळात अधिकाधिक वास्तूची रचना करून अधिक पैसा फी म्हणून मिळवण्याची इच्छा होती. असामान्य वास्तुनिर्मिती अशा घाईघाईने केलेल्या विचारांतून वा फी किती मिळेल या अपेक्षेतून निर्माण होत नसते. त्यासाठी कलानिर्मितीची अंतरीची इच्छा लागते. दुसरा वर्गही वास्तुतज्ञांचा पाडता येईल की ज्यांच्याकडे मोजकीच कामे असतात. परंतु अशा वास्तुतज्ञांकडे एकतर कल्पना शक्तीचा अभाव असतो अथवा त्यांची प्रवृत्ती रूढीप्रिय असते. त्यामुळेच आजकाल शेकडो गृहनिर्मिती होत असल्या तरी त्यात फरक असा फारसा दिसत नाही. चौकोनी काँक्रीट ठोकळे, खिडक्या, सज्जे, साचेबंद आकार या पलीकडे अशा वास्तुतज्ञांची झेप जात नाही. महापालिका पोटनियमानुसार रचनेस उपलब्ध होणाऱ्या जागेचा जास्तीत जास्त उपयोग कसा करता येईल यातच आजच्या सामान्य वास्तुतज्ञाची बुद्धिमत्ता खर्च केली जाते. व अशा रीतीने व्यवसायाच्या वेदीवर कलागुणांची आहुती दिली जाते.

स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय वास्तुकलेचा दर्जा खालावण्यास तेथील जनता देखील काही अंशी कारणीभूत आहे. कारण वास्तुतज्ञांच्या रचना कल्पनेला प्रत्यक्षात आणणे वा प्रोत्साहन देणे हे सर्वस्वी जनतेच्या हातात असते. अर्थात, जनतेलाच जर कलादृष्टी नसेल तर वास्तुतज्ञ सांगेल ती पूर्व दिशा अशी स्थिती असते. बहुश्रुत माणूस आपले घर कलापूर्ण असावे अशीच अपेक्षा करीत असतो. परंतु त्यासाठी वास्तुतज्ञाची निवड करताना त्याची चूक होते. यामुळे कलापूर्ण वास्तुनिर्मिती अशक्य होऊन बसते. भारतीय समाज मुळातच रूढीप्रिय असल्याने नवकल्पना त्याच्यावर लादणे त्यांना मानवत नाही व त्यामुळे वास्तुतज्ञही सहसा प्रयत्न करीत नाही. कारण त्याला व्यवसाय करायचा असतो. कलानिर्मिती नव्हे. समाज व वास्तुतज्ञ याची अभिरुची, सौंदर्यदृष्टी याचा

मिलाफ झाला तरच नवरचना, कल्पना प्रत्यक्षात उतरू शकते. पाश्चिमात्त्य समाज कलाभिमुख, चोखंदळ असा असल्याने व त्याला तेथील वास्तु-तज्ञाच्या कल्पकतेची जोड मिळाल्याने तेथे असामान्य दर्जाची अत्याधुनिक वास्तु निर्मिती होऊ शकते. उलट भारतात समाजाची अभिरुची शून्य कलादृष्टी व वास्तुतज्ञाची परंपराप्रिय, संकेत, रूढ रचनातंत्र आणि नवअवकाश कल्पना वा रचना कल्पना हे रेल्वेच्या रुळाप्रमाणे कधीच मिळत नाही. त्यामुळ नवरचना निर्मिती स्वातंत्र्योत्तर भारतात होऊ शकली नाही.

स्वतंत्र भारतातील वास्तुतज्ञाच्या सौंदर्य कल्पनेची तुलना एखाद्या बेडौल कुरूप स्त्रीशी करता येईल. जी तोंडाला पावडर फासून वा इतर प्रसाधने वापरून आपण सुंदर आहोत असे भासविण्याचा प्रयत्न करते परंतु मुळातच असलेला बेडौलपणा, कुरूपताही बघणाऱ्याच्या नजरेतून सुटत नाहीत. सुंदर स्त्री व कुरूप स्त्री यातील फरक कोणीही पाहता क्षणीच समजू शकतो. आजच्या वास्तुतज्ञाची सौंदर्यदृष्टी केवळ सज्जाचे, पडदीचे, वेगळे आकार, रचना करण्याइतपतच मर्यादित असते व या भागाच्या रचनेमुळे त्याला वाटते आपण कलापूर्ण वास्तुनिर्मिती केली आहे. तुमची सर्व वास्तू मूलत: कुरूप असली तर सज्जाच्या, पडदीच्या तथाकथित सुंदर आकार प्रसाधनांनी ती थोडीच सुंदर दिसणार आहे ?

जोपर्यंत भारतातील वास्तुतज्ञ एक अस्सल कलानिर्मिती निर्माण करण्यासाठी विचारशील प्रयत्न करीत नाहीत तो पर्यंत भारतीय आधुनिक वास्तुकलेला जागतिक व्यासपीठावर स्थान मिळणार

---


यंदाचे महाराष्ट्र राज्य ग्रंथ-पारितोषिक मिळवणारे

आमचें एक विशेष प्रकाशन

डॉ. सुधीर फडके

**कोठे आणि कधीतरी**

किंमत : दहा रुपये

राजहंस प्रकाशन

नाही. असे वास्तुतज्ञ निर्माण करण्यास कदाचित भारतातील शिक्षणपद्धतीत आमूलाग्र बदलही करावा लागेल. कारण नव कल्पना सुचणारा वास्तुतज्ञ निर्माण करण्यासाठी त्याच्यावर अत्यंत वेगळे संस्कार करावे लागतील. आणि त्याला परंपरेपासून दूर ठेवावे लागेल.

स्वतंत्र भारताच्या निराशाजनक स्थितीत देखील काही आशादायी वास्तुतज्ञ आहेतकी ज्यांची कल्पनाशक्ती, आकारप्रभुत्व सामान्य वास्तुतज्ञांपेक्षा वेगळे आहे. तरीपण जागतिक व्यासपीठावर ते कोठेतरी कमीच पडतात. अवकाश, आकार, रचना, साहित्य या वास्तुकलेच्या चार मूलभूत कलाक्षेत्रात कुठेतरी ते उणे पडतात. असे असले तरी कोणत्या ना कोणत्या क्षेत्रात त्यांनी कलानिर्मिती केली आहे.

भारतातील या असामान्य वातुतज्ञात, मुंबईचे चार्लस कोरिया यांचे नाव घेता येईल. त्यांनी अहमदाबाद येथे गांधी आश्रमाची रचना करून आधुनिक भारतीय वास्तुकलेत फार मोलाची भर घातली आहे. त्यांच्या इतरही अनेक रचनात नवआकार, रचना सौंदर्य दृष्टोत्पत्तीस येते. अहमदाबादचे बाळकृष्ण दोशी यांनी आंतरराष्ट्रीय कीर्ती संपादन केली आहे. अर्थात कर्बुझीए व कान्ह यांच्या सहवासाचा प्रभाव त्यांच्या शैलीवर पडलेला आढळतो. या शिवाय दिल्लीच्या अच्युत कानविंदेची या क्षेत्रातील कामगिरी स्पृहणीय आहे. महाविद्यालय परीसर रचनेतील त्याचे प्रभूत्व आता जगभर सुपरीचित असे आहे. याचे व्यतिरिक्त फीरोज कुठीयनवाला, पिलु मोदी, जसबीर सिंग, गोबाय, हसमुख पटेल, उत्तम जैन इत्यादी भारतीय कीर्तीच्या नामवंत वास्तुतज्ञांनी खऱ्या अर्थाने आधुनिक वास्तुनिर्मिती केली आहे. परंतु जागतिक दर्जाच्या दृष्टीने ती कोठे तरी उणीच पडते.

गेल्या पंचवीस वर्षात भारतात शेकडो वास्तुतज्ञ निर्माण झाले तरीपण लोकसंख्येचा विचार करता हे प्रमाण अत्यंत कमी आहे. आज प्रत्येक पाच तरुण वास्तुतज्ञांपैकी दोघे जण परदेशी जातात. तेथेच स्थायिक होतात. ही स्थिती कधी बदलेल ?

सर्वांगसुंदर कलापूर्ण वास्तुनिर्मिती हा भारतीय वास्तुतज्ञांना फार दूरचा टप्पा आहे. आज केवळ व्यवसायापेक्षा वास्तूच्या कलागुणावर अधिक विचार करण्याची गरज आहे. या विचारशीलतेतूनच नवकल्पनांचा उगम होत असतो. असे झाले तरच एकेकाळी वास्तुकलेच्या क्षेत्रात अद्वितीय, वैभवशाली म्हणून गणला जाणारा भारत देश आपली कीर्ती परत मिळवू शकेल.

—विजय दीक्षित

कामगार जगत्

# ' संप–बंद–घेराव बंदी ' एक प्रश्नचिन्ह

राष्ट्रपती श्री. गिरी यांनी स्वातंत्र्य-दिनाच्या संदेशात राष्ट्राला एक आवाहन केले आहे. सध्याच्या आर्थिक अडचणींवर मात करण्यासाठी उत्पादन वाढीचा एकमेव तोडगा सुचवला आहे. ह्या तोडग्याबाबत दुमत होण्याचे कारण नाही. त्याचप्रमाणे उत्पादन वाढीचे उद्दिष्ट गाठण्यासाठी, औद्योगिक संस्था-मधून संप, बंद, घेराव, टाळेबंद्या आदी गोष्टी किमान तीन वर्षे तरी कटाक्षाने टाळल्या पाहिजेत. ह्या राष्ट्रपतींच्या आवाहनाबाबतही कुणी आक्षेप घेऊ शकणार नाही. हे सर्व घडून आले तर राष्ट्राच्या आजच्या गंभीर परिस्थितीत आवश्यकच आहे. पण ते होणार कसे हे मात्र प्रश्नचिन्ह आहे. राष्ट्रपती हे स्वतः एकेकाळी कामगार चळवळीत होते– मान्यवर कामगार नेते होते. आजही त्यांचे नाते ह्या चळवळीशी जवळचे आहे आणि त्यांच्या अलीकडील काही वक्तव्यावरून सध्या देशात असलेल्या परिस्थितीचीही त्यांना पूर्ण जाण आहे– असे वाटते. साहजिकच, तीन वर्षेपर्यंत ' संप बंद बंदी ' स्वीकारा असा उप-देश कामगारांना व कामगार संघटनांना करताना, सध्याच्या बिकट परिस्थितीत कामगार तो कितपत मानतील ह्या विषयी इतरांप्रमाणे त्यांच्या मनात शंका असणारच. म्हणूनच ' संप बंद बंदी 'साठी काही ठोस उपायही त्यांनी वा दुसऱ्या दिवशी पंतप्रधानांनी सुचवायला हवे होते. परंतु दुर्दैवाने तसे झाले नाही.

राष्ट्रपतींचा संदेश आकाशवाणीवरून दिला जात असताना, एकट्या मुंबई शहरातच ७५–८० संप सुरू होते. त्यातले बहुतेक आजही सुरू आहेत. तर ठाणा विभागात चार-पाच संप सुरू होते. ह्याखेरीज मुंबईतल्या निवासी डॉक्टरांचा संप सुरू आहे तो वेगळाच. कॉ. डांगे गिरणी कामगारांचा लढा उग्र करण्याची, प्रसंगी संपाचा आदेशही देण्याची भाषा बोलत आहेत. भिवंडीचे हातमाग कामगार लढ्याची भाषा बोलताहेत. आयुर्विमा कर्मचारी झगडत आहेत. नगरपालिका कमगार संपाची नोटीस देऊन बसले आहेत. भारतीय मझ-दूर संघ कामगारांना भाववाढीविरोधी आंदोलनाला प्रवृत्त करत आहे. बहुतेक संपाचे मूळ आर्थिक आहे, असंतोषात आहे. कुठे कुणाला काढून टाकल्याचे निमित्त आहे, कुठे युनियनला मान्यता मिळावी म्हणून संप आहे. संपाचे नेतृत्व करणाऱ्यात सर्व संघटना आहेत–इंटक आहे! आयटक, सीटू, मझदूर संघ– सर्व आहेत !!

राष्ट्रपतींचे आवाहन आणि प्रत्यक्षातली परिस्थिती–तफावत फार मोठी

आहे. आणि ही वाढत जाणार आहे. राष्ट्राच्या जीवनातच संप, हरताळ, उग्र आंदोलने आज नित्याची होऊन बसली आहेत. त्याशिवाय सर्वसामान्य जनतेची गाऱ्हाणी ऐकलीच जात नाहीत ही वस्तुस्थिती आहे. रस्त्यावर आल्याशिवाय, तीव्र लढ्याचे हत्यार उपसल्याशिवाय; शासनाच्या, उच्चपदस्थ लोकप्रतिनिधींच्या (?) आणि मालकांच्याही कानापर्यंत सामान्यजनांची, कामगारांची गाऱ्हाणी जातच नाहीत त्यांची कुंभकर्णी झोप उघडतच नाही हा रास्त समज आज अधिकाधिक दृढमूल होऊ पाहात आहे. रेल्वे लोकोकर्मचारी संपाच्या वेळची केंद्रसरकारची भूमिका, राजस्थान सरकारची त्यांच्या कामगारांबरोबर चालू असलेल्या लढ्यातली भूमिका, महाराष्ट्र सरकारची सध्याच्या डॉक्टरांच्या लढ्यातली भूमिका—वरील समज कायम करणाऱ्याच ह्या घटना आहेत. महाराष्ट्र शासनाने अलीकडे निरनिराळ्या समित्या नेमून जीवनावश्यक वस्तूंच्या किमतीवर निर्बंध घालायचा देखावा निर्माण केला. परंतु हे होण्यासाठी देखील जनतेला कायदा धाब्यावर बसवून रस्त्यावर यावे लागले. जी गोष्ट शासनाची, तीच खासगी बड्या कारखानदारांची ! फरक इतकाच, की शासन निदान जनतेच्या उग्र आंदोलनापुढे कधी कधी मान तुकवते.तरी पण भांडवलदार—कारखानदार मात्र तेवढाही समजुतदारपणा दाखवीत नाहीत. असे हे भांडवलदार, मालक—कामगार तंट्यात प्रकरणे चिघळेपर्यंत वाट पाहातात, आणि नंतर कामगारांविरुद्धच अशी काही कृती करतात की, लढ्याची मजल संपापर्यंतच जाते. गिरण्यांमधली ताजी खळखळ अशाच स्वरूपाची आहे. तिथे 'आयटक'चे संख्याबळ वादातीतपणे लक्षात घेण्यासारखे असूनही 'गिरणी मालक संघ' त्यांच्याशी चर्चाही न करता इंटकशी करार करून मोकळा होतो. गिरणगावातल्या असंतोषाचे मूळ असल्या असमंजस भूमिकेतच आहे. गोदरेज (विक्रोली) मध्येही डॉ. दत्ता सामंतांचे नेतृत्व निर्विवाद सिद्ध झाल्यावरही, त्याला मान्यता न देण्याच्या अट्टाहासानेच गेल्या सप्टेंबरमधले गोदरेज रामायण घडले ही वस्तुस्थिती आहे. कित्येक कारखान्यातून मॅनेजमेंटने टाकलेली पावले तर अशी असतात की मॅनेजमेंटलाच संप हवा आहे असे वाटावे. मुंबईतल्या गेल्या काही वर्षातला कामगार चळवळीचा इतिहास बघितला तरी हे लक्षात येईल. लढ्याशिवाय, मागितल्याशिवाय कामगारांना रास्त पगारश्रेणी आणि पगारवाढ व इतर सवलती मालक लोक देत नाहीत. कामगारांच्या, सुपरवायझर्सच्या संघटना बनू द्यायच्या आड येतात. प्रकरणे चिघळवीत राहतात. त्यातून लढे उभे राहातात. काही ठिकाणी कामगारांच्याही मागण्या अवास्तव असतात. नाही असे नाही. परंतु बहुसंख्य झगडे उभे राहतात ते मालकांच्या आडमुठ्या धोरणमुळेच. आणि मालकांच्या काही कल्पना, विशेषत: कामगारांच्या भलाईच्या कल्पना गळी उतरवणे हे कठीणच. त्यांनी आखलेली

धोरणे पूर्ण विचार करूनच आखलेली असतात. अर्थातच संभाव्य परिणामांना, संपांना तोंड त्यांची द्यायची तयारी असतेच. संपाचे वेळी बहुसंख्य विरोधात असले तरी पैसा त्यांच्याजवळ असतो. सरकारला, सरकारी पक्षालाही आणि पोलिसांनाही ते म्हणूनच जवळचे असतात. वेळ आल्यास कामगारांविरुद्ध कोर्टात जाणेही त्यांनाच अधिक सुलभ असते. परिणामतः 'मासेस'च्या विरोधात जाऊनही ते वरचढ राहतात. 'समाजवादी' (??) शासनही अशा तंट्यात सहसा लक्ष घालीत नाही. मालकांना मोकळे रान देते. अगदीच जर डोकी फुटायला लागली तर, शासन मध्यस्थी करते!

बहुसंख्य संप, बंद, लढे असे मालकांनी ओढवून घेतलेले असल्याने त्याला आळा घालणं जरा कठीणच. म्हणूनच, राष्ट्रपतींचं भाषण जरी स्वागतार्ह असलं तरी त्याप्रमाणे 'संप-बंद बंदी' अवघड आहे. ह्यावर उपाय एकच आहे. कामगार व संचालक ह्यांच्यात सुसंवाद प्रस्थापित झाला तरच परस्पर सामंजस्य निर्माण होऊ शकेल. त्यातूनच कदाचित् संप, बंद, घेराओ, टाळेबंद्या वगैरेंचे प्रमाण कमी होऊ शकेल. असा सुसंवाद, निव्वळ कामगार संघटना आणि मालक ह्यांच्यावरच सोपवलं तर, होणं शक्य नाही. शासनाची मदत ह्या ठिकाणीच होऊ शकेल. औद्योगिक शांतता टिकावी म्हणून, कामगार व उद्योग मंत्रालयांनी जागरूक राह्यला हवं. ज्या ज्या ठिकाणी कामगार-मालक वादंग उभे राहतील, त्या त्या ठिकाणी अगदी सुरुवातीच्या अवस्थेतच सरकारनं हस्तक्षेप करावा. सुरुवातीच्या वादंगाचं संघर्षात, भडक्यात रूपांतर होण्यापूर्वीच शासनानं हस्तक्षेप करून दोन्ही पक्षांना एकत्र आणलं पाहिजे. ह्यामुळे बरेचसे संप, बंद टाळले जाऊ शकतील. मोठाले संघर्ष रोखले जाऊ शकतील. उत्पादनवाढीचं अपेक्षित लक्ष्यही गाठता येऊ शकेल. परंतु हे सारं व्हायचं असेल तर शासनाला आलेली मरगळ झटकून टाकावी लागेल. कारखानदारांच्या, भांडवलदारांच्या हितसंबंधांची रक्षणकर्ती ही भूमिका सोडावी लागेल. आणि संपांच्या कारणांच्या मुळाशी न जाता, माणुसकीच्या दृष्टिकोणातून कामगारांच्या प्रश्नांचा विचार न करता, "आधी संप मागे घ्या. मग बोलणी करू" असला (रेल्वे कर्मचारी संपासारखा) पोरकट प्रकार बंद केला पाहिजे. उत्पादन वाढीची खरोखरच जर सरकारला तळमळ असेल तर, नुसतीच 'संप-बंद बंदी'ची घोषणा निरर्थक आहे. मालकांच्या बाबतीतही कणखर धोरण आखून त्याच्या अंमलबजावणीची धमक शासनानें दाखवली तरच हे शक्य आहे! ◻

## घरेलू कामगार संघ

भारतीय मझदूर संघातर्फे परवा एक मोठा मोर्चा निघाला होता. अर्थात

नेहमीप्रमाणे सचिवालयाकडे. प्रचंड भाववाढीविरूद्ध कामगारांचा आवाज उठवण्यासाठी हा मोर्चा होता. ह्याच मोर्चात, भा. मझदूर संघाशी संलग्न असलेल्या घरेलू कामगार संघाचे सदस्यही मोठया संख्येनं सामील झाले होते. घरगडयांची ही जी संघटना भा. मझदूर संघाच्या श्री. रमण शहांनी बांधली आहे, ती खरोखरच कौतुकास्पद आहे. ह्या संघटनेनं अद्याप जरी काही फारसं पदरात पाडून घेतलेलं नसलं तरी, घरगडयांचा आवाज त्यांनी मुंबईत उठवला आहे हे नाकारता येणार नाही. आणि अत्यंत असंघटित असलेल्यांकडून हा संघटित आवाज उठला हे लक्षात घेतलं म्हणजे ह्या यशाचं महत्त्व समजून येऊ शकेल. ह्या यशातूनच पुढचा मार्ग सुकर होऊ शकेल. सध्या ह्या गडयांच्या मागण्यांचा जो मसुदा पुढे आला आहे तो तितकासा वास्तव नाही. ह्या मागण्या पुढे करताना, घरगडयांचा पगारदार हा देखील परिस्थितीनं नाडलेला मध्यमवर्गीय आहे, हे बहुतेक विसरलं गेलं आहे असं वाटतं. वास्तविक हे लक्षात घेऊन, घरगडयांचा हा प्रश्न थोडया वेगळया पातळीवरून हाताळला गेला पाहिजे असं वाटतं. नेहमीच्या कामगार चळवळीच्या शिरस्त्याहून वेगळा मार्ग इथे चोखाळला जाणं आवश्यक वाटतं.

घरगडयांचा हा प्रश्न दिवसेंदिवस अधिक कठीण होत जाणार आहे. आहे त्या पगारात, आजची महागाई निभावणं घरगडयांच्या आवाक्याबाहेरचं आहे. तर नेमक्या त्याच कारणासाठी घरगड्यांना पगार वाढवून देणं मालकांना (म्हणजे कुटुंबप्रमुखांना) अशक्य आहे. ह्या कोंडीतून सुटका (दोघांचीही!) करायची असेल तर, संघटनेनं घरगडयांची नोंद करून देऊन, कामाच्या दरांची बांधणी करून घरगडी पुरवावेत, येणारा मोबदला सर्व घरगडयांत कामाच्या स्वरूपात, समप्रमाणात वाटून द्यावा. एवढे होऊनही किमान आवश्यकतेपेक्षा जेवढा कमी पगार घरगडयांना मिळत असेल, तेवढी भरपाई त्यांना व्हावी म्हणून पर्यायी उपाय संघटनेने योजावेत. अशा उपायांमध्ये काही जोड व्यवसायाची त्यांच्यासाठी उभारणी किंवा शासनातर्फे प्रयत्न करून त्यांना आर्थिक मदत देणे वगैरेंचा अंतर्भाव व्हावा.

वर्ग संघर्षावर आधारीत कामगार चळवळीवर भारतीय मझदूर संघाचा विश्वास नाही. मालकशाही नको आणि समाजवाद, राष्ट्रीयीकरणच हवे असे ते म्हणत नाहीत. भिन्न वर्गातले सामंजस्य वाढावे, कामगारांना व्यवस्थापनात, कारखान्यांच्या मालकीत हक्क मिळावा असे त्यांना वाटते. हा विचार भारतीय कामगार चळवळीत काहीसा नवा आहे, पण नकारात्मक भूमिकेवर आधारलेला नक्कीच नाही. त्यामुळेच त्यांच्याकडून घरेलू कामगारांच्या चळवळीला काही विधायक दिशा मिळेल अशी अपेक्षा बाळगायला हरकत नाही!

—माणूस प्रतिनिधी

# नगरच्या या मंडळींची
# दखल कोण घेणार ?

**विजय दर्प**

अहमदनगर कॉलेजच्या आम्ही काही डेमॉन्स्ट्रेटर्सनी गेले काही महिने कॉलेज चालकांशी नोकरीच्या शाश्वतीसाठी झगडा चालवला. हा झगडा चालू झाल्यापासून विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षणतज्ञ, पत्रकार तसेच कर्मचारी, कामगार संघटना व त्यांचे नेते अशा समाजातील अनेक स्तरातील अनेकांशी आम्ही चर्चा केल्या. अनेकांची मते ऐकली, आणि आमच्या लढ्याची पार्श्वभूमी त्यांना सांगितली. तसेच मध्यंतरी पुणे विद्यापीठाचे कुलगुरु व नगर कॉलेजचे प्राचार्य यांनीही पत्रकारांना मुलाखत देऊन आपली बाजू जनतेसमोर मांडली.

कुठल्याही लढ्यामध्ये दोन्ही बाजूंचे काही स्वार्थ असतात, काही उद्दिष्टे असतात, आपापले एक तत्त्वज्ञान असते. जेव्हा हे स्वार्थ, ही उद्दिष्टे आणि तत्त्वे परस्पर विरोधी होतात, एकमेकांना जाचक होतात, तेव्हा खरी लढ्यास सुरुवात होते. हा लढा जेव्हा रस्त्यावर, जनते समोर येतो तेव्हा लढ्यातली प्रत्येक बाजू सामाजिक संदर्भ शोधू लागते आणि आपले तेच सत्य असा दावा करते. शेवटी जनतेचा कौल सर्वांना मान्य करावा लागतो.

आमचा झगडा सुरू झाल्यावर, महाविद्यालय कुठल्याही प्रकारचा अन्याय करीत नाही, नवीन नवीन पास होणाऱ्या विद्यार्थ्यांना कामाचा अनुभव मिळावा, या काळात त्यांना दुसरीकडे चांगली नोकरी शोधण्यास वाव मिळावा या उदात्त सामाजिक दृष्टिकोनातून महाविद्यालय डेमॉन्स्ट्रेटर्सना तात्पुरत्या स्वरूपात नेमते व काही वर्षानंतर काढून टाकते असे चालकमंडळींनी प्रतिपादन केले. 'डेमॉन्स्टेटर्च्या जागा कायम स्वरूपाच्या नसाव्यात, त्यांच्या वरच्या लेक्चरर्स, प्रोफेसर्सच्याच जागा कायम स्वरूपाच्या असतात, तेव्हा डेमॉन्स्ट्रेटर्सच्या या तात्पुरत्या जागांवर अव-

लंबून न राहता तुम्ही दुसरीकडे चांगल्या नोकऱ्या शोधाव्या' असे मत पुणे विद्यापीठाचे कुलगुरु रँग्लर महाजनी यांनी मांडले. आम्ही 'आमच्या वैयक्तिक स्वार्थासाठी भांडतो आहोत, आमच्या नोकरीचीच आम्हाला काळजी म्हणून आम्ही रस्त्यावर आलो आहोत, विद्यार्थ्यांना, जनतेला चिथावणी देऊन शांतता बिघडवून समाजाचे नुकसान करीत आहोत.' असे अनेक आरोप कॉलेज चालकांकडून आमच्यावर केले गेले. 'तुम्हाला लीडरशीप करायची आहे.' असे आमच्या प्राचार्यांनी देखील आम्हाला सुनावले. विद्यार्थ्यांच्या व समाजाच्या हिताची कॉलेज एवढी काळजी घेत असताना 'आम्ही काही राजकीय हेतू मनात ठेवून नगर कॉलेजची बदनामी करीत आहोत.' असाही प्रचार काहींनी केला.

आम्हाला मिळालेल्या नोकऱ्या, मग त्या कुठल्याही असोत, आमच्या जीवित वित्ताचे चरितार्थाचे साधन आहेत, स्वप्रयत्नांनी व स्वगुणांनी त्या टिकवणे हा आमचा घटनेने दिलेला, विद्यापीठ अनुदान मंडळ आणि विद्यापीठ यांनी मान्य केलेला पूर्ण नैतिक अधिकार आहे, हा हक्क अबाधित ठेवण्यासाठी संघटित होऊन लढा देण्याचा देखील आमचा हक्क आहे. आमच्या लढ्यामागचे हे मुख्य तत्त्व होते. आम्हा डेमॉन्स्ट्रेटर्सचाच नव्हे तर सर्व महाविद्यालयीन शिक्षकांचा हा जिव्हाळ्याचा प्रश्न होता.

समाजात अनेकदा प्रबळ शक्तींच्या जोरावर हे हक्क दुर्बळांकडून हिरावून घेतले जातात व त्याच्यावर आर्थिक, वैचारिक व मानसिक गुलामगिरी लादण्यात येते. ही गुलामगिरी असह्य झाली की दुर्बळांनी संघटित होऊन लढा उभारणे अपरिहार्य होते.

अहमदनगर कॉलेजमध्ये गेल्या काही वर्षांपासून बहुसंख्य शिक्षकांना विद्यापीठाच्या नियमाप्रमाणे दोन वर्षांनंतर नोकरीची शाश्वती द्यावी लागू नये म्हणून काढून टाकण्याची प्रथा चालू आहे. अनेक लेक्चरर्स व डेमॉन्स्ट्रेटर्सना नोकरीत १०–१५ दिवसांचा खंड पाडून परत घेतले जाते. व वेतनवाढ देण्याचे टाळले जाते. या प्रथेला अनेकांना विना कारण बळी पडावे लागले आहे. चार पाच वर्षांपूर्वी विज्ञान शाखेच्या एका लेक्चररला तर तो वर्गावर गेला असता ऑफिसमध्ये बोलावण्यात आले व त्याला नोकरीवरून काढल्याचे सांगण्यात आले. कारण कॉलेज चालकांना त्याच्या जागी नवीन मर्जीतल्या माणसास नेमावयाचे होते. प्रत्येक शिक्षकास त्याला दुसरीकडे नोकरी मिळत नाही म्हणून दयेच्या भावनेतून घेतल्याचे सांगण्यात येते. प्राचार्यांच्या वा संस्था चालकांच्या मर्जीवर आपले भविष्य अवलंबून आहे हे ओळखून प्रत्येकजण त्या दृष्टीने प्रयत्नशील राहू लागतो. या प्रथेमुळे दरवर्षाअखेरीस प्राध्यापक मंडळीत भयप्रद वातावरण निर्माण होऊ लागते. बऱ्याच जणांना नोकरीवरून काढले जाई. निराश होऊन ही माणसे प्राचार्यांकडे जात. प्राचार्य म्हणत, हा सारा

मॅनेजमेंटचा कारभार, मी नुसता सह्या करणारा, तरी मी तुमच्यासाठी प्रयत्न करीन. या आश्वासनांना भुलून आपल्यावर प्राचार्यांची फार मर्जी आहे असे समजून आपली नोकरी गेल्याचे कुणी कुणाला सांगत नसे. दोन वर्षांपूर्वी स्टॅटिस्टिक्सच्या कोकलेगावकर या लेक्चररचेही असेच झाले. आपल्यावर प्रिन्सिपॉल फार खूष आहेत, आपल्याला काय भीती नाही राव, असे त्याने मलाही सांगितले होते. पण जूनमध्ये आल्यावर जेव्हा त्यास नोकरी नाकारण्यात आली, तेव्हा अत्यंत निराश होऊन त्याच रात्री त्याने आगगाडीखाली आत्महत्या केली. 'मनोदौर्बल्यातून घडलेला अविचार' म्हणून या दुःखद घटनेची प्राचार्यांनी संभावना केली.

गेल्या वर्षी आम्हा काही डेमॉन्स्ट्रेटर्सना जेव्हा पंधरा दिवसांचा खंड पाडून व कुठल्याही परिस्थितीत पुढच्या वर्षी नोकरी मिळणार नाही अशा अटीवर नोकरीवर घेण्यात आले, तेव्हा या प्रथेचा निषेध करून ती बंद पाडण्याचे आम्ही ठरवले. संघटित होऊन शांततामयरीत्या आम्ही हा प्रश्न प्राचार्यांसमोर मांडला. कॉलेज चालू असेपर्यंत प्राचार्य पुढील वर्षी नोकरीची शाश्वती देण्याची व कुणावरही अन्याय न करण्याची आश्वासने देत कालहरण करीत राहिले. टर्म संपताच मात्र सर्वांना १५ जूनपासून नोकरीवरून काढून टाकल्याच्या सूचना दिल्या. तुमच्या नोकरीची आता गरज नाही असे ज्ञापनातच लिहिण्यात आले. या प्रकाराने अत्यंत व्यथित होऊन आम्ही शेवटी कुलगुरूंकडे गेलो. त्यांनीही प्राचार्यांचीच बाजू उचलून धरली. शेवटी हा प्रश्न आम्हाला विद्यार्थी व जनता यांच्यासमोर आणावा लागला. ज्ञानदानाचे पवित्र काम निष्ठेने करणाऱ्या बहुसंख्य शिक्षकांना या महाविद्यालयात नोकरीच्या शाश्वतीपासून वंचित करण्यात यावे, भविष्याची चिंता त्यांना सतत भेडसावत राहावी आणि त्यांच्या या असहाय्य परिस्थितीचा मूठभर कॉलेज चालक मंडळींनी मात्र फायदा घेत राहावे, म्हणजे प्रबळ सत्तेच्या जोरावरची पिळवणूकच नव्हे तर काय ?

दहा वर्षांपूर्वी असे घडत नव्हते. एम. ए., एम. कॉम., एम. एससी. होणाऱ्यांचे प्रमाणच त्यावेळी कमी होते. शिवाय पगारांची स्केल्स कमी असल्याने प्राध्यापकी पेशाचे आकर्षण कमी होते. त्यामुळे असलेले प्राध्यापकच कॉलेजला टिकवावे लागत. चांगल्या गुणांनी पास होणाऱ्या बी. ए. बीएस. सी., बी. कॉम. विद्यार्थ्यांना ट्यूटर अथवा डेमॉन्स्ट्रेटर्स म्हणून घेतले जाई. थोडेसे अर्थार्जन करून हे विद्यार्थी पुढील शिक्षणासाठी अथवा इतर क्षेत्रात निघून जात. १९६६ पासून विद्यापीठ अनुदान मंडळाने महाविद्यालयीन शिक्षकांची स्केल्स बरीच वाढवली. विद्यापीठाने ट्यूटर्स व डेमॉन्स्ट्रेटर्ससाठीसुद्धा लेक्चरर्सइतकीच दुसऱ्या वर्गातील मास्टर्स पदवी ही किमान शैक्षणिक पात्रता ठरवली. वाढलेल्या पगाराच्या स्केल्समुळे

प्राध्यापकी पेशाचे आकर्षण वाढले. मास्टर्स पदवीधरांची संख्याही वर्षानुवर्षे वाढू लागली. त्यामुळे नगर कॉलेजसारख्या काही बलवत्तर शिक्षणसंस्थांनी विद्यापीठ अनुदान मंडळ व विद्यापीठाने ठरवलेले बदल अंमलात आणले खरे पण बहुसंख्य शिक्षकांना नोकरीची शाश्वती द्यावी लागू नये म्हणून नोकरीवरून काढूनच टाकण्याची प्रथा सुरू केली.

आता प्रश्न असा पडतो की, कॉलेज एवढ्या लोकांना नोकरीची शाश्वती का नाकारते? एवढे लोक प्राध्यापकी पेशासाठी अपात्र समजायचे काय? वरिष्ठ प्राध्यापकपदी पोहोचण्यासाठी वा कायम होण्यासाठी कोणत्या गुणसंपन्न विद्वानांची वर्णी लागू शकते? नगर कॉलेजसारख्या अनेक कॉलेजातील शिक्षकांचे साधारणपणे चार वर्ग असतात. एक वर्ग असतो चालक व त्यांचे आप्त नातलग. बऱ्याचशा वरिष्ठ जागा ही मंडळी कायमची अडवून बसलेली असतात. यातला प्रत्येकजण स्वतःला कॉलेजच्या मालकवर्गापैकी समजत असतो, त्यामुळे अनिर्बंध सवलती हा जणू त्यांचा हक्कच, चार आकडी पगार घेऊन यांनी चारच तास घेतले, न घेतले तरी चालते. कारण ते त्यांचे महत्त्वाचे काम नसतेच. शहरातील निरनिराळे क्लब्स्, बँका यांचे ते पदाधिकारी असतात. वर्गात पोरांना शिकवण्यापेक्षा समाजसेवा करावी हा या मागचा हेतू असतो. शिवाय निरनिराळी सरकारी व परदेशी अनुदाने मिळवण्यात व त्यासाठी वेगवेगळ्या स्कीम्स् तयार करण्यात यांचा बराच वेळ खर्च होत असतो. दुसरा वर्ग चालक मंडळींशी गैरव्यवहारात हातमिळवणी करणाऱ्यांचा. विद्यार्थ्यांच्या स्कॉलरशीपसाठी व इतर सोयीसाठी मिळणाऱ्या अनुदानांचा गैरव्यवहाराने अपहार करणे, विद्यापीठ परीक्षांच्या वेळी अवैध मार्गाने विद्यार्थ्यांकडून पैसे उपटणे यासारख्या अनेक कामगिऱ्या या वर्गाकडून पार पाडल्या जातात. तिसरा वर्ग चालक मंडळींच्या स्तुतिपाठकांचा, भक्तगणांचा. हा वर्ग वरील दोन्ही वर्गांचे स्वामित्व मान्य करीत असतो. यात एखाद्याच्या पत्नीस किंवा इतर नातेवाइकांस नोकरीवर घेतलेले असते. एखाद्यास इतरांची वरिष्ठता डावलून विभाग प्रमुखाच्या वा अन्य उच्चपदी नेमलेले असते, एखाद्याच्या गैरव्यवहारावर आपुलकीने पांघरुण घातलेले असते. अशा उपकारांच्या ओझ्याखाली दबलेली ही माणसे चालक मंडळीचे अहोरात्र गोडवे गात असतात. स्टाफ कौन्सिलमध्ये वरिष्ठांनी व चालक मंडळींनी घेतलेल्या कुठल्याही निर्णयास प्रामाणिक विरोध करण्याचे धारिष्टच यांच्याकडून होत नाही. स्वतःच्या विचारांपेक्षा हे लोक चालकवर्गाच्या विचारसरणीशी जास्त बांधील असतात. मंडळीची अनैतिक कामे हा वर्ग बिनबोभाट करीत असतो. विद्यापीठ परीक्षांच्या वेळी चालक वर्गातील कुणाच्याही मुलास, मुलीस अथवा इतर नातलगास मदतीचा हात देण किंवा

परिक्षकांच्या मागे लागून त्यांचे गुण वाढविणे हे यांचे कर्तव्यच असते. चौथ्या वर्गातील माणसे बिचारी गरीब, आपमतलबी व भित्री. आपण बरे आपले काम बरे अशी यांची वृत्ती. वरिष्ठ वर्गाच्या गैरव्यवहाराकडे दुर्लक्ष करण्यावाचून गत्यंतरच नसते. दीर्घकाळ ही माणसे कनिष्ठ श्रेणीतच खितपत पडलेली असतात. वरिष्ठ लोकांवर जळत राहणे व त्यांच्याविषयी आपापसात विशेषत: नवख्यांसमोर कुरकुरत राहण्यापलीकडे यांना काही करता येत नाही. मरमरेतो काम करूनही त्याचे चीज होत नाही हा यांचा नेहमीचा सूर असतो. नवीन लेक्चरर्स, ट्यूटर्स, डेमॉन्स्ट्रेटर्सवर ही मंडळी भाव खाऊन असतात. ट्यूटर्स, डेमॉन्स्ट्रेटर्स या चारही वर्गात कुठेच बसत नाहीत. कारण त्यांना पगार कमी. नोकरीची शाश्वतीही नाही. हव्या असलेल्या माणसास मात्र वाटेल तेवढी बढती देऊन कायम करण्यात येते. बाकी सर्वांची वर्षा-दोन वर्षातच हकालपट्टी.

अशा प्रकारची प्राध्यापकाची यंत्रणा अनेक खाजगी शिक्षणसंस्था राबवीत असतात. बहुसंख्य शिक्षकांना दरवर्षी काढून टाकले तर विद्यार्थ्यांना त्यांच्या अनुभवाचा फायदा मिळणार नाही, प्राध्यापकांनाही आपल्या विषयाचा व्यासंग वाढवून अध्यापनात सुधारणा करणे शक्य होणार नाही आणि त्यामुळे एकूण समाजाचे नुकसानच होईल असा विचार कॉलेज चालक मंडळींच्या मनात येत नाही. मूठभर लोक त्यांच्या स्वतःच्या स्वार्थासाठी शिक्षणसंस्थेचा साधन म्हणून उपयोग करून घेत असतात. वास्तविक आपल्या शिक्षकवर्गास नोकरीची पूर्ण शाश्वती देऊन त्यांचे जीवन सुस्थिर होण्यास व त्यायोगे त्यांच्या ज्ञानदानाच्या कार्यास मदत करणे हे प्रत्येक शिक्षणसंस्थेचे सामाजिक कर्तव्य आहे. परंतु प्रबळ सत्तेच्या जोरावर बरीच कॉलेज चालक मंडळी प्राध्यापकांची आर्थिक कोंडी करतात, त्यांचे वैचारिक स्वातंत्र्य हिरावून घेतात आणि त्यांना आपल्या स्वार्थासाठी राबवून घेतात. विद्यार्थी, प्राध्यापक आणि समाजावर होणारा अन्याय चालक मंडळींच्या मालकी हक्काच्या तीव्र जाणीवेतून होत असतो. विद्यापीठ अनुदान मंडळाचे आणि विद्यापीठाचे नियम असतात खरे पण त्यांचे उल्लंघन करणाऱ्या शिक्षणसंस्थांना कुणी जाब विचारू शकत नाही. कारण शिक्षणसंस्था स्वायत्त असतात. त्यांचे व्यवस्थापन खाजगी असते, आर्थिकदृष्ट्या त्या प्रबळ असतात.

शिक्षणक्षेत्रातल्या या मालकशाहीचे समूळ उच्चाटन झाले पाहिजे. नोकरीची शाश्वती मिळून प्रत्येक प्राध्यापक बुद्धीने व मनाने स्वतंत्र झाला पाहिजे. त्यासाठी त्यांनी संघटित होऊन लढाऊ झाले पाहिजे. एरवी स्वाभिमानशून्य शिक्षकवर्ग आपल्यासारखीच नादान पिढी निर्माण करीत राहील.

• • •

२८ ऑगस्टला पाऊस चालू होता तरी नागपूरकरांनी आरोळी मारलीच

# जाऽऽगे मारबत !
# जाऽऽरे बडग्या !!

अ. द. वेलणकर

मारबत आणि मोहरम-गणपतीमध्ये नाचणारे वाघ हे आमच्या नागपूर नगरीचे एक सांस्कृतिक (!) वैशिष्ट्य आहे. लहानपणापासून मी दोन्ही पाहत आलो आहे. दोन्ही गोष्टींचा अर्थ, त्यांचे धार्मिक-पारंपरिक प्रयोजन काय आहे हे मला कळत नसे. कोणाला विचारावे तर कोणीही या प्रकारांचे समाधानकारक स्पष्टीकरण करू शकत नसे. 'वं. चालत आले आहेत. प्रकार वर्षानुवर्षे. गंमत वाटते.'— यापलीकडे कोणी बोलत नव्हते.

नागपूर प्रांतातले हे असले प्रकार आणि इतर अनेक धार्मिक चालीरीती यांचा जोर गेल्या पाच-दहा वर्षांत जरा कमी होत चालला आहे हे दिसत होते, वाटले की हळूहळू काही चालीरीती लोप पावतील आणि पुढे कधीतरी तो एक संशोधनाचा विषय होईल ! तेव्हा मग या प्रकाराची आपणच जमेल तेवढी नोंद करून ठेवावी या विचारानेच प्रस्तुतचा लेखनप्रपंच.

मारबत हा प्रकार थोडासा प्रतीकात्मक आहे ! आषाढी पौर्णिमा ते श्रावणी अमावास्या या काळात चांगला पाऊस झालेला असतो. शेतकऱ्यांपुढे शेतीची कामे पडलेली असतात. यापुढे पाऊस नको असतो. ऋतुबदल हवा असतो. पावसामुळे डास, पिसवा, माशा यांचे साम्राज्य पसरलेले असते. त्या अनुषंगाने अनेक रोग — कॉलरा, महामारी इ. उद्‌भवतात.

पोळ्यापासून पुढे पाऊस व त्याबरोबरच घाण, रोगराई जाते — जावी

अशी इच्छा असते. 'आला पोळा — पाऊस झाला भोळा' असेही काही लोक म्हणतात.

पिठोरी अमावास्येला बहीण भावाच्या पाठीवर काकडी फोडते. दुनियेत राह-ताना वाटेल ते आघात सहन करण्याची त्याच्यात ताकद असावी असा अर्थ या रीतिच्या मुळाशी आहे. काकडी व सातूचं पीठ खायचं. ते स्वास्थ्य देते. पालेभाज्यांसह अनेक कृमी-कीटक-जंतू-केस इ. पदार्थ पोटात जाण्याची शक्यता असते. शरीराला अनावश्यक अशी ही घाण शरीराबाहेर जाते त्यायोगाने !

पोळयाच्या दिवशी दाराशी मेढे ठेवतात. मेढे म्हणजे पळसाच्या दांडया. या रोगाचे जंतू आकृष्ट करतात असे म्हणतात. हे मेढे दुसऱ्या दिवशी बाहेर फेकतात. उकीरडयावर नेऊन जाळून टाकतात. ही पळसाची काठी म्हणजे बडगा. बडग्या ! पावसाला—रोगराईला जणु बडगा दाखवायचा.

घराप्रमाणेच आखाडयात सुद्धा बडग्या ठेवू लागले. त्यातून वेगळया बडग्याची स्थापना तिथे होऊ लागली. आणि हे बडगे शहरातून मिरवीत नेऊन त्यांचे तान्ह्या पोळयाच्या दिवशी दहन करण्यात येऊ लागले. बडगा मिरवताना 'जारे बडग्या ! जारे बडग्या' अशा आरोळया मारायच्या.

हळूहळू प्रचलित राजकारणाचे थोडे रंग या बडग्याला मिळू लागले. भारतीय समाज उत्सवप्रिय आहे. ('उत्सवप्रिय' हा शिष्टसंमत शब्द झाला. खरोखर जमेल तेव्हा शिमगा साजरा करण्या-


# पुरंदऱ्यांचा सरकारवाडा

ब. मो. पुरंदरे

किमत : सात रुपये

राजहंस प्रकाशन

चीच भारतीय समाजाची प्रवृत्ती आहे ! असो) उदा. पेंढारकर अवार्ड झाले तेव्हा नागपुरात पेंढारकरचा बडग्या निघाला होता. पुढे नेहरूंना विरोध केला या सबबीवर द्वारकाप्रसाद मिश्रा यांचा बडग्या निघाला. याह्याखान, सालाझार, चौ एन लाय यांचेही बडगे निघाले होते ! बडग्याच्या मिरवणुकीत आखाड, भजन मंडळी, यांच्याबरोबर खडी गंमत वगैरे अचकट विचकट प्रकारही हळूहळू समाविष्ट झाले.

बडग्याची जिथे स्थापना केलेली असते त्या ठिकाणी भजन, कीर्तन, पोवाडे; तमाशा असे कार्यक्रम चालतात.

कालांतराने या बडग्यांच्या जोडीलाच मारबतीची स्थापना होऊ लागली.

नागपुरात आजही वस्त्यावस्त्यातून मारबती निघतात. तो स्थानिक लोकांच्या उत्साहाचा भाग झाला. पण नागपूरच्या जुन्या पारंपरिक महत्त्वाच्या अशा मारबती दोनच ! एक तऱ्हाने तेली समाजाची जागनाथ बुधवारींतील पिवळी मार्बत. आणि दुसरी इतवारी-तील काळी मार्बत. मार्बत ही स्त्रीची अजस्र प्रतिमा असते. बांबूच्या काड्यांचा सांगाडा, त्यावर कागद इ. चिकटवून रंगरंगोटी करतात. वर मुखवटा मातीचा असतो. मूर्तिकाराकडून एखाद्या वर्षी साचा बनवून पाच-दहा मुखवटे एकदम बनवून घेतात. ते स्वस्त पडते. हा सारा खटाटोप ४०० ते ५०० रुपयांपर्यंत सहज जातो.

मोठ्या पोळ्याच्या दिवशी संध्या-काळपासून रात्री १ वाजेपर्यंत 'पान-सुपारी 'चा कार्यक्रम चालतो. त्याच्या पत्रिका छापतात. पिवळ्या मारबतीच्या पत्रिकेवर 'स्थापना १८८५, वर्षे ८८ वे' असे लिहिले आहे ! काळी मार्बत नंतर बसू लागली.

'पिवळी मार्बत' आणि काळी मार्बत' जिथे बसते त्या ठिकाणाला पोळ्याच्या दोन दिवस आधी आम्ही भेट दिली. तिथले कार्यकर्ते विशेष काही सांगू शकले नाहीत. पिवळ्या मार्बतीच्या ठिकाणी एकाने जे सांगितले तेवढे मात्र महत्त्वाचे आहे. तो म्हणाला, 'जन्माष्टमीपर्यंत मार्बत तयार व्हावीच लागते.' दुसऱ्याने पुस्ती जोडली, 'मारबत म्हणज पूतना राक्षसीन् होय !'

मग या मार्बतीचे, जन्माष्टमी साजरी करण्याचा एक भाग म्हणून, बडग्याच्या मिरवणुकीबरोबरच मिरवून दहन करणे अशी प्रथा पडली असावी असा तर्क करता येतो. भेसूर रूप आणि प्रमाणा-बाहेर मोठे स्तन यावरून मारबत हे पूतनेचे प्रतीक असावे.

२८ ऑगस्टला पाऊस चालू होता तरी मार्बत नित्याप्रमाणे निघालीच. 'रोगराईबरोबर महागाई घेऊन जाऽऽ गे मारबत !' ची आरोळी नागपूर-करांनी मारली.

● ● ●

# मुक्काम नांदेड

लक्ष्मणराव गायकवाड

सहकारी चळवळ म्हणजे समाजातील दुर्बळ घटकांचा विकास घडवून आणून समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम होय अशी भलावण नेहमी केली जाते. काही समाजकंटकांनी व स्वार्थी पुढाऱ्यांनी मात्र सहकाराला स्वाहाकाराचे स्वरूप दिले असून मूलतः आर्थिक व सामाजिक विकासासाठी अस्तित्वात आलेल्या सहकारी चळवळीला बदनाम केले आहे. अनेक सहकारी संस्थेतील भ्रष्ट व गैरकारभाराचे नमुने नित्य वृत्तपत्रातून वाचकांपुढे सादर केले जात आहेत. मुंबईच्या हिमालय हौसिंग सोसायटीचा भ्रष्ट व नियमबाह्य कारभार महाराष्ट्र टाइम्स दैनिकातून गाजलाच आहे. मराठवाडा व नांदेड जिल्हा याबाबतीतही मुंबई किंवा पश्चिम महाराष्ट्रासारख्या प्रगत विभागाच्या 'मागे' नाही हे नांदेड को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटीच्या कारभाराने सिद्ध केले आहे.

नांदेडच्या नागरिकांना सहकारी पद्धतीवर घरे बांधून देण्यासाठी ११ ऑगस्ट १९६५ ला नांदेड को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी स्थापन झाली. सोसायटीचे ऑडीट प्रथमतःच १६ मार्च १९७१ ला सुरू होऊन २३ जून ७३ला संपले. ऑडिट रिपोर्ट पत्रक्रमांक ADT 161–OF–1972 द्वारे सोसायटीच्या अध्यक्षांना सादर करण्यात येऊन १९-९-७२ पर्यंत कंप्लायन्स रिपार्ट सोसायटीने सादर करावा अशी सूचना ऑडिटरने केली. सदर सूचनेनुसार सोसायटीने कोणती पावले त्या दिशेने उचलली हे माहीत नाही. सदर संस्थेच्या गैरकारभारावर ऑडिट रिपोर्टमध्ये अनेक ताशेरे असून त्या गैरकारभाराची कायदेशीर व नैतिक जबाबदारी प्रारंभ कालातील अध्यक्ष एस. एम. पिसोळकर, नंतरचे अध्यक्ष प्राचार्य गो. रा. म्हैसेकर, सेक्रेटरी आर. एम. सावते, खजिनदार अलीभाई, अन्य पदाधिकारी व अधिकारी यांच्यावर आहे.

### सोसायटीचे कार्य

नांदेड हौसिंग सोसायटीने सहकारी पद्धतीवर नांदेडकरांना घरे बांधण्यासाठी १८ एकर जमीन दोन व्यक्तींकडून घेतली. १३३ प्लॉटस्‌मध्ये त्याची विभागणी करण्यात आली. प्रत्येक प्लॉटमध्ये चार घरे म्हणजे ५३२ घरे बांधण्याचे ठरले. बांधकामासाठी एका सेवानिवृत्त इंजिनिअरची नेमणूक करण्यात आली. सोसायटीने ३०–६–६६ पर्यंत ७ लाख ८२ हजार ५५७ रु. जमविले. महाराष्ट्र हौसिंग फायनान्स सोसायटीकडून ४ लाख ६६ रुपयांचे कर्ज मिळाले. नांदेड जिल्हा सहकारी मध्यवर्ती बँकेकडून एक लाख रुपये मिळाले. सर्व मार्गांनी मिळून १३ लाख

४८ हजार ५५७ रु. सोसायटीने जमा केले. एक प्लॉट बांधण्यासाठी ३७,५०० रु. खर्च येणार होता. सभासदांना हा खर्च ३०,००० रु. यावा व प्रत्येक घर ७५०० रु.मध्ये तयार व्हावे या उद्देशाने सोसायटीतर्फे वीटा आणि चुना यांचा कारखाना काढण्याचे ठरले.

## हिशोबातील गोंधळ

५३२ घरे बांधण्यात यायची असली तरी १२३८ लोकांकडून त्यासाठी आधी पैसे स्वीकारण्यात आले. नंतर काहींचे पैसे परत करण्यात आले. ज्यांनी आधी पैसे दिले व ज्यांना घरांची जरुरी आहे इत्यादी निकष न ठरविताच काहींचे पैसे परत करण्यात आले. पैसे परत करताना त्याचे व्याज देण्यात आले नाही. कोणत्या सदस्याचे किती रुपये किती दिवस वापरले याबद्दल निश्चित कल्पना नाही. वस्तुतः सरकारी ऑडिट दरवर्षी होणे जरूर असते. परंतु या सोसायटीच्या मागे मंत्री, पद्मश्री व बडी कॉंग्रेसवाली पुढारी मंडळी असल्याने पाच सहा वर्षे ऑडीटच झाले नाही. ऑडिट झाल्यानंतर आता बरीच प्रकरणे बाहेर आली आहेत. सर्वच प्रकरणे रंगवायची म्हटल्यास विशेषांकच काढावा लागेल. तूर्त एका लेखामध्ये काही मासले व शेरे यांचीच माहिती येथे देत आहोत. ऑडिट होईपर्यंत सोसायटीने फक्त १७ घरे बांधली. ३२ घरांचे छतापर्यंत काम झाले. ८८ घरे ग्राऊंड फ्लोअरपर्यंत बांधण्यात आली व ८८ घरे प्लिथ लेव्हलपर्यंत झाली.

सोसायटीने खरेदी केलेल्या १६ एकर जमिनीचे ६०,००० रुपये विश्वनाथाला व ८००० रु. २ एकरांसाठी रंगूबाईला दिले अशी कागदोपत्री नोंद आहे. परंतु बॅलन्सशीटवर ६१४७४ रु. एवढीच नोंद आहे. सोसायटीने जमीन खरेदीसाठी ६८ हजार रु. दिले की ६१४७४ रु. दिले याचा बुद्धिगम्य उलगडा पदाधिकाऱ्यांनी करावा. जमिनीची खरी किंमत कळणे शक्य नाही. कारण विक्रीपत्र (सेलडीड) रेकॉर्डवर नाही. जमीन खरेदीखाते रकमेची बँकेत वारंवार जुळवाजुळव झालेली आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे २५–११–६५ रोजी विश्वनाथला १६ एकर जमिनीचे २७,५०० रु. व रंगूबाईला २ एकर जमिनीचे २७,५०० रु.च दिल्याची कॅशबुकात नोंद आहे. ऑडिट रिपोर्ट पृष्ठ क्रमांक ७७ वर स्पष्टपणे म्हटले आहे की, ज्यांना पैसे दिले त्यांच्याकडून पैसे मिळाल्याची चिठ्ठी नाही.

नांदेड हौसिंग सोसायटीने बांधकामासाठी कुदल, टोपल्या टिकासी आदि साहित्य खरेदी केले. त्यासाठी ३९७० रु. ५० पैसे खर्च आला. परंतु स्टॉक रजिस्टरच उपलब्ध नाही. ऑडिटच्या वेळेस या बांधकाम साहित्याचा पत्ता नव्हता. ते भूमिगत झालेले आढळून आले. हे बांधकाम साहित्य काल्पनिक (Fictitious) असावे असे ऑडिटरला वाटले.

## मालमोटारींचा गोंधळ

हौसिंग सोसायटीने मालट्रक्स खरेदी सबंधीचे केलेले ठराव संदिग्ध आहेत.

कधी नवी मोटार घ्यावी असा ठराव आहे. तर कधी जुनी घ्यावी असा ठराव आहे. कधी अध्यक्ष पिसोळकर यांना लॉरी खरेदी करण्याचा अधिकार दिला आहे, तर कधी दुसऱ्या व्यक्तीस. त्यामुळे लॉरीज कोणी खरेदी केल्या, त्या जुन्या आहेत की नव्या हे कळायाला मार्ग नाही. मालट्रक खरेदीच्या पक्क्या रसिदी (पावत्या) नाहीत. ज्या कच्या रसिदी आहेत त्यांच्यावर मोटारींचा व चेसीसचा नंबर नाही. लॉरीजसाठी एकूण ७७,३७८ रु. २० पै. खर्च झाला आहे. अशी नोंद आहे. सी. टी. पारीख यांना डॉज मोटार घेण्या साठी ३४ हजार रु. दिले पण या संबंधीची रसीद साधी असून मोटार व चेसीसचे त्यावर नंबर नाहीत. शहा ऑटो इंजिनिअरींग कंपनीला २२ हजार रु. व श्री. पतेवार यास १९ हजार रु. दिले परंतु त्यांच्या रसिदी नाहीत व संबंधीत कागदपत्रे ऑडिटरला सोसायटीने दिली नाहीत.

नांदेड हौसिंग सोसायटीने चुनखडी, खोदकाम, चुन्याची पावडर बांधकाम' सुतारकाम, मोटारीच्या मजुरासाठी आदी बाबींवर १९६५ ते ६६ पर्यंत २५७२४ रु. ९७ पैसे खर्च केले. वीट निर्मात्या व्यक्तीस ३०।६।६६ रोजी मोटार खरेदीसाठी ८७४५ रु. दिले. त्याच तारखेस शहा ऑटो इंजिनिअरींग कंपनीला २२००० रु. व पांडुरंग पत्तेवार यास १९००० रु. दिले आहेत. ऑडिटचा या प्रकरणावरही आक्षेप आहे. ९ माणसांच्या पगाराची रक्कम, इतर काही रकमा आदीमध्येही नियमबाह्य वर्तन सोसायटीकडून झाले आहे. ६०२९७ रु. ४२ पैसे एवढ्या रकमेवर ऑडिट आब्जेक्शन आहे.


पूर्णिया

अनिल अवचट

सहा रुपये

राजहंस प्रकाशन


### नांदेड सहकारी बँकेचे 'लोन'!

नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने नांदेड कोऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटीला एक लाख रु. चे 'इंटेरियम लोन' दिले. परंतु सोसायटीच्या रेकॉर्डमध्ये लोन-सँक्शन ऑर्डरच नाही. कोणत्या अटीवर मंजूर झाले आहे हे ऑडिटरला त्यामुळे कळू शकले नाही. आश्चर्य म्हणजे पद्मश्री सहकार महर्षी श्री. शामराव कदम बँकेचे अध्यक्ष आहेत व बँकेकडे इंटेरियम लोनसंबंधी माहिती विचारली असताही बँकेकडून ऑडिटरला ती मिळू शकली नाही.

संस्थने घेतलेला मिलर, टाईपरायटर, विटा व चुनखडीचा कारखाना आणि तत्संबंधी अनेक बाबी संशयास्पद व्यावहाराच्या आहेत असे प्रथम दर्शनी तरी निर्विवादपणे म्हणता येईल. कागदपत्र सोसायटीने मुळीच व्यवस्थित

ठेवलेली नाहीत. नवीन सदस्यांची प्रवेश फी सोसायटीने स्वीकारली. परंतु त्याचे अर्ज रेकार्डला नाहीत. नियोजित फॉर्म्सप्रमाणे मेंबरशिपचे रजिस्टर नाही. त्यामुळे कोणी राजिनामा दिला, कोणाला कमी केले याचा पत्ता लागत नाही. मेंबर्सचे राजिनामे रेकॉर्डवर नाहीत. कोणाचेही नॉमिनेशन केलेले नाही. शेअर होल्डर्सचे अर्ज रेकॉर्डवर नाहीत, शेअर रजिस्टरची एंट्री कॅश-बुकशी जुळत नाही, शेअर लेजर व्यवस्थित नाही, शेअर लेजर बॅलन्स व बॅलन्सशीटमधील शेअर कॅपिटल यांचा ताळमेळ बसत नाही, शेअर होल्डर्सना शेअर सर्टिफिकेटस् दिलेली नाहीत. सोसायटीकडे कायद्याच्या व नियमाच्या प्रती नाहीत, स्थिर व अस्थिर मालमत्तेचे रजिस्टर व्यवस्थित नाही, इंजिनिअरच्या संमतीशिवाय पेमेन्ट झालेले आहे, ३० जून ६६ पासून जॉब रजिस्टर व मेजरमेंट रजिस्टर कोरे ठेवण्यात आले आहे इत्यादी अनेक प्रकारचे आक्षेप ऑडिटरने नांदेड हौसिंग सोसायटीच्या कारभारावर घेतले आहेत.

सहकारमंत्री ना. यशवंतराव मोहिते व इतर संबंधितांनी या गैर व भ्रष्ट कारभाराची कसून चौकशी करावी आणि सहकारी चळवळीत घुसलेल्या या अनिष्ट प्रवृत्तीचा बीमोड करावा अशी अपेक्षा आहे. जागरूक आमदारांनीही या प्रकरणाला वाचा फोडून सहकारी चळवळीचे शुद्धीकरण करण्याची गरज आहे.

● ● ●

मुक्काम पालघर

# भूमिसेनेचा मोर्चा

दिलीप जोशी

पालघर तालुका आदिवासी भूमिसेनेतर्फे सुमारे पाचशे छोटे शेतकरी व शेतमजूर यांचा मोर्चा दि. २७ ऑगस्ट रोजी तहसीलदार कचेरीवर गेला होता. यातील कित्येक आदिवासी वीसवीस मैल चालत पालघरला आले होते. बरेचसे दोनदोन-तीनतीन दिवसांचे उपाशी होते. मोर्चाचे दिवशी मुसळधार पाऊस होता.

मोर्चाचे नेतृत्व आदिवासी नेता काळूराम धोदडे याने केले होते. मी व शरद मांजरेकर हे 'भूमिपुत्र प्रतिष्ठान'चे कार्यकर्ते, गिरीश नार्वेकर आणि अरुण शेंडगे हे युक्रांदचे कार्यकर्तेही मोर्चात सामील होते. पालघर येथे आमदार मृणाल गोरे आणि श्री. प्रभाकर मोरे हे मोर्चात भाग घेण्यासाठी मुंबईहून मुद्दाम आले होते. तहसीलदार कचेरीपाशी मोर्चा अडविला गेला.

तहसीलदारांना भेटण्यासाठी गेलेल्या शिष्टमंडळाने जे निवेदन दिले ते थोडक्यात असे–

१ : पालघर तालुक्यातील शेतलाव-

णीची व बेणणीची कामे संपलेली आहेत. गेल्या वर्षीच्या भीषण दुष्काळामुळे आदिवासींकडे खायला धान्य नाही. कोणत्याही स्वरूपाची मजुरी उपलब्ध नाही. गेले पंधरा दिवस उपासमार सुरू आहे. म्हणून दुष्काळी कामाच्या स्वरूपात सरकारतर्फे कामे सुरू करणे अत्यावश्यक आहे. जंगलसफाईची काही कामे देण्याचा विचार सुरू आहे असे समजते परंतु तेवढ्यावर भागणार नाही. जंगल सफाईबरोबरच पाझर तलाव खणायच्या कामाची निकडही आम्ही 'प्रकल्पाधिकारी, पंचायत समिती पालघर' यांचे कानावर घातली. परंतु प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन ज्या तडफेने कामे सुरू व्हायला हवीत तशी होताना दिसत नाहीत.

२ : पावसाळी दिवसात केलेले मातीकाम ब्रासावर मापता येणार नाही किंवा जमिनीतील खोडके काढायचे कामही उक्ते देता येणार नाही. त्याकरिता रोजंदारीवर मजूर लावणे जरूरीचे आहे. रोजची मजुरी किमान ३ रु. असणे आवश्यक आहे. या कामावर कुटुंबातील सर्व माणसांना काम देण्यात यावे. म्हणजे १४ वर्षाखालील मुलांना काम नाकारण्यात येऊ नये. कामाच्या मजुरीपैकी ८० टक्के भाग धान्याचे रूपात मिळणे जरूरीचे आहे.

३ : स्वस्त धान्याचे दुकानात फारच कमी प्रमाणात धान्य मिळते. प्रत्येक माणसाला आठवड्याला फक्त एक किलो धान्याचा पुरवठा जिवंत राहण्यास अपुरा आहे. हा पुरवठा महिन्याला किमान बारा किलो तरी करणे जरूरीचे आहे. दुकाने पालघरपासून दूर व आडवळणी गावात असल्यामुळे दुकानांना धान्याचा कोटा किमान एक महिन्याचा तरी देण्याची व्यवस्था करावी.

४ : स्वस्त धान्य दुकाने ३-४ मैलांच्या अंतरावर ग्रामपंचायतींना मंजूर करणे अत्यावश्यक आहे. तसेच स्वस्त धान्याच्या दुकानांतून जीवनावश्यक वस्तूंचा वाजवी दरात पुरवठा होणे आवश्यक आहे.

५ : या विभागात जमिनींच्या संबंधीचे गावातील रेकॉर्डस् अत्यंत सदोष आहेत. कित्येक जमिनी मेलेल्या माणसांचे नावावर आहेत. तर काही जमिनी वाटप होऊनही दुसऱ्याच्या नावावर आहेत. हा हक्क-नोंदीचा प्रकार वस्तुस्थितीला धरून सुधारून घेण्याचे काम महसूल खात्याने त्वरित करून घेणे आवश्यक आहे. अर्ज करा म्हणजे मग तुमची हक्क नोंद बदलण्यात येईल असे आदिवासींना सांगणे निरर्थक आहे. अर्ज करूनही वर्षानुवर्षे गावच्या नोंदीत इष्ट बदल होत नाहीत. असा अनुभव आहे. तरी तालुका पातळीवरून योग्य ते अधिकारी गावोगावी पाठवून सर्व गावांचे रेकॉर्डस् त्वरित दुरुस्त करून घेणे अत्यावश्यक आहे.

६ : आमची वरील स्वरूपाची गाऱ्हाणी अत्यंत निकडीची आहेत व ती त्वरीत दूर होणे आवश्यक आहे. नुसत्या गाठीभेटी व पत्रव्यवहार करून प्रश्न सुटत नाहीत असा अनुभव येत आहे. उपासमार आमचे दरवाजे ठोठा-

वीत आहे. अशा वेळी आम्ही स्वस्थ बसलो तर सर्व परिस्थिती काही ठाकठीक आहे असा अर्थ सचिवालयात लावला जातो. आणि 'अन्नधान्याबाबत वा रोजगाराबाबत लोकांच्या फारशा तक्रारी नाहीत' असा भास निर्माण होतो.

आज हे आदिवासी आपल्या ज्वलंत तक्रारी घेऊन हालअपेष्टा सहन करूनही आले आहेत. त्यांना न्याय मिळेल अशी आशा आहे....'

वरील निवेदन तहसीलदाराला वाचून दाखवण्यात आले. नंतर त्यावर चर्चा झाली. दुष्काळी कामे काढण्यास उशीर होत असल्यावरून आ. मृणाल ताईंनी तहसीलदारांना खडसावून जाब विचारला. जमिनींचे रेकॉर्डस् निर्दोष करण्यासाठी ताबडतोब पावले उचलण्यास सांगितले. काळूराम धोदडे यांनी दामखिड येथे पाझर तलाव सुरू करण्याबाबत आग्रही प्रतिपादन केले. मी येथील स्वस्त धान्य दुकानातील निर्लज्ज गैरप्रकारांबाबत विचारले व किराट गावच्याच दुकानाचे चोरी प्रकरण सांगितले. शिष्टमंडळामधील श्री. रमेश चौथे, कुडा गावचे जि. प. सदस्य हरिश्चंद्र पाटील वगैरेंनी वेगवेगळ्या तक्रारी तहसीलदारासमोर सडेतोडपणे मांडल्या. कोंढाण गावच्या गंगीबाई या शेतमजूर स्त्रीने तहसीलदाराला रेशन (कंट्रोल)चे धान्य किती अपुरे असते हे आपल्या आदिवासी भाषेत वर्णन करून सांगितले. 'हप्त्याला एक किलो धान कोडाक पुरा येल! माझ्या कार्डाचा तूच खाऊन जा' आणि फुगून जा! असे तिने तहसीलदाराच्या तोंडावर सांगितले.

एक सप्टेंबरपासून सोळा ठिकाणी जंगलसफाईचे काम सुरू करतो, दामखिडच्या पाझर तलावाचे कामही सुरू करतो, मिळेल तेवढा जास्त धान्य कोटा स्वस्तधान्य दुकानांना देतो, किराट गावच्या दुकानाची एजन्सी बदलतो, जमिनीचे रेकॉर्डस् नीट ठेवतो आणि तुमच्या ज्या काही तक्रारी आहेत, त्या वेळोवेळी सांगत जा, त्यांचे निवारण करतो; अशी आश्वासने तहसीलदाराने दिली.

शिष्टमंडळ बाहेर आले तेव्हा आदिवासींचा जनसमुदाय घोषणा देत होता. 'काम नाही आम्हाला, आंबील नाही पोटाला' ही प्रमुख घोषणा होती. 'भूमिसेना झिंदाबाद'च्या आरोळ्यानंतर आ. मृणालताईंचे भाषण झाले. त्यांनी दुष्काळी कामांची मजुरी तीन रुपयांवरून अडीच रुपये केल्याबद्दल सरकारवर खरपूस टीका केली. आपले मंत्री दिल्लीत जाऊन सांगतात की महाराष्ट्रात दुष्काळामध्ये एकही जनावर मेलेले नाही. आणि कुणीही माणूस भुकेले नाही. हे मंत्री खेडयात जाऊन परिस्थिती पाहात नाहीत. शहरामध्ये टाळ्या मिळवणेच ते पसंत करतात, कारण खेड्यात यायची त्यांची टाप नाही. काळूराम धोदडेने बजावले की एक तारखेपासून दुष्काळी कामे सुरू झाली नाहीत तर आम्ही तहसीलदाराला स्वस्थ बसू देणार नाही. शेवटी

आभार मानण्यापूर्वी मी सांगितले की दुष्काळी कामे सुरू झाल्यावर खोटी हजेरी, लिहिणे, पगार वेळेवर न मिळणे, कामावर घ्यायचे नाकारणे वगैरे अन्याय होत असतील तर आदिवासींनी तावड-तोब दामखिड येथे 'भूमिपुत्र प्रतिष्ठान'चे केंद्रावर येऊन तक्रारी सांगाव्यात, गैर-प्रकार होत असल्यास निमूट बसू नये.

सकाळी सात आठचे सुमारास घरून निघालेले शेतकरी-शेतमजूर रात्री दहाचे सुमारास घरी पोहोचले ते ओल्याचिंब अंगाने. उपाशीपोटी निजले. काम मिळायची वाट पाहत. भरल्यापोटी निजायचा दिवस कधी उजाडणार?

● ● ●

## विनोबा चिंतन : पृष्ठ ८ वरून

जमिनीचा प्रश्न निघाला की लोक म्हणतात 'सीलींग' करा – जास्तीत जास्त किती जमीन ठेवता येईल ते ठरवा. जेव्हा भूदान–आंदोलन सुरू झाले व लोकात एक भावना निर्माण होत आहे, त्यामुळे लोक येवढे तरी बोलतात. परंतु मी म्हणतो की, प्रत्येकाने कमीत-कमी किती जमीन द्यायची हे तरी प्रथम ठरवा. कारण मला कर्तृत्वविभा-जन करायचे आहे. आज बहुतांश मजूर दुसऱ्यांच्या जमिनीवर काम करतात. चेतनाहीन काम करतात. हातापायाने काम करतात पण त्यांनी हे काम मन व बुद्धीने करावे असे आम्हाला वाटते. लोक म्हणतात की, हिंदुस्थानातील मजुरांत अक्कल कमी आहे, तेव्हा त्यांनी दुसऱ्यांच्याच हाताखाली रहावे. पण हा अहिंसेचा प्रकार नाही. त्यांच्याजवळ असलेल्या अकलेचा परित्याग केला तर दुसरा कुठला अकलेचा खजिना आपल्या जवळ नाही. त्यांच्या बुद्धीचा आपण उपयोग केला नाही तर आपला देश फार काही गमावेल. तेव्हा मजुरांच्या बुद्धीचा पूरा उपयोग केला पाहिजे व वाढविण्याची खटपट केली पाहिजे. त्यांना जमीन देण्याची योजना आखली पाहिजे.

आमचा कुठलाही पक्ष नाही. जिला 'तिसरी शक्ती' म्हणतात, ती आम्ही आहोत. आज 'तिसरी शक्ती'चा अर्थ आहे जी अमेरिकन गटातही सामील नाही किंवा रशियन गटातही नाही ती. 'तिसरी शक्तीची' माझी व्याख्या आहे, जी दंडशक्तीही नाही व हिंसा-शक्तीही नाही. एक हिंसाशक्ती, दुसरी दंडशक्ती व तिसरी आमची शक्ती. या शक्तीला आम्ही व्यापक बनवू इच्छितो. म्हणून आम्हाला कोणताही अलग संप्रदाय बनवायचा नाही. आम जनतेत मिसळून केवळ मानव बनून आम्हाला काम करायचे आहे. (सप्रेस)

● ● ●

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

MANOOS (Weekly) : 50 Paise : Regd. No. MH 649


# सावरकर सुभाष ग्रंथ भेट

## १ : स्वातंत्र्यवीर सावरकर

लेखक : धनंजय कीर । पॉप्युलर प्रकाशन, मुंबई
पृष्ठे : ६०० । निवडक छायाचित्रे । किंमत रुपये चाळीस

## २ : मी नेताजींना बघितलंय

लेखक : नारायण सान्याल । अनुवादक : अशोक शहाणे
पृष्ठे सुमारे ३५० । किंमत सुमारे वीस रुपये
'माणूस' मधून गाजलेली लेखमाला मार्च १९७४ मध्ये
पुस्तक रूपाने प्रसिद्ध होत आहे.

---

* १०० रुपयाची ठेव पाच वर्षासाठी 'राजहंस प्रकाशन'कडे ठेवल्यास वरील दोन्ही पुस्तके व्याजाच्या मोबदल्यात विनामूल्य भेट.

---

* सावरकर चरित्र नोंदणीच्या वेळींच दिले जाईल.
* ठेवीऐवजी शंभर रुपये पाच वर्षांची 'माणूस'ची वर्गणी म्हणून भरली तरी वरील दोन पुस्तके विनामूल्य दिली जातील.
* पुस्तके पाठविण्याचा टपाल, पॅकिंग इत्यादी खर्च ठेवीदारांकडे आहे.
* पाच वर्षे 'माणूस' वर्गणीचा पर्याय स्वीकारार्ह वाटला तर शंभर रुपये मनिऑर्डरने किंवा ड्राफ्टने 'साप्ताहिक माणूस' या नावे पाठवावेत.
* ठेव पर्याय स्वीकारार्ह वाटला तर शंभर रुपये मनिऑर्डरने किंवा ड्राफ्टने 'राजहंस प्रकाशन' या नावे पाठवावे.
* रक्कम चेकने पाठविणे सोयीचे असल्यास एक रुपया वटणावळ अधिक पाठवावी.

---

**या ठेवयोजनेची मुदत २० सप्टेंबरपर्यंत**

---

**राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०**


राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. **सं. श्री. ग. माजगावकर.**